॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान

# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी – ४१६७०२

(ट्रस्ट रजि. नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

# वार्षिक अहवाल

(वर्ष सन २०२१-२२)





कार्तिकोत्सवातील नेत्रदीपक रोषणाई ....





सर्व भाविकांसाठी चहापानाचा कार्यक्रम ....



महाशिवरात्रीचे दिवशी मंदिरभेटीसाठी आलेले
मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी
श्री. मालिडवाले साहेब यांचा सत्कार कार्यक्रम ....




तुळशीविवाह समारंभ....



॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥

**बारा गावांचे जागृत देवस्थान**



# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

(ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. ए-६७ नोंदणी वर्ष सन १९५२)

## -निमंत्रण -

**स.न.वि.वि.**

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वरचा वार्षिक कार्तिकोत्सव मिती कार्तिक शुद्ध दशमी ते कार्तिक पौर्णिमा, **गुरुवार दिनांक ०३ नोव्हेंबर २०२२ ते सोमवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२२** असा पाच दिवसांचा आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी, ही विनंती.

आपला नम्र,

विश्वस्त,

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

संपर्कासाठी मोबा. नं. **९८२३२७७३२६** (whats app)***

ई-मेलआयडी-shridevanjaneshwar@gmail.com

---

### • जनरल सभेची नोटीस

कार्तिकी उत्सवाचे पूर्वनियोजन करण्यासाठी सोमवार दि. ३१.१०.२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता श्रीदेव अंजनेश्वर मंदिरात जनरल सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी विश्वस्त, खोत मंडळी, सेवेकरी, मानकरी, देणगीदार व अन्य सर्व हितसंबंधी व्यक्तींनी जनरल सभेसाठी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

# कार्तिकोत्सवातील कार्यक्रम-

- प्रतिवर्षीप्रमाणे रोज रात्री ठीक ९.०० वाजता धुपारती.. आरती व पालखी प्रदक्षिणा होईल. रोज रात्री ठीक १० वाजता ह.भ.प. श्री. कैलास खरे, रत्नागिरी यांचे कीर्तन होईल.. कीर्तनासाठी ऑर्गनसाथ श्री. उदय गोखले, नाणार व तबला साथ श्री.अमेय हर्डीकर, सोलगांव यांची असणार आहे.

- रविवार दि. ०६.११.२०२२ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० पर्यंत 'लघुरुद्रस्वाहाकार' व यज्ञाची पूर्णाहुती होईल. त्यानंतर दुपारी १.०० वाजेपर्यंत यज्ञप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे...

  रात्री ७.३० वाजता मिठगवाणे गावांतील समस्त तेलीसमाज बांधवांची शोभायात्रा मिठगवाणे शिवाजी चौकातून निघून ठीक रात्री ८.४५ वा. अंजनेश्वर मंदिरात पोहोचणार आहे व त्यानंतर नेहमीप्रमाणे आरती, पालखी प्रदक्षिणा, कीर्तन आदी कार्यक्रम होतील. यादिवशी कडूतेलाच्या प्रकाशात श्रीदेवाचा पालखी सोहळा होणार आहे व सर्व मंदिर परिसर कडूतेलाच्या प्रकाशात उजळून निघणार आहे..

- सोमवार दि. ०७.११.२०२२ रोजी सकाळी १० वाजता बलीपूजन कार्यक्रम होईल. दुपारी १२.०० वाजता श्रीदेवाला महाप्रसाद दाखवण्यात येईल... दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसाद वाटप सुरू राहील.. संध्याकाळी ७.०० वाजता त्रिपूर पूजन होईल. रात्री १२.०० आरती, भोवती, लोटांगण, दरबार झाडणे आदी कार्यक्रम होतील.. रात्री उशिरा सामान्यपणे दोन वाजता लळीताचे कीर्तन सुरू होईल. सकाळी चार वाजेपर्यंत उत्सवाची सांगता होईल.

### * आग्रहाचे आमंत्रण *

# ‘निशाणकाठीची स्थापना‘

बुधवार दि. ०२ नोव्हेंबर २०२२ रोजी श्रीदेव अंजनेश्वर मंदिरातील सध्याच्या उभ्या असलेल्या निशाणकाठीचे विसर्जन व नवीन निशाणकाठीची स्थापना करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सकाळी ८.०० पासून दुपारी १.०० वाजेपर्यंत होईल. सर्व उपस्थित भाविक भक्त मंडळींना प्रसाद वाटप होईल. सुमारे ७७ वर्षांपूर्वी म्हणजे सन १९४५ मध्ये स्थापन केलेली सध्याची उभी असलेली निशाणकाठी उतरवून नूतन निशाणकाठीची स्थापना केली जाणार आहे. तरी आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही विनंती.

आपला नम्र,

**विश्वस्त,**

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

# ✻ जाहीर निमंत्रण ✻

रविवार दिनांक ०६ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्री ठीक ७.३० वाजता मिठगवाणे तेली समाजबांधवांची शोभायात्रा शिवाजी चौकातून निघून अंजनेश्वर मंदिरात ठीक रात्रौ ८.४५ वाजेपर्यंत येणार आहे. आरती, पालखी प्रदक्षिणा हे नित्याचेच कार्यक्रम तेली समाजाच्या ‘कडूतेलाच्या प्रकाशात’ होणार आहेत. फार पूर्वी अंजनेश्वरचे उत्सव या कडूतेलाच्या प्रकाशात होत होते. तोच अनुभव अनेक वर्षांनी आपण सर्वांनी घ्यायचा आहे. तरी या कार्यक्रमात आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी.

आपला नम्र,

**विश्वस्त,**

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

## –महत्वाच्या सूचना–

● देणगीदारांनी आपली देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा करावी.

– बँक खात्याचा तपशील–

**'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे'**

**A/c No- 143710100000001**
**IFSC code- BKID0001437**
**बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा**

भीमॲप, पेटीएम आदी मोबाईलॲपद्वारा वरील तपशील घालून देणगी रक्कम पाठवता येईल. तसेच कोणत्याही बँकेतून एनईएफटी /आरटीजीएस करता येईल.

देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात जमा केल्यावर पेमेंट स्क्रीनशॉट व आपला पूर्ण पत्ता (पिनकोड व मोबाईल नंबर सह) whats app no. – ९८२३२७७३२६ वर मेसेज करून किंवा shridevanjaneshwar@gmail.com या मेल वर पाठवता येईल. भाविक भक्तांनी आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्यात पाठवण्यास प्राधान्य द्यावे... आपला पूर्ण पत्ता ९८२३२७७३२६ या व्हाट्स्अप नंबरला मेसेज करून पाठवल्यावर देणगीपावती बनवून आपल्याला पोस्टाद्वारे पाठविणे, प्रसाद/अंगारा पाठविणे सोयीचे होईल. कृपया बँकेत जमा केलेल्या देणगीचा तपशील न विसरता पाठवावा.

● मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना मनीऑर्डर फॉर्मवर संपूर्ण पत्ता पिनकोड सह लिहावा. मनीऑर्डर रिसीट चा फोटो whats app no. –९८२३२७७३२६ – वर मेसेज करून अथवा ई मेल वर पाठवता येईल...

● देणगीदारांना कोणत्याही बँकेत स्वत:च्या नावाने मुदत ठेव ठेवून त्याचे तिमाही अथवा वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. आपल्या व्याजाची रक्कम वर्षभर होणाऱ्या सर्व धार्मिकांसाठी व देवस्थान सुधारणेसाठी खर्च होईल. अशी मुदत ठेव किमान रु. १० हजार किंवा समान पटीत असावी, अशी विनंती आहे. या देणगीदारांची नावे कायम देणगीदार या सदराखाली येतील. व्याज जमा झाल्यावर देणगी पावती/प्रसाद पाठवणे ही देवस्थानची जबाबदारी राहील.

● भाविक भक्तांना आपले गुप्त दान, निनावी देणगी दानपेटीत अर्पण करता येईल.. दानपेटीत जमा झालेल्या दानाचा विनियोग भोजन प्रसाद, स्वाहाकार सारखे धार्मिक विधी आदीसाठी खर्चीला जाणार आहे. लखोटा बंद देणगी रक्कम संपूर्ण नाव, गांव, पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक आदी तपशील नमूद करून दानपेटीत अर्पण झाल्यास यथावकाश देणगीपावती अंगारा–प्रसादासह पाठवली जाईल..

● श्रीदेवाला वस्तुरूप देणगी देताना देवस्थानशी संपर्क साधून दिल्यास योग्य होईल. मंदिरातील गरजा लक्षात घेऊन वस्तुरूप देणगी दिली जावी, अशी नम्र सूचना आहे.

● देवस्थान संबंधातील अनेक तऱ्हेची माहिती/फोटो/व्हिडीओ व सर्व काही 'Shree Dev Anjaneshvar Devastan' या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आली आहे. तरी आपणही या फेसबुक पेजला आवर्जून भेट द्यावी.

● देवस्थान भक्तनिवासामध्ये निवास व भोजन, नाश्ता, चहापानाची सोय होण्यासाठी श्री. सदानंद तुकाराम तथा राजा लिंगायत यांचेशी मोबा.नं. ७२६२९१९५१४ या द्वारे आगाऊ संपर्क साधावा. निवास व्यवस्थेच्या नोंदणीसाठी आपले आधारकार्ड अनिवार्य आहे.

● श्रीदेवावर आवर्तन, अभिषेक, एकादशणी आदी धार्मिक विधींसाठी श्री. विजय भुस्कुटे मोबा नं. ९८२०६७५०८५ (व्हाट्सॲप),श्री.शेखर फडके मोबा. नं.९३२६६२१४०४ (व्हाट्सॲप)/ ८५५२९७६२३२ अथवा श्री.प्रकाश परांजपे ९४२१४४१६४४/८४१२८७९३२२ यांचेशी आगाऊ संपर्क साधावा .

● श्री देवाच्या पिंडीवर धान्याची पूजा बांधायची असल्यास श्री. विजय वामन लिंगायत ९४२३३७४५९१ अथवा संतोष वामन लिंगायत ९५४५२७१९५० यांचेशी संपर्क साधावा..

●●●

## दोन शब्द ...

सर्वांसी नमस्कार.

प्रतिवर्षाप्रमाणे आज रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सन २०२१/२२ सालचा वार्षिक अहवाल आपल्याला पाठवीत आहे. फेसबुक, व्हाट्स्अप, इमेल, पोस्टाद्वारे आणि शक्य तिथे हस्तदेय पद्धतीने हा 'वार्षिक अहवाल' आपल्यापर्यंत पोहोचवून वर्षभरातील एकूण कारोभाराचा लेखाजोखा आपल्यापुढे सादर केला आहे. सन २००७ ते २०१२ हा पंचवार्षिक अहवाल, सन २०१२ ते २०१७ हा दुसरा पंचवार्षिक अहवाल आणि त्या नंतर सन २०१७/१८चा वार्षिक अहवाल, सन २०१८/१९चा वार्षिक अहवाल, सन २०१९/२०चा वार्षिक अहवाल आणि सन २०२०/२१ चा वार्षिक अहवाल आपल्याला यापूर्वी सादर केलेले आहेत. या सर्व अहवालांच्या पीडीएफ कॉपी देवस्थान फेसबुक पेजला व देवस्थानच्या वेबसाईटला अपलोड केलेल्या आहेत. त्यामुळे सन २००७/०८ पासूनचा सर्व आर्थिक व्यवहार आणि झालेले कामकाज अहवालांच्या रूपाने शब्दबद्ध करून आपल्या समोर ठेवलेले आहे. वर्षभरातील सारे सारे कामकाज आपल्यापर्यंत  पोहोचावे, वार्षिक जमाखर्च समजावा, वर्षभरातील उत्सवांचे सर्व सामान्य समालोचन शब्दबद्ध असावे, वर्षभरात मंदिर परिसरात झालेल्या सोयीसुधारणांचा गोषवारा आपणा सर्वांना वर्षाच्या वर्षाला समजावा म्हणून या वार्षिक अहवालाचे प्रयोजन आहे. वर्षभरातील सारे सारे कामकाज 'उजेडी' ठेवण्यासाठीचा हा एक माझा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

कोरोना महामारीचे संकट असताना सुद्धा देवस्थानचे वार्षिक उत्सव यथासांग पार पडले. कोणतेही गालबोट न लागता सरकारी नियम नियमावलीचे, अटीशर्तींचे पालन करून तितक्याच उत्साहात सर्व उत्सव पार पडले. त्याचाही मागोवा या अहवालाच्या माध्यमातून घेतला आहे की जेणेकरून भविष्यासाठी ते सर्व मार्गदर्शक ठरेल.

या अहवालवर्षामध्ये  मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी श्री. डि. एम. जी. मालीडवालेसाहेब यांनी मंदिराला भेट दिली आणि सर्व कामकाजाची पहाणी करून आपला अभिप्राय नोंदवला ही बाब फार महत्त्वाची झाली आहे. शिवरात्रीच्या उत्सवामधील महाशिवरात्रीचे दिवशी ही धर्मादाय आयुक्तांची भेट झाली, म्हणून ती कायम लक्षात राहील. विशेषतः चौदा वर्षांच्या देवस्थान दप्तराची प्रत्यक्ष पहाणी आणि पडताळणी धर्मादाय आयुक्तांनी केली, ही बाब माझ्यासाठी महत्त्वाची आहे. धर्मादाय आयुक्तांनी मंदिर परिसराची पहाणी केली आणि देवस्थानच्या एकूण कारभाराची पहाणी पडताळणी होवून गेल्यामुळे ती धर्मादाय आयुक्त भेट देवस्थान ट्रस्टसाठी निश्चितच महत्त्वाची झाली, असे मला वाटते. धर्मादाय आयुक्तांनी श्री देव अंजनेश्वर मंदिराला भेट द्यावी, ट्रस्टच्या दप्तराची पहाणी–पडताळणी  करावी, कारभारातील चुका उणीवा असतील तर त्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करावे, या अनेकविध हेतूने अगदी प्रयत्नपूर्वक ही भेट मी स्वतः मागीतली होती. कोल्हापूरच्या धर्मादाय सह आयुक्तांनाही निमंत्रित केले होते. कोल्हापूरच्या धर्मादाय सह आयुक्तांच्या आदेशानुसार रत्नागिरीचे धर्मादाय आयुक्त यांनी भेट दिली व आपला अहवाल कोल्हापूर धर्मादाय आयुक्त कार्यालयाला पाठवला. तसेच महाशिवरात्रीचे दिवशी रात्रीच्या पालखी सोहळ्याला जिल्ह्याचे मे. अपर जिल्हाधिकारी श्री. सचिन शिंदेसाहेब यांनी भेट दिली. तसेच राजापूरच्या प्रांताधिकारी श्रीम. वैशाली माने आणि राजापूरच्या तहसीलदार सौ. शीतल चव्हाण यांनीही त्यांच्यासोबत उत्सवाला सदिच्छा भेट दिली. या तीनही महसूल अधिकाऱ्यांनी देवस्थानच्या कामकाजाची माहिती घेतली, मंदिर परिसराची पहाणी केली. सोयीसुविधांची पहाणी केली. उत्सवामधील नियोजनाची प्रशंसा केली. महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने धर्मादाय व महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेली ही व्हिजीट निश्चितच परिणामकारक झाली आहे.

मित्रांनो... भाविक भक्तांना गुप्तदेणगी देता यावी, एक रुपयांपासूनची देणगी रक्कम देवस्थान ट्रस्टला देता यावी म्हणून अंजनेश्वर मंदिरात एकूण चार दानपेट्या बसविण्यात आल्या आहेत. देवासमोरील अर्पणदान एकत्रितपणे जमा व्हावे, व त्या अर्पणदानाचा हिशोब ठेवता यावा या उद्देशाने दानपेट्या बसविण्यात आल्या आहेत. धर्मादाय खात्याचे निर्देश लक्षात घेऊन त्या दानपेट्या बसविण्यात आल्या आहेत. राजापूर अर्बन बँक पठार शाखेमार्फत या दानपेट्यांमधील

दानाची मोजदाद केली जाते व जमा झालेली दानाची रक्कम राजापूर अर्बन बँकेच्या पठार शाखेमध्ये दीर्घ मुदत ठेव सर्टिफिकेट करून मासिक व्याज प्राप्तीसाठी ठेवली आहे, व याबाबतचा तपशीलवार हिशोब वेळोवेळी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला जात आहे. दानपेट्यांमधून वर्षभरातील एकूण जमा झालेल्या रक्कमेचा विचार करता दानपेटीतून मिळणारे उत्पन्न निश्चितच लक्षवेधी आहे.

श्रीदेव अंजनेश्वरची पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी अगदी प्रामाणिक प्रयत्न सुरू केले आहेत. कृषी विभाग, वनविभाग, महसूल विभाग व पंचायत समिती विभागाच्या समन्वयातून ही पडीक जमीन लागवडीखाली आणायची आहे. देवस्थान मालकीच्या एकूण ४५ हेक्टर पैकी २५/३० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आले तर ते एक मोठे कार्य होईल. अर्थात हे काम इतके सोपे नाही. त्यासाठी खूप मेहनत घेऊन कामकाज करण्याची आवश्यकता आहे. तसेच या कामासाठी श्रीदेवाची साथ मिळाली तरच ते शक्य आहे.

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा पब्लिक ट्रस्ट दि. १७ नोव्हेंबर १९५२ रोजी रजिस्टर झाला व त्या दिवसापासून ट्रस्टसाठी धर्मादाय आयुक्त यांनी दिलेले आदेश लागू झाले. ट्रस्टचे कामकाज त्या आदेशानुसार होणे, त्या आदेशांच्या प्रकाशात होणे हे कायद्याला अपेक्षित आहे. देवस्थानचा एकूण कारभार असो अथवा देवस्थानचे आर्थिक व्यवहार असो हे सर्व त्या धर्मादाय आदेशानुसार झाले पाहिजेत. बँक व्यवहार सुद्धा त्या आदेशातील मार्गदर्शक तत्त्वानुसार झाले पाहिजेत. ही बाब लक्षात घेऊन अनेक आमूलाग्र बदल केले आहेत.

सन १९५२ सालात स्थापना झालेल्या ट्रस्टला येत्या नोव्हेंबरमध्ये ७० वर्षे पूर्ण होणार आहेत. ही बाब लक्षात घेऊन ट्रस्टला ७५ वर्षेपूर्ण होत असताना श्रीदेव अंजनेश्वर महाराज चांदीच्या पालखीतून फिरले पाहिजेत, चांदीच्या सिंहासनावर विराजमान झाले पाहिजेत आणि चांदीच्या प्रभावळीमध्ये बसले पाहिजेत हे एक धोरण बनवून चांदी संकलन करण्याची सुरुवात या ७०व्या वर्षात करण्यात आली आहे. पाच वर्षाच्या कालावधीत चांदीची पालखी, सिंहासन आणि प्रभावळ तयार होईल व तो पंचाहत्तरीचा कार्यक्रम सन २०२७ मध्ये संपन्न होईल, असे नियोजन केले आहे. भाविकभक्तांनी चांदीच्या विटा देण्यास सुरुवात केली आहे. काहींनी रोख रक्कम देण्यास सुरुवात केली आहे. काहींनी चांदी देण्याचे आश्वासन दिले आहे. श्रीदेव अंजनेश्वर हे सर्व घडवून आणण्यासाठी सज्ज झाले आहेत. शिसमाचे लाकूड खरेदी करून पालखी व सिंहासन बनवण्याचे काम सुरू झाले आहे.

वार्षिक अहवालाचे निमित्ताने वर्षभरातील सर्व कामकाजाचे इतिवृत्त तथा प्रोसिडींग लिहून आपल्याला सादर केले आहे. जेणेकरुन सर्व गोष्टी तपशिलाने समजाव्यात आणि वर्षानुवर्षे हा मजकूर वार्षिक अहवालच्या निमित्ताने जतन व्हावा. अतिविस्तार झाला असला तरी पुढील अनेक वर्षांसाठी या अहवाल वर्षातील अनुभव उपयोगी ठरतील व या अनुभवाच्या प्रकाशात पुढील वाटचाल करता येईल. अहवाल लिखाणात काही चूक भूल झाली असल्यास निदर्शनास आणून द्यावी व चूकभुलीला आपण मोठ्या मनाने माफी द्यावी.

मित्रांनो... श्रीदेवाचे कामकाज अगदी मनापासून आणि निरपेक्षपणे केले की स्वतःच्या नावाचा स्पेशल उल्लेख करण्याची गरज भासत नाही. श्रीदेवाचे नांव जसे जसे मोठे होत जाईल त्याबरोबर आपले केलेले कामकाज पुण्यदायी होत जाईल, असे मला वाटते. त्यामुळे विश्वस्त म्हणून माझ्या नावाची छपाई करत नाही. संपर्काचा फोन नंबर पुरेसा आहे, आणि म्हणून माझ्या नावाचा उल्लेख नाही. अर्थात अहवालातील प्रत्येक अक्षराची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे, असे मी समजतो. वर्षभरातील सर्व जमा व सर्व खर्च रक्कमेचे उत्तरदायित्व माझे आहे. सर्व कामकाजातील चुका उणीवा, लाभहानी याचाही भार आपणच स्वाभाविकपणे स्वीकारला पाहिजे, झटकून चालणार नाही असे मला वाटते.. देवस्थानच्या एकूण कारभाराबद्दल कधीकाळी टीकाटिपण्णी झाली तरी आपणच ती सहजतेने झेलली पाहिजे, असे मला वाटते. माझेसाठी श्रीदेव अंजनेश्वर सर्वस्व आहे, त्याचा गरीमा उंचावणे हे माझे कर्तव्य आहे. माझ्याकडून कशापद्धतीने काम करून घ्यायचे हे श्रीदेव अंजनेश्वर महाराज ठरवत असतात, असे मला सदैव वाटत असते. त्यांनी नेमून दिलेले काम इमानेइतबारे करणे, इतकेच माझे हाती आहे. 'तू पुढे हो, मागे पाहू नकोस. बाकी सारेकाही मी पाहून घेईन', ही आज्ञा मी शिरसावंद्य मानतो आणि काम करत रहातो. मग बाकी विचार करण्यासारखे काही रहात नाही. आपला नम्र,

. विश्वस्त,

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

संपर्कासाठी मोबा. ९८२३२७७३२६(whatsapp) ई-मेलआयडी-shridevanjaneshwar@gmail.com

## अहवालवर्षामधील उत्सवांचे इतिवृत्त व काही महत्त्वाच्या घटनांचा, कामकाजाचा गोषवारा ...

- **श्री देवी मुहूर्ताईचा वार्षिक नवरात्रौत्सव..**

गुरुवार ०७ ऑक्टोबर २०२१ ते शुक्रवार १५ ऑक्टोबर २०२१ असा श्री देवी मुहूर्ताईचा नवरात्र उत्सव अगदी उत्साहात साजरा झाला रोज रात्री ठीक ९.०० वाजता ईशारत, धुपारत आणि त्यानंतर दहा पर्यंत आरती हा रोजचा परिपाठ अगदी उत्साहात पार पडला. कोरोना संक्रमण कालावधी असल्याने मास्क, दो गज दूरी आदी कोरोना नियमांचे पालन करून हा उत्सव पार पडला.. शुक्रवार दि. १५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ४.०० वाजता दसरा उत्सवाच्या निमित्ताने, 'सोने लुटण्याचा कार्यक्रम' श्री देव अंजनेश्वर मंदिरात झाला... नवरात्र उत्सवातील एकूण उपस्थिती वाखाणण्याजोगी होती.. नरेश कांबळी, रामदास रायकर, बबन गडगेकर, संतोष शिंदे, राजाराम राणे यांनी मंदिराच्या बाहेर ग्रीन शेडनेटचा मंडप उभारलेला असल्याने दो गज दूरी चे पालन शक्य झाले ... सौ. सुजाता गडगेकर, सौ. नमीता प्रिंदावणकर, सौ. रेश्मा मेस्त्री व सौ. संगीता गडगेकर यांनी दगडी फरशीची सफाई, झाडलोट आदी कामे अगदी मनापासून केली... प्रदिप कणेरी व मंदार कांबळी मंदिर झाडलोट, औषध फवारणी आदी बारीक सारीक कामे केली होती ... कोरोना नियमांचे पालन व्हावे म्हणून मंदिर परिसरात गोल सर्कल मारून घेतलेले होते... डेटॉल हँडवाश चा स्टँड, . 'मास्क जरूरी दो गज दूरी' चे बोर्ड लावलेले होते.... श्री. गिरीश धनावडे व त्याच्या साथीदारांनी तोरणांची रोषणाई मंदिरात केली होती... गोव्याच्या श्री. श्रीपाद भुस्कुटे यांनी रू. वीस हजारांचा नवीन इन्व्हर्टर सेट स्वखर्चाने आणून बसविला होता... इन्व्हर्टर सुरक्षित रहाण्यासाठी अल्यूमिनियम जाळीचा लाकडी बॉक्स विलास मेस्त्रींनी तयार करून आणला... श्री. अरुण जोशी यांनी भाविक भक्तांना प्रसाद म्हणून देण्यासाठी पाच किलो खडीसाखर रत्नागिरीहून पाठविलेली होती. श्री देवीच्या विहीरीच्या कठड्याचे बांधकाम झाल्यामुळे विहीरीला काहीसा बंदिस्तपणा आला आहे.

श्री देवीच्या नवरात्र उत्सवामध्ये गावातील सोनार पाटणकर वर्षानुवर्षे निरपेक्ष भावनेने सेवा करीत असतात. श्री. बाळूशेठ सोनार (दत्ताराम जगन्नाथ पाटणकर) देवीचा मुखवटा घासणे, सर्व सोन्याचांदीचे दागिने घासकाम करणे, मुखवट्याचे रंगकाम करणे आदी कामे करतात तशी ती पार पडली होती ... मदतीला गोकुळतात्या काजवे, विश्वनाथ कांबळी, अंकुश कांबळी, कैलास कांबळी, सचिन कांबळी, विजय परमार, महेश कांबळी, आदी गांवकर पुजारी मंडळींचे सहकार्य होते.. सकाळी अकराच्या दरम्यान देवी साडीचोळी, दागदागिने, फुलांचे गजरा आदी साजशृंगार करून भक्तांच्या दर्शनासाठी सज्ज करण्यात आली.. ठीक पावणे बारा वाजता ईशारतीचे ढोल वाजले.. धुपारत, पंचारत ओवाळून गांवकर गुरवांनी देवीची यथासांग यथाविधी पूजा पूर्ण केली... नैवेद्य दाखवला.... अशा प्रकारे नवरात्र उत्सवाची सुरुवात झाली. नवरात्र उत्सवामध्ये माडबन गावचा सुपुत्र चि. प्रसाद सदानंद गवाणकर याचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन श्री. वसंत भास्कर मोहिते यांनी केला... ज्यांनी अंजनेश्वरच्या पालखी सोहळ्याला मशालीचा प्रकाश दाखववा, त्याच वसंतराव मोहीतेकडून हा सत्कार होणे हा एक निव्वळ योगायोग म्हणायचा..... चि. प्रसाद हा BSF चा जवान म्हणून भारतीय लष्करी सेवेत रूजू झाला म्हणून तो सत्कार होता. सर्व भक्तांनी टाळ्यांचा गजर करून चि. प्रसादचे कौतुक केले... माडबन गावची सर्व गवाणकर मंडळी उपस्थित होतीच... श्री देवी मुहूर्ताई मातेचा उत्सव कोरोनाचे नियम पालन करून साजरा झाला... मास्क, दो गज दूरी चे पालन करून सर्व भक्त मंडळी रोज ठीक ९.०० वाजता आरती धुपारतीसाठी अगदी उत्साहाने उपस्थित राहत होते... नियमांची बंधने असली तरी भाविक भक्तांच्या उत्साहात तसूभरही कमतरता जाणवली नाही... रोज रात्री ९.३० पर्यंत आरतीचा कार्यक्रम झाला... वेळेचे बंधन कटाक्षाने पाळले गेले... गंगाधर भोगले आणि बबन गडगेकर हे आरतीचे पुढारी होते.. सौरभ भोगलेचा ढोलकीचा ताल आणि बाकी पाठीमागून आरतीला साथ देणारे आम्ही सर्व जण असायचो... सचिन मेस्त्री रोजचे फोटो शुटींग, व्हिडीओ शुटिंग करायचे. खडीसाखरेचा केवळ

प्रसाद होता.. तो सुध्दा प्लास्टिक पिशवीमधून दिला गेला.... कुठेही कोणत्याही प्रकारचा अतिरेक नाही... स्पीकरचा आवाज सुद्धा अगदी नियंत्रित होता अशा प्रकारे सन २०२१ चा नवरात्र उत्सव यथासांग, विनाविघ्न पार पडला... सर्वांचे आभार मानण्यात आले. रोज रात्री ठीक ९.०० वाजता मंदिरात मोठ्या संख्येने उपस्थित रहाणे, नाकातोंडावर मास्क बांधून उपस्थित रहाणे, डेटॉल हँडवॉशने हातपाय धुऊन मंदिरात प्रवेश करणे... मंदिरात दर्शन करून बाहेर आखलेल्या 'दो गज दूरी च्या गोलां'मध्ये उभे रहाणे, ठीक ९.१५ वाजता गंगाधर भोगले व बबन गडगेकर हे दोघे आरती सुरू करणे आणि ठीक ९.४५ वाजता तेच दोघे समाप्तीचे 'घालीन लोटांगण' म्हणायचे... 'ढंपांग.. ढंपांग'. ढोलाचा आवाज करून झाला की लगेच गावकरांचे गऱ्हाणे.... या दरम्यान सचिन मेस्त्रींचे मोबाईल च्या सहाय्याने व्हिडीओ शुटींग.. फोटो शुटिंग... गऱ्हाणे झाल्यावर प्लास्टिक पिशवीत बंद केलेला खडीसाखरेचा प्रसाद... लगेच सर्वांचे घरी परतणे.. करोना संक्रमण कालावधीतील हे सर्व विलक्षण होते.... आणि म्हणून सर्व उपस्थितांचे अगदी मनापासून 'आभार' मानले होते... आरतीची चढाओढ नाही... केवळ खडीसाखरेचा प्रसाद असतो म्हणून कुणाची तक्रार नाही.. मंदिराच्या बाहेर उभे रहावे लागते म्हणून कुणाची कंप्लेंट नाही... कुणी मोठा नाही. कुणी छोटा नाही. ज्याला जिथे जागा मिळेल तिथे त्याने उभे रहायचे.... 'मी तू पणाची झाली बोळवण' हा अनुभव घेतला म्हणून आभार मानले होते. दसऱ्याच्या दिवसाला पुन्हा देवीला नटवणे.... श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळू पाटणकर, गोकुळ तात्या काजवे, अंकुश कांबळी, कैलास कांबळी, नरेश कांबळी, संजय कांबळी, परमार भावजी, महेश कांबळी हे सर्व अगदी त्यामध्ये सहभागी. होते... वार्षिक प्रथेप्रमाणे दुपारी सत्यनारायणाची पूजा यथासांग पार पडली... श्री. बबन गडगेकर सपत्निक पूजेसाठी बसले होते... या वर्षाला त्यांना तो 'मान' मिळाला होता.. पूजा सांगणारे जोशी बुवा... श्री. जयंत शंकर जोशी.. पूजेचा तीर्थ प्रसाद नेमस्त होता... सार्वजनिक प्रसाद वाटप नाही, तीर्थ वाटप नाही... आणि याबद्दल कुणाचीही तक्रार नाही... म्हणून साठी 'हे आभार.. '...

दसऱ्याला सोने लुटण्याचा कार्यक्रमसुद्धा नेमस्तपणे पार पडला.... सारे सारे नेमस्त झाले... 'एकच सोन्याचे ठिकाण'... प्रतिवर्षी अंजनेश्वर मंदिराच्या आवारात तीन ठिकाणी 'सोने'(आपट्याच्या फांद्या) पुरले जाते... या वर्षी एकाच ठिकाणी होते.. त्याच ठिकाणी सोन्याची पूजा... पूजा सांगणारे 'देवाचे जोशी.'... श्री. जयंतराव जोशी यांचे पूजा सांगणे... प्रतिकात्मक सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला.. लगेच देवाला सोने वहाणे.. 'आवडी करू तुझी शिवशंकरा. '.. मोहनदादा परांजपे यांच्या मागोमाग सर्वांनी आरती म्हणणे झाले... लगेच ताशांच्या गजरात मुहूर्ताई देवीच्या भेटी साठी सर्वांचे प्रस्थान झाले... सारे सारे नेमस्त होते.... मुहूर्ताई मंदिरात संध्याकाळी ठीक ५.१५ ला वाजंत्र्यासह पोहोचणे झाले. म्हणजे संध्याकाळचे ठीक ४.३० ते ठीक ५.१५ पर्यंतचा सोने लुटण्याचा कार्यक्रम पार पडला. अगदी 'रोचक' व तितकाच 'नेमस्त' झाला. शनिवार दि. १६.१०.२०२१ रोजी देवीचे दास्तान गांवकर श्री. विश्वनाथ कांबळी यांनी आणून दिले... श्री देवीचा चांदीचा मुखवटा, कर्णफुले, बुगडी जोड, तनमणी, सोन्याची ठुशी, चांदीचा हरकोल व वाघनख, 'सतरा पुतळ्या अधिक सतरा. पुतळ्या.. दोन सोन्याच्या पुतळ्यांचे हार..'.. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीचा कंबरपट्टा, चांदीची छत्री, साड्या नग एकूण २५ (नवीन १८ + जुन्या ७) दोन ढोल, लाकडी चौरंग, आदी सारे सारे जमा झाले.... आणि सारे 'कुलुप बंद'. झाले.

- **'काकडारती...'**

गुरूवार ४ नोव्हेंबर २०२१ 'नरक चतुर्दशी'चा दिवस... सन २०२० सालचा काकडारतीचा दिवस आठवला... शनिवार १४ नोव्हेंबर रोजी नरकचतुर्दशी होती... ती काकडारती 'मंदिर बंदी' मधील असल्यामुळे स्मरणात राहिली होती. अगदी लख्खपणे. आणि या वर्षीचीही काकडारतीही तितक्याच लख्खपणे स्मृती पटलावर वर्षानुवर्षे रेंगाळत राहील. कोरोनाचे

संकट कमी कमी झालेले असले तरी धोधो पाऊस पडलेला होता. विजांचा कडकडाट अन् गडगडाट 'खळखट्याक.'... रात्री पासून लाईटची बत्ती गुल झालेली होती. सकाळी काकडारतीला कुणी येईल की नाही अशी अकारण भ्रांत पडलेली होती. या भ्रांतीपायी सकाळी पावणे पाच वाजता मंदिरात जाणे झाले होते. मंदिरात गेल्यानंतर तसे सामसूम होते. कुणीच आलेले नव्हते. संतोष लिंगायताने जनरेटर पाजळल्यामुळे मंदिर तसे काळोखात नव्हते. टायमरचे सेटिंग बदलून लाऊड स्पीकरला पाच वाजता बोलते करावे लागले होते... स्पीकर वरची सनई चालू झाल्यामुळे जरा जागतेपण वाटू लागले होते. बालपणीचा मित्र संदीप राणे नुकताच आला होता. सोबत त्याचा मुलगापण होता... वाती पणत्या वाट पहात होत्या संदीपला पुकारा करून वातीपणतीचा बॉक्स त्याच्या ताब्यात दिला. तोपर्यंत भूषण कुळकर्णी, विजय शिंदे आले होते.. पणतीत वात... वातीला तेल... सोबत एक पेटती मेणबत्ती. मेणबत्तीने पहिली पणती पेटवली. एक एक पणती लागत गेली. हळूहळू लहानगे जमत गेल्यामुळे नगारखान्याच्या पासून पणत्या लागल्या. तटबंदीच्या दगडी पोवळीवर पणत्या जाऊन बसल्या. उजळलेल्या पणत्या 'प्रकाश संदेश' देत होत्या. तिमिराकडून तेजाकडे जाणारा मार्ग दाखवत त्या उजळून गेल्या होत्या. धूपपात्रात धूप घालायला लावल्यामुळे तो धुपाउदाचा मंद सुगंध सर्वत्र दरवळू लागला होता...
१०/२२ काकडे बांधून राहिलेले होते. अगदी सज्ज होते. परंतु तेलात भिजते केल्याशिवाय आयत्या वेळी पाजळणार कसे असा प्रश्न होता. म्हणून सारे काकडे तेलात भिजते करायला लावले. तोपर्यंत मोहनदादा परांजपे, बबन गडगेकर, मोहन मेस्त्री आदी आरतीचे पुढारी येऊन सज्ज झाले होते. साडे पाच वाजून गेले होते. नगारा वाजता झाला. समस्त भक्तजन आरती साठी उभे ठाकले. नेहमीचाच जप,... नेहमीच्याच चार आरती होत्या.. नवीन असे काहीच नव्हते. परंतु अशा भल्या पहाटे सुमारे दोन अडीचशे भाविकभक्त तोंडावर कोरोनाची मुसकी बांधून हजर होते. हे त्यातले 'महत्त्वाचे' होते ... नेहमीचे गोंदवलेकर महाराजांचे प्रवचन वाचन झाले... श्री. मोहनदादा परांजपे यांच्या दीपावली शुभेच्छा दिल्या. कार्तिकी उत्सवा बाबतचे प्राथमिक सांगणे झाले. सर्वांच्या हातावर पिशवीबंद बुंदीचा लाडू पडला. कडकडीत फक्कड चहा झाला. इथे काकडारतीचा शेवट झाला...

- **चूकभूल द्यावी घ्यावी**

मित्रांनो.... नमस्कार... श्री देवाचे कामकाज पहात असताना काही त्रुटी रहातात, काही वेळा एखादे नियोजन चुकते, काही वेळा अंदाज चुकीचे ठरतात... असे काही ना काही होतेच होते.... चुकीला माफी नसते.... परंतु चुकीचे समर्थन करायचे नाही व चुकीचे कामकाज रेटून न्यायचे नाही हा एक स्वभाव गुण असल्यामुळे एखादी चूक कुणी लक्षात आणून दिली तर त्याचा मागोवा घ्यायचा, त्यातील सर्व काही तपासून घ्यायचे .... मित्रांनो... गेल्या वर्षीच्या वार्षिक अहवालात श्री. जयंत गोपाळ देवधर व श्री. प्रदीप गोपाळ देवधर, पुणे यांनी प्रत्येकी रू. १००१ ची देणगी दिली मात्र त्यांच्या नावाची नोंद अनावधानाने राहिली होती.... या दोन्ही देणगीदारांची नोंद पुढील वर्षीच्या अहवालात जरूर घेतली जाईल, असे सांगितले होते.. देणगीपावती बनली, कीर्द खतावणीमध्ये या देणगीची नोंद झाली.. ह्या देणगीचे ऑडीटिंग अकाऊंटींग झाले... मात्र वार्षिक अहवालामध्ये नोंद घेण्याचे अनावधानाने राहिले... श्री. प्रदीप देवधर यांच्या लक्षात आले म्हणून त्यांनी आवर्जून कळवले... मित्रांनो... एखादी चूक, उणीव कळवली तर लक्षात येते.. अन्यथा काहीच लक्षात येणार नाही. सर्वांना माझी विनंती आहे की, एखादी चूक लक्षात आली तर अवश्य सांगा... संकोच ठेवण्याचे काहीच कारण नाही.. आपणही श्रीदेवाचे हितसंबंधी आहात, हितचिंतक आहात... एखादी बाब चुकीची वाटली तर अवश्य सांगा.. संकोच वाटायचे कारण नाही.

- **'कार्तिकोत्सवापूर्वीची जनरल सभा'...**

सन २०२१ मधील कार्तिकी उत्सवाच्या नियोजनाची जनरल सभा सोमवार दि. ०८ नोव्हेंबर २०२१ रोजी संध्याकाळी ठीक ७.०० वाजता संपन्न झाली. सभेची नोटीस दि. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी काढण्यात आली होती. सभेच्या नोटीशीला फेसबुक व व्हाट्सअॅप माध्यमातून प्रसिद्धी देण्यात आलेली होती. तसेच देवस्थान नोटीस बोर्डावर सभेची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. श्री. नरेश प्रिंदावणकर यांनी सर्व सेवेकरी मानकरी यांना नोटीशीची प्रत बजावली होती.. सर्व खोतमंडळींना सभेची नोटीस पोहोचवलेली होती. सूचना, लेखी पत्रव्यवहार करण्यासाठी पूर्ण पंधरा दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता. जनरल सभा ठीक संध्याकाळी ७.०५ मिनिटांनी सुरु झाली... अंजनेश्वर मंदिराच्या बाहेर कलामंचासमोरील शेडनेटच्या मंडपात सभा घेण्यात आली.. खुर्च्यांची आसनव्यवस्था करून, पोडीयम ठेवून स्पीकर–माईकची जोडणी करण्यात आली होती. सभेच्या प्रोसीडिंग बुकावर 'एकूण ५३' ची उपस्थिती प्रत्येकाच्या स्वाक्षरीसह नोंदली गेली. सभेचे व्हिडीओ चित्रीकरण अगदी सुरूवातीपासून करण्यात आले. त्यासाठी जैतापूरचे श्री. प्रशांत भडेकर अगदी वेळेपूर्वी उपस्थित होते .. 'श्रीदेवाच्या अध्यक्षतेखाली' जनरल सभा सुरू झाली. देवस्थान ट्रस्टच्या परिपाठामध्ये सभेची प्रोव्हीजन नसतानाही प्रत्येक उत्सवापूर्वी जनरल सभा अगदी नियोजन पूर्वक घेतली जाते. सन २००८ पासून वर्षाला दोन जनरल सभा (कार्तिकी उत्सवापूर्वी आणि शिवरात्री उत्सवापूर्वी) घेण्याची सुरू केलेली पद्धत अगदी विनाव्यत्यय चालू आहे. ट्रस्टच्या इंस्ट्रूमेंट मध्ये सभेचा अजेंडा काढणे, त्याची बजावणी करणे, सभेच्या नोटीशीला ठळकपणे प्रसिद्धी देणे, प्रोसिडिंगमध्ये उपस्थित मंडळींच्या स्वाक्षऱ्या घेणे, प्रोसीडिंग लिहीणे, ठराव मंजूर करणे, सूचक अनुमोदक असणे, कोरमने ठराव मंजूर करणे, प्रोसीडिंगचे जतन करणे आदी कोणतीही तरतुद ट्रस्टच्या घटनावलीमध्ये केलेली नसताना सुद्धा सन २००८ पासून अगदी प्रयत्नपूर्वक जनरल सभा घेऊन सारे सारे सर्वांना कळविणे, हे काहीसे आवश्यक आणि गरजेचे वाटते.. जनरल सभा अगदी जशी ठीक वेळी सुरू झाली तशी ठीक वेळी म्हणजे पावणे आठ वाजता समाप्त झाली. बँकजमा तपशील, मुदतठेवीचा तपशील, प्रतिमहा जमा होणाऱ्या व्याजाचा तपशील, एकमात्र सही शिक्याने चाललेला जमाखर्चाचा सर्व आर्थिक व्यवहार, एकमात्र सहीने होणारा बँकव्यवहार, सन २०२०/२१ मधला ऑडिट रिपोर्ट, वार्षिक अहवाल, कार्तिकी उत्सवाची ढोबळपणातील रुपरेषा, उत्सवातील एकूण कार्यक्रम, कोरोना बाबतची सर्वसामान्य नियमनियमावली, दानपेटीबाबतचा तपशील, देवस्थान जमीनमामल्यांबाबत न्यायालयाचे आदेश, अंजनेश्वर जमीन जागेवर शासन अनुदानातून उभ्या असलेल्या इमारतींचे हस्तांतरण, त्या इमारतींमधील रंगरंगोटी, डागडुजी आदींचा उल्लेख, उत्सवाबाबतच्या महत्त्वाच्या सूचना, सर्वांनी सहभाग घेण्यासाठी केलेला आग्रह आदी अनेक विषय जनरल सभेमध्ये विस्ताराने सांगण्यात आले... उपस्थितांना बुंदीचा लाडू व फक्कड कडकडीत चहा देण्यात आला आणि त्या नंतर सभा समाप्तीची घोषणा झाली. अगदी सुरूवातीला सांगितल्या प्रमाणे ठीक पावणे आठ वाजता सभेची समाप्ती झाली. केवळ पाऊण तासाची जनरल सभा. 'जे जे आपणासिं ठावे ते ते इतरांसि सांगावे(शिकवावे) शहाणे करूनी सोडावे'. हाच तो केवळ आणि केवळ प्रयत्न होता. सारे सारे शब्दात बांधले की एक 'दस्त' तयार होतो... दस्तऐवज हा भविष्यासाठी महाउपयोगी पडतो. शब्दात करकूचून बांधून ठेवलेला दस्त सहजासहजी बदलता येत नाही. विस्मरणाला पुन्हा जागृत करण्यासाठी हे 'शब्ददस्त', हे 'अक्षरदस्त' अगदी महत्त्वाचे असतात. त्याच्या जोडीला 'चित्रदस्त'(व्हिडिओ शुटिंग) असले तर अजून भक्कम आधार तयार होतो. नव्हे ती एक प्रकारची 'तटबंदी' तयार होते.

सोबतची माणसे बदलली तरी 'शब्ददस्त', 'चित्रदस्त' आपल्याला सहयोगी ठरतात. म्हणून हे करून ठेवायचे. जनरल सभेचे वैशिष्ट्य म्हणजे या जनरल सभेला श्री. शमशुद्दीन मिर तथा शमशुदादा मिर आवर्जून उपस्थित होते.. सभेला उपस्थित रहाण्यासाठी सांगितले होतेच.. परंतु 'सांगणे' मनावर घेऊन उपस्थित रहाणे महत्त्वाचे.. तसेच दोन महिला प्रतिनिधींची उपस्थिती... आणि त्यांचे अगदी पहिल्या रांगेत बसणे हे सभेचे वैशिष्ट्य समजले पाहिजे... जनरल सभा अगदी उत्साहात पार पडली.

- **कार्तिकोत्सव २०२१.. ‘उत्सवाचा पहिला दिवस’’**

.सन २०२१ सालचा कार्तिकोत्सव चिरंतन स्मरणात राहील असा झाला. पहिल्या दिवसापासून पावसाचे सावट, ढगाळ वातावरण, कोरोनाचे संकट कमी झाले तरी सामान्य निर्बंध कायम असताना निर्विघ्नपणे पार पडलेला उत्सव सर्वांच्याच स्मरणात राहील असा झाला. मंदिराच्या तीनही बाजूला उभारलेला शेडनेटचा मंडप.. सुमारे ५००० स्क्वेअर फुटाची मंडप व्यवस्था ... श्री. सय्यद सुलेमान हसोळकरांनी केलेले वेल्डिंग वर्क आणि श्री. भगवान पावसकरांनी शिलाईकाम केलेले शेडनेटचे झालरीचे छत यामुळे मंडप लक्षवेधी सजला होता. संपूर्ण मंदिर प्रदक्षिणा मार्गावर दोन फुटी शेडनेटचा पट्टा टेकस लावून फिट्ट केलेला होता. पाऊस पडला तरची ती सोय होती. श्री. भगवान पावसकर आणि रफिक हसोळकर यांनी पालखीसाठी प्लास्टिक छत तयार करून दिले होते. सुमारे ३० फूट लांब व १०/१२ फूट रूंद ‘प्लास्टिकचे छत’तयार होते. ते धरून ठेवण्यासाठी दोन्ही बाजूला स्टिल दांड्या तयार केलेल्या होत्या. ते उचलून धरण्यासाठी श्री. रमेश काजवे, श्री. नरेश कांबळी यांनी सर्व माणसांची जोडणी केली होती.. सारे सारे सज्ज होते. संपूर्ण मंदिराचे छप्पर सिंगल रेड कलरने रंगवलेले, कठडा तटबंदीला रंगरंगोटी, नगारखान्याचे रंगकाम, भक्तनिवासाचे इमारतीला रंगाचा टच अप, पाठीमागच्या धर्मशाळेच्या इमारतीची बाहेरून रंगरंगोटी, शेजारचा सांस्कृतिक कला केंद्र हॉल, पुरुष प्रसाधनगृह, स्नानगृह, महिला शौचालय या सर्व इमारतींना रंग रंगोटीने नटवलेले होते... रंगसाहित्याचा पुरवठा साहिल ट्रेडर्स, नाटे यांच्याकडून झाला होता. माफक दरदाम लावून आणि आपुलकीने रंगाचा पुरवठा केला म्हणून त्यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. कोरोनासाठी दोन सॅनिटायझर मशीन सभामंडपात बसवण्यात आली होती. श्री. अक्षय तिवरामकरांची संपूर्ण मंदिराला लावलेली विद्युत रोषणाई, एलईडी फोकसांची रोषणाई.. आणि सोबत गिरीश धनावडे यांनी तटबंदीला उभी केलेली रोषणाई, आणि नरेश कांबळी यांनी सभोवतालच्या मंडपामधील केलेली रोषणाई हे सर्व आकर्षित करणारे होते, मंदिराच्या बाहेर दांडेगावच्या श्री. संजय सत्यविजय मयेकर यांच्या जनरेटरने परिटकोंडी पर्यंत केलेला सुमारे दीडदोनशे एलईडी बल्बचा झगमगाट, हे सुद्धा एकूण रोषणाई मध्ये भर घालणारे झाले होते.. नवीन विहिरीच्या समोरची कंपाउंड वॉल नव्याने बांधलेली असल्याने... त्यावर एलईडी बल्बची रोषणाई करण्यात आली होती.. मंदिराच्या परिसरात सर्व भाविक भक्तांचे स्वागत करण्यासाठी फुलांनी डवरलेल्या पन्नास/पंचावन्न कुंड्या होत्या,.. सोबत लाल, पिवळ्या, पांढऱ्या अन् जांभळ्या रंगाच्या कमळ फुलांच्या १० कुंड्या ठेवल्या होत्या... मंदिराच्या आतबाहेर दोन्ही ठिकाणच्या हातपाय धुण्याच्या पाणवठ्यावर डेटॉल हँडवॉशची मशीनची सुविधा केली होती.. दोनदा हातपाय धुऊन मंदिरात प्रवेश करण्याची ती सोय होती. दोन चप्पल स्टँड चपलांच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते. बाहेर देणगी स्वीकारण्यासाठीचे ऑफिस सज्ज झाले होते. श्री. विलास चेऊलकर यांच्या पुढाकाराने तिथे सर्व मांडणी पूर्ण झाली होती. तिथे वायफाय जीओ फोन टॉवरची तात्पुरती जोडणी केली होती. ऑनलाईन देणगी स्वीकारता यावी म्हणून ती सोय केलेली होती. क्यूआर कोडने थेटपणे देणगी श्रीदेवाच्या खात्यात पाठवण्याची सोय झाली होती... हे यावर्षीचे ‘इनोव्हेशन’होते.... तशी सोय शिवाजी चौकात श्री. सचिन मेस्त्री यांच्या दुकानात सुद्धा केली होती... देणगीदारांना सुलभतेने देणगी देता यावी म्हणूनची ती सोय केली होती.. दूरस्थ भाविक भक्तांना ‘लाईव्ह फेसबुक’ माध्यमातून उत्सव पोहोचवता यावा म्हणून राजापूरच्या श्री. अविनाश केळकर यांनी आपला वेळ खर्च करून जीओचा टॉवर फोन उभारून दिला होता. सारे सारे उत्सवासाठी सज्ज झाले होते. लिंगायत गुरवांचे शेणसारवण पाचसहा दिवसांपूर्वीच पूर्ण झाले होते. श्रीमती विमल धनावडे, शोभा भातडे, आशा तांबे, आदींनी बाहेरील पाखाड्यांवरील शेणसारवण पूर्ण केले होते... शेडनेट पायघडीच्या दुतर्फा प्रदक्षिणा मार्गाला श्री. विजय वामन लिंगायत याने अत्यंत मेहनतीने रांगोळी साकारली होती. पालखी सजावट आदी उत्सवाच्या आदल्याच दिवशी झाल्यावर सोनार पाटणकर मंडळी श्री. बाळूशेठ पाटणकर, श्री. संतोष पाटणकर, केदार पाटणकर, अन् अंजन पाटणकर ही गावातील सोनार पाटणकर वंशमंडळीनी देवाला घासणे, पुसणे, रंगवणे, सजवणे हे वर्षानुवर्षाचे काम अगदी मनापासून व श्रद्धा पूर्वक केले होते.. सोबत लिंगायत मंडळींनी पालखी सजावटीचे काम केले होते. रंगरंगोटीसाठी घेतलेले

ब्रश अन् रंगाचे डब्बे डुब्बे पाठल्या खोलीत गेले होते. त्यांनी आपापले काम केले होते अन् ते मोकळे झाले होते. रामदास रायकर, संतोष शिंदे, बबन गडगेकर, राजा राणे, संतोष लिंगायत, संतोष मसूरकर, राजा भातडे, साहिल लिंगायत, शुभम लिंगायत, प्रसन्न लिंगायत, मनोज कांबळी, तुषार लिंगायत, साईराज लिंगायत, आणि या सर्वांचे पुढारी नरेश कांबळी हे गावातले कलाकार. 'गावठी कलाकार' आपापली कामे आटोपून सुशेगात झालेले होते... खडीसाखर अंगारा भरून प्लास्टिक पिशव्या सुमारे तीन चार हजार तयार होत्या... कोणी पाणीपुरवठा व्यवस्था सांभाळायची, कुणी चहापान व्यवस्था सांभाळायची, कुणी डेटॉल हँडवॉश फिलींगचे काम पहायचे, कुणी हँड सॅनिटायझेशन करायचे, तेलाची बुदली कुणी घ्यायची, पंचारत कुणाच्या हाती ठेवायचे, पेट्रोमॅक्सच्या बत्त्या कुणी धरायच्या, परिसराचे सॅनिटायझेशन कुणी करायचे, हे सर्व नियोजन झाले होते. सार्वजनिक चहा व्यवस्था कलामंचावर केली होती. हेतू असा होता की चहाची तलफ येणाऱ्या सर्वांना देवाकडचा कडकडीत चहा गर्दी न होता मिळावा. हे सारे सारे, सर्व नियोजन करता यावे म्हणून लिंगायत गुरवाला एक कागद करून दिला होता की जेणेकरून त्या त्या जबाबदार व्यक्तीचे नाव टिपले जाईल... जबाबदारी त्या त्या व्यक्ती वर रहावी,.. नियंत्रण करायला सोयीचे होते व सोपे होते. नियोजनाचा कागद देणे म्हणजे अधिकार गाजवणे, हुकुमत गाजवणे असा कुणी काढला तर ते दुर्दैवी म्हणायला पाहिजे. पूर्वी उत्सव मर्यादित होता. पसारा नेमस्त होता.. आय–व्यय अगदी नेमस्त होती. नियोजन करण्याची फारशी गरजच नव्हती. ना तसा विचार कुणी केला ना कुणी नियोजनाच्या फंदात पडले होते.. सारे हलत डुलत चालत होते. आत्ता तसे नाही. सारे सारे अंजनेश्वरच्या ठोक्याच्या घडाळ्यावर चालते. म्हणून ते नियोजन आणि म्हणून 'नियोजनाचा कागद' महत्त्वाचा.. गिरिष धनावडे चा स्पीकर लागला. टिमकीसह ढोल वाजू लागले. हो टिमकी सह. !!!!. यंदा अंजनेश्वरची स्वतःची टिमकी वाजली... श्री. उमेश काजवेंनी मुंबईहून खरेदून पाठवली होती... रात्री साडे आठला ही इशारत झाल्यामुळे सर्व पावले मंदिराच्या वाटेला लागली.. रात्रौ ठीक ९.०० च्या ठोक्याला सदानंद तथा राजा लिंगायतने धुपारतीची घंटा वाजवली... वाघबीळच्या श्री. गणपत बावकरांचा नगारा लागला. श्रीमती धनलक्ष्मी चेऊलकरांनी दिलेला स्पीकर तात्पुरता थांबला होता.. नगाऱ्यासाठी त्यांनी उसंत घेतली होती.... धुपारतीचे ढोल बडवणे चालू झाले. कांचनवाडी मित्र मंडळी नी ठेका धरला.. नगारखान्यावरच हे ढोल बडवणे चालू होते. त्यानंतर ते स्वागताचे 'दोन शब्द' माझ्या पदरचे. स्वागतापेक्षा खुट्टे घट्ट करण्यासाठीचे 'ते दोन शब्द'..... समर्थ रामदासांचे दासबोधीचे सांगणे माझ्या शब्दात–

'नको रे मना वाद हा खेदकारी । नको रे मना भेद नाना विकारी ।
नको रे मना सीकवू पूढीलांसि । अहंभाव जो राहिला तूजपाशी ।।
अहंता गुणे सर्वही दुःख होते । मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते ।
सुखी राहता सर्वही सूख आहे । अहंता तुझी तूंचि शोधून पाहे ।।
अहंता गुणे नीति सांडि विवेकी । अनीती बळे श्लाघ्यता सर्व लोकी ।
परि अंतरी सर्वही साक्ष येते । प्रमाणांतरे बुद्धी सांडुनि जाते ।।''

अभिमान, अहंकार, त्यातून उत्पन्न होणारे वादविवाद हे सर्व बाहेर ठेवून या, हे ते सर्वांना सांगणे होते 'First day first lesson !!!.' अहंकाराच्या चपला बाहेर काढून या, हे सांगणे समर्थांच्या दासबोधीचे प्रकाशात. 'अहं हा धूप जाळू', केवळ आरती म्हणण्यापुरते नको, हे ठासून सांगणे. चहाची सोय कलामंचावर केलेली आहे. सर्वांनी चहाचा आस्वाद घ्या, हे विनंतीपूर्वक सांगणे. पाच दिवसांमधील एकूण कार्यक्रमाची रूपरेषा... कोरोनाची गाईडलाईन लक्षात घेऊन केलेली चहापान व्यवस्था. नवीन सुधारणा करताना थोडेफार काहींना गैरसोयीचे वाटते, हक्क अधिकार यांना बाधा आली असे वाटते. श्री. मोहनदादा परांजपे यांच्या नेतृत्वाखालील ॐ नमः शिवाय चार जप व त्यानंतर 'आवडी गंगाजळ'ची आरती झाली...

'हलके चलो... नजर रखो!!!', ची मसुरकर महालकरीची सलामी झाली... पालखी प्रदक्षिणेला सुरुवात.. काजवे कांबळीच्या खांद्यावर पालखीतून श्रीदेवाचे विराजमान होणे.... मोहिते, प्रिंदावणकर, गवाणकर या परिटवंशाच्या मशालीच्या प्रकाशातील उत्सव समारंभ... काहीसा विलक्षण... मटकरीवंशाने अब्दागीर धरणे.. सारे सारे साचेबंद.. मोरेचेलाने वारा घालणारे सोनार पाटणकर... पंचारतीचा मानकरी किल्लेकर लिंगायत वंशातील सुधाकर.... हिलालबीडी लिंगायत गुरवांचे हाती.. व हे सर्व मसुरकराच्या चांदीच्या काठीच्या धाकात..... पालखीतल्या देवाला देसाई लोकांनी वारा घालायचा. चांदीच्या चवरीने अगदी दुसरी तिसरीच्या इयत्तेत असल्यापासून ती सेवा करून माझी हौस फिटलेली होतीच.. अनायसे चारपाच देसाई मंडळी पुणे, फलटण, नाशिक, औरंगाबाद वरून आली होती. श्री. नित्यानंद जयंत भोगलेदेसाई, श्री. पंकज लक्ष्मण देसाई, चि. प्रणव पंकज देसाई, श्री. अरविंद लक्ष्मण देसाई, नाशिक निवासी श्री. योगेश्वर देसाई, श्री. नितीन विश्वनाथ देसाई, श्री. गजानन त्रिंबक देसाई, श्री. अविनाश दत्तात्रय देसाई आदी आलेली होती व काही येणारी होती.... (****भोगलेदेसाई वंशामधल्या माहेरवाशिणी सासरवाशिणी सुद्धा आल्या होत्या.)... यावर्षी चांदीच्या चौरीने श्रीदेवाला वारा घालण्याचे 'पुण्य' त्यांचे त्यांचे नशिबी रहावे म्हणून त्यांना चांदीची चौरी सुपूर्त केली होती.. पालखी प्रदक्षिणा 'सोमसूत्री' पध्दतीची... एकूण ९ स्टेशनची 'प्रदक्षिणा' नऊ ठिकाणी गाणी .. अभंग नाट्यगीत आदी... 'देव देव्हाऱ्यात नाही' या पदाने सुरुवात झाली. पहिल्या दिवशी पासून उत्सवाचे फेसबुक लाईव्ह प्रक्षेपण श्री. मंदार परांजपे आणि सचिन मेस्त्री या जोडगोळीने सर्वांपर्यंत पोहोचवले. खरे तर युट्युब लाईव्ह चा बेत होता परंतु ते शक्य झाले नाही म्हणून फेसबुक लाईव्ह झाले.. अनेक दूरस्थ भाविक भक्तांनी या लाईव्ह फेसबुकमुळे पालखी प्रदक्षिणेचा लाभ घेतला. नोकरी निमित्त, वार्धक्यामुळे, आजारपणामुळे जे येवू शकले नाहीत त्यांची सोय झाली. पालखी प्रदक्षिणेनंतर चहापान करून ह. भ. प. दत्तात्रय पोखरणकर यांचे कीर्तन सुरू झाले, .. ऑर्गनसाथीला श्री. मनोहर विष्णू तथा उदय गोखले आणि तबला साथीला श्री. विजय ठाकूरदेसाई, राजापूर होते.. कीर्तनाची पहिल्या दिवसाची सांगता ठीक रात्रौ १२.०० झाली.. लगेचच पहिल्या दिवशी उत्सव सुरुवात झाली म्हणूनचे गाऱ्हाणे झाले. 'जय देवा अंजनेश्वर महाराजा. सांभाळ कर आणि बरे कर'... असे ते सुधाकर लिंगायत गुरवाचे जलदचालीतले गाऱ्हाणे झाले... 'हर महादेव'चा गजर झाला. इथे पहिल्या दिवशीची सांगता झाली...

- **कार्तिकोत्सव २०२१. 'उत्सवाचा दुसरा दिवस'...**

उत्सवाचा दुसरा दिवस म्हणजे प्रबोधिनी एकादशीचा दिवस... 'तुलसीविवाहाचा दिवस'.. 'कार्तिकी एकादशीचा दिवस.' '... 'चातुर्मास समाप्तीचा दिवस'... देवशयनी एकादशीला म्हणजे आषाढी एकादशीला झोपी गेलेले भगवंत जागे होण्याचा दिवस म्हणजे कार्तिकी एकादशीचा दिवस. महालय समाप्तीचा दिवस.... भाद्रपद कृष्ण प्रतिपदेला महालय (म्हाळवस) सुरु होतो तो कार्तिकी एकादशीला संपतो .. हिंदू दिनदर्शिकेमधला महत्त्वाचा दिवस.... मंदिरात सकाळ पासूनच भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दावळ सुरु होती. सकाळी सव्वा सहा वाजतानाची स्पीकर वरची बिस्मिल्ला सनई चालू झाली... नित्याची नित्य पूजा, धुपारत ठीक सकाळी सातच्या ठोक्याला झालेली होती. सकाळपासून दिवसभर भाविक भक्तांचा दर्शनासाठी येण्याचा ओघ मोठा होता.. संध्याकाळी साडे सात वाजता पुन्हा ढोल ताशांनी ठेका धरला होता... तुळशीविवाहाचा दिवस असल्याने ढोल ताशांना मागे सारत 'टिमकी' सरसावली... तासा टिमकीचे लग्नवाद्य देविदास रायकरांनी सुरु केले... देवाचे जोशी श्री. जयंत शंकर जोशी अगोदरच येऊन तुळशीविवाहाची मांडामांड करुन निश्चिंत बसले होते.. मी सहजपणे म्हटले, 'जयंतराव अजून बराच वेळ आहे... तुम्ही इतके लवकर कसे काय आलेत ??' .. जयंतरावांचे तत्काळ उत्तर 'डॉक्टर, माझ्यामुळे विलंब झाला असे व्हायला नको म्हणून लवकर आलो...' इतके वर्षांची अंजनेश्वर चरणातली अविरत सेवा... आदल्या वर्षीचा एकदाचा खंड वगळला तर कधीच या सेवेत खंड पडलेला

नव्हता... तुळशीविवाहाला या वर्षी यजमान म्हणून श्री. पंकज देसाई सपत्नीक बसले होते.... मंदिरातल्या तुळशीविवाहाला यजमान सपत्नीक बसण्याची ही पहिलीच वेळ होती... 'उत्सवातील ही इनोव्हेशन' होते. ठीक सव्वाआठ वाजता तुळशीविवाहाच्या समारंभाला सुरुवात झाली... जयंतरावांनी आचमनाचे मंत्र म्हणण्यास सुरुवात केली.... महागणपती पूजन झाले... कलश, शंख, घंटा, दीप पूजन झाले... तुळस पूजन झाले.... गोपाळकृष्ण पूजन झाले.... 'नैवेद्यं समरपयामि' झाले... आर्तिक्यं समरपयामि झाले... आरती झाल्या.... अक्षतांचे वाटप झाले... जयंतरावांनी आणि प्रकाश परांजपे यांनी अंतरपाट धरला.. 'शुभमंगल सावधान' जयंतरावांनी मंगळाष्टकांना सुरुवात केली... आवाज क्षिणला होता पण उमेद हरली नव्हती... शाम गवाणकर, मोहनदादा परांजपे, प्रकाश परांजपे यांनी दोन चार मंगळाष्टके झाल्यावर शेवटचे 'तदेव लग्नं' जयंतरावांनी सुरू केले... हो.. ते शेवटचे होते... शेवटचे होते हे त्यावेळी लक्षात आले नाही... पुन्हा तासेवाजंत्री वाजली... तुळशीविवाहाची खडीसाखर वाटप झाले... ब्राह्मण दक्षिणेचे पाकिट यजमानांकडून जयंतरावांच्या हाती दिले... दुसरे दक्षिणेचे पाकीट श्री. प्रकाश परांजपे यांच्या हाती.... तिसरे पाकीट जयंतरावांना दिले... ' जयंतराव... पायी पायी जावू नका... रिक्षाने जा...' म्हणून ते पाकीट दिले आहे... 'डॉक्टर, मी आत्ता थांबणार नाही... लवकर निघणार आहे... चहा घेऊन निघतो' जयंतराव निघून गेले.... रात्रीचे ९.०० वाजले... नेहमीची इशारत, धुपारत सुरु झाली... दुसऱ्या दिवशीचे माझे 'दोन शब्द''..... समर्थ रामदासांच्या दासबोधीचे विचार....

'नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मना लोभ हा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभ भारू ।। ''

'मत्सर' हे अभिमानाचे जुळे भावंडं... अभिमाना पाठोपाठ मत्सर धावतो..

'दंभो दर्पोअभिमानश्च क्रोध: पारूष्यमेवच
अज्ञानं च अभिजातस्य पार्थसंपदमासुरीम् ।''

समर्थ रामदासांच्या दासबोधी विचारांना भगवान श्रीकृष्णांच्या भगवद्गीतेतल्या विचारांची फोडणी.. थोडक्यात 'मंदिरात येताना अभिमान, मत्सर हे घरी ठेवून या', हे ते सांगणे होते.... पेपरलेस व्यवहार होण्यासाठी व्हाट्सएप मोबाईल क्रमांकाची नोंद करा असे आवाहन.... त्यासाठी एका ड्रॉपबॉक्सची सोय केल्याची सूचना.... कुणाच्या शंका, सूचना, तक्रारी असतील तर त्या साठी सूचना ड्रॉपबॉक्सचीची सोय केली आहे, असे सांगितले. सर्वांनी चहापानाचा आस्वाद घ्या. सर्वांना चहापानाचे आवाहन.. कलामंचावरील चहापानाच्या केलेल्या सोयीचे प्रमोशन करण्याचा तो प्रयत्न होता.. मित्रांनो... बाहेर ठेवलेल्या चहापानाचा आस्वाद महिला पुरुषांनी घेतला... लहान लहान मुलांनी चहाचा आस्वाद घेतला... ३००-४०० कप चहा करावा लागला.... नेहमीचाच पाच मिनिटांचा जप, आरती झाली, पालखी प्रदक्षिणा झाली... पुन्हा 'लवथवती विक्राळा ' अनंत कोटी ब्रह्मांड नायकाचा उद्घोष... पुन्हा मसुरकराची ललकारी... ' मेहरबान सलाम .. ' कलामंचावरील सार्वत्रिक चहापान झाले.... पहिल्या दिवसापेक्षा आज चहा घेणाऱ्यांची संख्या वाढली.... श्री. दत्तात्रय पोखरणकरांचे कीर्तन सुरु झाले. कीर्तनाला उपस्थिती लक्षणीय.... मध्यंतराला कु. अदीती जोशीचे गाणे झाले.. कीर्तन रात्री सव्वा बारा वाजता संपले... 'हेचि दान देगा देवा.. '' झाले अन् दुसऱ्या दिवशी च्या उत्सवाची समाप्ती झाली...

- **कार्तिकोत्सव... २०२१**

**' उत्सवातील तिसरा दिवस'** . प्रतिवर्षी उत्सवातील तिसरा दिवस लघुरूद्र स्वाहाकारासाठी रिझर्व्ह असतो... परंतु या वर्षी अनेक मुंबईकर मंडळींनी आग्रहाची विनंती केल्यामुळे तिसऱ्या दिवशीच्या लघुरूद्र स्वाहाकाराचे नियोजन उत्सवाच्या चौथ्या दिवशी केले.. त्यामुळे तिसरा दिवस तसा मोकळा होता.... सकाळी नेहमी प्रमाणे सव्वा सहा वाजता

सनईचे मंगलध्वनी स्पीकर वरून सुरू झाले... सात वाजता पूजा धुपारतीचा नगारा वाजला... तिसऱ्या दिवशीही सकाळ पासून भाविक भक्तांची वर्दावळ सुरू होती... दिवसभर पाऊस भरून राहिलेला होता... धो धो पासून अनेक ठिकाणी पडल्याच्या खबरा कानी पडत होत्या... पाऊस पडला तर उत्सवामध्ये विघ्न येणार... अनेकांच्या चेहऱ्यावर ही काळजी दिसत होती.... आणि ती काळजी अंजनेश्वरच्या उत्सवाच्या आपुलकीचे पोटी होती... रात्रीचे साडे आठ वाजले. पावसाची थोडीथोडी रिमझिम सुरू झाली होती.... मात्र इथे कुणासाठी थांबायचे नाही हे सूत्र कायमचे घट्ट केलेले असल्यामुळे सदानंद लिंगायतांनी ठीक रात्रौ ९. ०० वाजता घंटा धुपारत सुरू केली.. ''ढंपांगढपांग... ढंपांगढपांग'' हे इशारतीचे धुपारतीचे ढोल वाजू लागले.. सर्व भाविक भक्त सभामंडपी आले... मंदिराच्या बाहेर पावसाने जोर धरला होता.... तिसऱ्या दिवशीचे 'दोन शब्द.. '.. समर्थ रामदासांच्या मनोबोधाच्या प्रकाशात....

'यथासांग रे कर्म ते ही घडेना । घडे कर्म ते पुण्य गाठी पडेना ।
दया पाहता सर्वभूती असेना । फुकाचे मुखी नाम तेही वसेना ।।
अतिलिनता सर्व भावे स्वभावे । जना सज्ञनांलागी संतोषवावे ।
देहेकारणे सर्व लावीत जावे । सगुणी अतीं आदरेसीं भजावे ।। '

कोणतेही काम यथासांग, मनापासून व स्वप्रेरणेने झाले तर आणि तरच थोडेसे पुण्य गाठी पडते... कोणतेही काम मनापासून केले नसेल तर पुण्य कसे मिळणार ???? 'जे काय करायचे आहे ते मनापासून करा', असे ते साधे सांगणे होते.... परंतु ते समर्थांच्या शब्द प्रकाशात सांगितले.... 'नम्रतेने कार्य झाले पाहिजे', असा तो एक विचार... 'अंजनेश्वर मंदिर ही माझी एक शाळा आहे.. आणि मी त्या शाळेतला एक विद्यार्थी आहे.. ' हे पुढचे सांगणे.... चौथ्या दिवशीच्या यज्ञ स्वाहाकाराला उपस्थित रहाण्याचे आमंत्रण सर्वांना दिले होते....

'अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभव: ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञ: कर्मसमुद्भव: ।। .. ' भगवद्गीता ३ अध्याय १४ वा श्लोक

' पाऊस पडण्यासाठी यज्ञ'... हे सांगत असताना बाहेर पावसाने जोरात सुरुवात केली होती. मित्रांनो... सर्वांना आश्वस्त करण्याचा तो प्रयत्न होता.... 'पाऊस पडू दे.... पाऊसाला शिव्या शाप देण्याची गरज नाही'... 'आपण आपले काम करुया'... कारण यज्ञस्वाहाकाराचे प्रयोजन 'पाऊस पाडणे' हेच आहे.... हे सांगितले... थोडे दानपेटीबाबत सुध्दा सांगितले.... आयकर कायदा व दानपेटीतील दान याबाबत दुसऱ्या दिवशी एका भक्ताने एक स्वाभाविक प्रश्न उपस्थित केला होता... त्याचे निरसन आयकर कायद्यातील तरतुदी अगदी कायद्याचे सेक्शन 269ST व 271 DA हे सांगून केले होते... दानपेटीतील दान या धार्मिक ट्रस्ट साठी १००% करमाफीस पात्र आहे.... शंका निरसीत झाली.... थोडेसे दानपेटीचे 'प्रमोशन' करण्याचा तो एक प्रयत्न होता.

'दातव्यमिति यद्दानं दीयते अनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ।।''

'अनुपकारिणे' हे महत्त्वाचे... परतफेडीची अपेक्षा न धरता केलेले दान, देणगीपावती न करता केलेले दान 'पुण्य दायी' दान.... १ रुपया पासून लाखो रूपयांपर्यंत देणगी देण्यासाठीची सोय केली आहे... धाडसाने केली आहे.... कायद्याच्या चौकटीत राहून केली आहे.... मंदिराच्या दैनंदिन व्यवहारात ढवळाढवळ होणार नाही, लिंगायत मंडळींच्या 'पुजारी

मिळकती'वर गदा येणार नाही असे सर्व लक्षात घेवून दानपेटी बसवलेली आहे... ह्या मधील दान धार्मिक कार्यासाठी, यज्ञयागासाठी अथवा देवासाठी चांदीची पालखी, सिंहासन बनविण्यासाठीच खर्ची होणार आहे... स्वतंत्र दानपेटी खाते .... स्वतंत्र हिशोब..... पंचसाक्षीने दानपेटी उघडणे आदी.... जरा थोडे विस्ताराने दानपेटीचे प्रमोशन केले होते.. ट्रस्ट १९५२ सालात स्थापन झाला... दानपेटी तेव्हा पासून बसायला पाहिजे होती हे सांगितले... हेतू हा की दानपेटी बसविणे ही एक मंदिराच्या बाबतीत कायदेशीर प्रक्रियेचा भाग आहे. पाऊस थांबत नव्हता म्हणून थोडे विस्ताराने सांगणे झाले... माझे दोन शब्द संपवले.... आरती सुरु झाली... भगवान पावसकरांनी तयार केलेले प्लास्टिकचे छत कामी आले... सुमारे ३० फूट लांब व १५ फूट रूंद असे ते प्लास्टिक छत... संपूर्ण पालखी सोबतचे काजवे–कांबळी भोई, अब्दागीराचे मटकरी कांबळी सारे सारे त्या प्लास्टिक छतामध्ये राहिले... रमेश काजवे, नरेश कांबळी, गोकुळ तात्या, अंकुश कांबळी, विश्वनाथ कांबळी, गावातील सुतार मंडळी, कांचनवाडी, कुळंबौशी येथील काही पाईपचे टेकू लावून ते छत धरून चालू लागले.. . 'गोवर्धन पर्वताच्या कथेची आठवण झाली'.... पावसाचा एक थेंब सुध्दा पालखीवर पडू दिला नाही.... पालखीसह ते प्लास्टिक छताचे जुगाड प्रदक्षिणा मार्गावर फिरले.. पावसाचा जोर काहीसा कमी झाला... त्या पावसात सुद्धा पालखी प्रदक्षिणेला पहिले गाणे म्हणण्याची हौस फेडून घेतली... हो.. यंदा तसे ठरवलेच होते... यंदा भोगले देसाई वारसवंशाची मंडळी पुण्यामुंबईहून आली होती व काही येणार होती... त्यामुळे चांदीच्या चौरीने देवाला वारा घालायचा देसाई घराण्याचा मान त्या नवागतांना हॅंड ओव्हर केला होता..... 'Real happiness lies in the happiness of others.... ' चौरीने वारा घालायचा मान अगदी सहजपणे मिळाला म्हणून त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद जास्त सुखावणारा वाटत होता..... कोणत्याही मंदिरात 'मान' ही गोष्ट एक विलक्षण असते.... मान देईन पण 'मान' सोडणार नाही. , असा हट्ट असतो.... तो हट्ट कुणी हिरावून घेतला तर तंटे बखेडे होतात... परिणामी उत्सव खुंटीला लागतात..... मान दिल्याने 'मान ' वाढतो, वाढत जातो... तिळमात्र कमी होत नाही, हे समीकरण पक्के माहितीचे असल्याने येथे कधीच अडचण आली नाही.... येणार सुद्धा नाही.... त्यादिवशीची पालखीप्रदक्षिणा काहीशी रंजक वाटली... भगवान पावसकरांचे आभार मानले... पालखी मंदिरात आली, सर्वांचे चहापान आटोपून कीर्तन सुरु झाले तेव्हा पावसाने पुन्हा जोर केला.. कीर्तन ठिक रात्रौ १२ ला संपले... हेचि दान देगा देवा झाले तेव्हा ठोम पाऊस पडला.... मंदिरातून घरापर्यंत भिजत, धावत यावे लागले... तिसऱ्या दिवशीच्या उत्सवाची इथे समाप्ती झाली... मित्रांनो.. सुरुवातीला प्लास्टिकचे छत बघून काहींनी तोंडे मुरडली होती... 'याचा काय उपयोग, हे कसे धरणार. '. असे नानाविध प्रश्न, चेष्टा स्वाभाविकपणे झाल्या... तर रमेश काजवेंनी त्यात काही सुधारणा सुचवल्या... स्वतः च्या उपस्थितीत चौथ्या दिवशी रफिक हसोळकर आणि भगवान पावसकरांच्या मदतीने त्यात सुधारणा करून घेतल्या... व ते जुगाड पुन्हा मंदिराच्या कलामंचासमोर आणून ठेवले... पुढील दोन दिवस पाऊस नसल्याने त्याची तशी गरज भासली नाही... परंतु पावसामुळे ते प्लास्टिक छताचे मॉडेल तयार झाले... कधीही उपयोगी पडेल.. पाऊस असल्याने तिसऱ्या दिवशी चहाची मागणी वाढली... लहान मुले, माता भगीनींनी गरमागरम चहाचा आस्वाद घेतला... सुमारे २५०–३०० कप चहा झाला... या कपभर चहाचा परिणाम चांगला झाला आहे... प्लास्टिक छताचा उपयोग उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी झाला... तेव्हा त्याचे महत्त्व समजले.... अनेकांनी अगदी भेट घेऊन त्या बाबत कौतुक सुद्धा केले... ज्यांनी सुरूवातीला तोंडे मुरडली होती ते सुद्धा जवळजवळ येवून तारीफ करायला लागले होते....

- **'कार्तिकोत्सव २०२१... ' उत्सवाचा चौथा दिवस'...**

.. प्रतिवर्षी तिसऱ्या दिवशी असणारा यज्ञस्वाहाकार चौथ्या दिवशी संपन्न झाला.... मुंबईकर मंडळींना सहजपणे या कार्यक्रमात उपस्थित राहाता यावे म्हणून केलेली ती सुधारणा होती.. सामान्यपणे मुंबईकर यात्रेच्या आदल्या दिवशी, त्रिपुरी पौर्णिमाच्या आदल्या दिवशी गावी येतो.. त्रिपुरी झाली की दुसऱ्या दिवशी पुन्हा मुंबईस परतीला निघतो.. अनेकांचे

अनेक वर्षांपासूनचे हे व्रतच आहे.. त्यात कधीच खंड पडत नाही.. अशा मुंबईकरांनी केलेला प्रेमळ आग्रह मोडता आला नाही... तिसऱ्या ऐवजी चौथ्या दिवशी यज्ञस्वाहाकार करायचे ठरवले... देवस्थान जनरल मिटिंग मध्ये सर्वांना हा बदल सांगितला होताच... 'यज्ञात् भवति पर्जन्यो' हे आदल्या रात्री सर्वांनी अनुभवलेले होते.. थोडेसे उलटे समीकरण झाले होते... 'पर्जन्याद् भवति यज्ञ:' असे झाले होते... सकाळ पासून ढगांची गर्दी दाटलेली होतीच.. धो धो पाऊस पडला तर यज्ञ समारंभात व्यत्यय येईल... अनेकांच्या तोंडीं अनेक चिंता होती... पूर्वीचे भूतकाळातले घडलेले.. अनेकांनी बरीच उजळणी केली.. मनात म्हटले की पाऊस पडायचाच असेल तर पडणारच आहे... रडत बसून काय करायचे.. पाऊस पडला तर त्यासाठीचे उपाय उपलब्ध करून ठेवले पाहिजेत.. सकाळी सातच्या ठोक्याला नेहमी प्रमाणे मंदिरात जाणे झाले... टायमर नसल्यामुळे सनई आठदहा मिनिटे पुढे सरकली होती. पाऊस पडला तरची जोडणी डोक्यात घोळत होती. देवदर्शन घेण्यापूर्वी आचारी श्री. दीपक नाटेकर यांचे सैपाकी काम सुरु झाले की नाही हे पहायला गेलो होतो. यज्ञसाहित्य आले की नाही त्याची खातरजमा झाली. ब्राह्मणांची खोली साफसूफ आहे की नाही, तिथे पाण्याचा तांब्या, दोन खुर्च्या ठेवल्या आहेत की नाही ते बघीतले.. स्वाहाकारासाठी येणाऱ्या यजमानांची खोली नीट नेटकी आहे की नाही ते बघीतले.. संडास, मुताऱ्या साफसूफ झाल्या काय ते पाहिले.. त्या ठिकाणी डांबर गोळ्या आहेत की नाही ते बघीतले.. सर्व पाण्याच्या नळांना पाणी येते का ते पाहिले.. तर लक्षात आले की पाणी भरलेले नाही.. पंप लावायला सांगितला.. पाऊस पडला तर लाईट जाईल आणि लाईट गेला तर पंप लावायला जनरेटरचे पाय धरावे लागतील.. म्हणून पंप सुरू करायला सांगितला.. भक्त निवासात उतरलेल्या भक्त मंडळींची चौकशी करायला गेलो... त्यातील श्री. पंकज देसाई यांना सपत्निक(सौ. पद्मजा पंकज देसाई) स्वाहाकारासाठी तयार रहाण्याची विनंती केली.. देणगीचे ऑफिस बघीतले... तिथे पाण्याचा तांब्या दिसला नाही म्हणून तो आणवून घेतला.. यज्ञमंडपा जवळ आलो... यज्ञमंडपाला आंब्याचे टाळे दोन चारच लावलेले होते... ते जास्तीचे लावायला सांगितले.. रात्रीच्या पावसाने सारवणाचे शेण शेडनेटच्या पायघडीवर जमले होते... ते झाडायला लावले... केरसुणीने झाडले जाणार नाही म्हणून गोठ्यातले खुटारे(झिझलेल्या केरसुणी) आणायला लावल्या... श्री. विजय वामन लिंगायतने रांगोळी, केळीचे तोरण आदी कामे पुरतावली होती.. सोबतीला विलास चेऊलकर सुद्धा आले होते.. तेही तिथे काहीना काही करू लागले.. तो पर्यंत आठ वाजले.. तोपर्यंत श्री. विजयराव भुसकुटे आले.. ह्या सगळ्या नाटकात त्या सकाळचे गाभारीच्या देवाचे दर्शन घ्यायचे राहिलेच. असो.. एक एक करून ब्राह्मणांचे आगमन सुरु झाले... रत्नागिरी, कुर्धे, भू, कोतापूर पासूनचे निमंत्रित ब्राह्मण यायला लागले... या वर्षी सप्टेंबरच्या वीस तारखेस सर्व ब्राह्मणांना एक निमंत्रणपत्र करून यज्ञस्वाहाकाराचे निमंत्रण दिले होते.. आगाऊ निमंत्रण दिले होते. कुणालाही सबब सांगण्याची संधी मिळू नये म्हणून ते आगाऊ निमंत्रण होते.. आयत्या वेळी सांगितले असे होवू नये म्हणून आगाऊ आग्रहाचे निमंत्रण होते.. व्हाट्सएपच्या माध्यमातून संपर्क होऊन १४/१५ ब्राह्मण आले... प्रभाकर अनंत तथा बाबुकाका फडके, कुर्धे, प्रसाद प्रभाकर फडके, कुर्धे, प्रशांत प्रभात शेवडे, कोतापूर.. विश्वास वासुदेव परांजपे... अमित अजित निमकर, मिठगवाणे... दीपक गोपाळ ताह्मनकर, कुवेशी. , अनिरुद्ध अनंत दीक्षित.. , अनिकेत अनंत दीक्षित... विश्वास विनायक जोशी... प्रदीप श्रीकांत रायकर... योगेश मोरेश्वर हर्डीकर... जयंत विनायक अभ्यंकर... प्रकाश वसंत जोशी... शरदचंद्र अरविंद नामजोशी, कुर्धे... देवाचे जोशी श्री. मधुकर शंकर जोशी, तिवरांबी हे सर्व एकामागोमाग एक हजर झाले... आल्या आल्या सर्वांना सकाळचे नियोजित चहापान झाले. पाठोपाठ यजमान श्री. अविनाश दत्तात्रय देसाई व सौ. गौरी अविनाश देसाई हे गाडीतून उतरले.. ते मुंबईहून रत्नागिरीला हॉल्ट करून येथपर्यंत पोहोचले होते..

श्री. अविनाश देसाई हे इंडसइंड बँकेमध्ये असिस्टंट मॅनेजर पदावर कार्यरत आहेत तर सौ. गौरी अविनाश देसाई ह्या शुल्के इंडिया, या जर्मन फार्मासुटीकल कंपनी मध्ये उच्च आहेत... दोन यजमान सपत्नीक तयारी होवून मंदिरात आले... श्री. अविनाश दत्तात्रय देसाई व श्री. पंकज लक्ष्मण देसाई .... दोन यजमान... हे सुद्धा एक इनोव्हेशन म्हणावे लागेल.... 'जमवले की जमते आणि ठरवले की ठरते..'. त्यातला हा प्रकार म्हणायचा.. दोघांना घेऊन गाभारीच्या देवाला लिंगायत गुरवांने गाऱ्हाणे घातले.. आमच्या डॉ. सौ. शरयू सोबत होत्या.. दोन्ही यजमानींचे (सौ. गौरी अविनाश देसाई व सौ. पद्मजा पंकज देसाई) हळदीकुंकू झाले.. तो पर्यंत तासेवाजंत्री वाजू लागली.. सोबत स्पीकर वरची सनई सुरु होती.. पुण्याहवाचन सुरु झाले.. मंगलाचरण, स्वस्तिवाचन सुरू झाले.. यज्ञमंडपात सर्व देवदेवतांची आसने मांडून झाली होती... तेथील सर्व तयारी झाली होती... मंदिरातील मूकशाळेच्या भागामध्ये पुण्याहवाचन, सभामंडपात अग्निस्थापनेचा विधी... व यज्ञमंडपामध्ये रुद्राचे पठण, गाभाऱ्याच्या देवाला एकादशणीचा अभिषेक असे सर्व चालू होते.. मध्यंतर अकरा वाजता झाला. ब्राह्मणांना साबुदाणा खिचडीचा अल्पोपहार व चहा देण्यात आला. पुन्हा रूद्र पठणासह हवनविधी सुरू झाला.. त्यामध्ये बलीपूजनाचा विधी सुरु होता.. उपस्थित सर्व भाविकांना खुर्च्यांची आसन व्यवस्था करण्यात आली होती.. शेवटी दुपारी दीड वाजता 'पूर्णाहूती'. झाली.. मोजक्या आरती झाल्या... प्रा. जयंत अभ्यंकरगुरुजीनी लघुरुद्र स्वाहाकाराचे धावते समालोचन केले.. देवाला नैवेद्य दाखविणे आणि सर्व उपस्थितांना यज्ञप्रसादाचे वाटप झाले.. खिचडी प्रसाद होता.. कोरोना नियमावलीमुळे सिल्व्हर फॉईल मध्ये पॅकींग केलेला यज्ञप्रसाद उपस्थितांना देण्यात आला.. सुमारे साडेतीनशेच्या आसपास भाविकांची उपस्थिती होती... ब्राह्मण भोजन झाले.. सर्व ब्राह्मणांच्या हाती दक्षिणेचे पाकीट दिले.. सर्वांचे आभार मानले.. इथे यज्ञस्वाहाकाराचा कार्यक्रम समाप्त झाला... संध्याकाळी पावसाळी मळभट होतीच.. रात्री पुन्हा तासेढोलांचे बढवणे... पावले पुन्हा मंदिराच्या वाटेकडे वळली .. ठिक ९.०० इशारत धुपारत झाली... चौथ्या दिवशी चे दोन शब्द.... विद्यार्थी कौतुक कार्यक्रम झाला. श्री. नित्यानंद जयंत भोगले हे उपस्थित होते. भोगले पेन्टस अँड कोटींग या कंपनीचे मालक, भोगले ऑटोमोटीव्हचे मालक, आणि पूर्वीचे निर्लेप तव्याचे पार्टनर.. श्री. नित्यानंद भोगलेदेसाई यांच्या शुभहस्ते तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी रोख रक्कम रू. १०००/–, पँटशर्टचे कापड, अंजनेश्वर फोटो, श्रीफळ, बेलाचे पान देण्यात आले.. आरती, पालखी प्रदक्षिणा, कीर्तन असा नेहमीचाच कार्यक्रम झाला. या दिवशीचे चहापान विक्रमी झाले... ४००/४५० कप चहाचा लाभ उपस्थित लहानथोर भाविकभक्तानी घेतला.

- **कार्तिकोत्सव २०२१... उत्सवातील अखेरचा दिवस.... 'त्रिपुरारी पौणिमा'**

कार्तिकोत्सवातील अखेरचा दिवस व सर्वात महत्त्वाचा दिवस.... जत्रेचा दिवस.... लोटांगणाचा दिवस... दरबार झाडणीचा दिवस... पालखीला खांदा मारण्याचा दिवस.... समाराधनेचा दिवस... महाप्रसादाचा दिवस... श्री देवाचे नावे देणगीची पावती फाडण्याचा दिवस... बलीपूजनाचा दिवस.... त्रिपुरी पाजळणीचा दिवस... लळीताचे कीर्तन ऐकण्याचा दिवस... श्री देव पालखीतून बाहेर सभामंडपात सभेमध्ये बसवण्याचा दिवस.... 'तीर्थचरणीचे शीतल' म्हणत म्हणत समारोपाचे चरणीचे तीर्थ प्राशन करायचा दिवस... प्रसादाचे बेलपान मिळविण्याचा दिवस.. मानाचे श्रीफळ देण्याचा दिवस... सकाळपर्यंत जागण्याचा दिवस.... समारोपाचा नारळ ठेवून देवाचे आभार मानण्याचा दिवस..... ' माझ्यासाठी महत्त्वाचा दिवस अशासाठी की सर्वांसमोर वर्षभराचा संपूर्ण लेखाजोखा अगदी थोडक्या वेळेत मांडण्याची संधी आज अनेक वर्षे(सन १९९६ पासून ) मिळत आहे... म्हणून अतिमहत्त्वाचा दिवस'.... मित्रांनो... त्रिपुरारीच्या दिवसाची सुरुवात ढगाळ वातावरणात झाली.. 'नभ मेघांनी आक्रमिले' इतकी अवस्था नव्हती... नेहमी प्रमाणे सकाळी सात वाजताचे मंदिरात जाणे झाले... आदल्या दिवशीची चूक त्रिपुरीच्या दिवशी घडली नाही... पहिल्यांदा गाभारीच्या देवाचे दर्शन

घेतले.. पालखीतल्या सगुण रुपाचे दर्शन घेतले.... नेहमी प्रमाणे ज्ञानेश्वरीचे एक पान वाचले...

'तो कर्म करि सकळें । परि कर्म बंधा ना कळें ।।

जैसे न सिंपे जळी जळें । पद्मपत्र ।। '

या त्या ओव्या.. त्याचेच 'चिंतन'. आणि काहीसे 'मनन. ' चालू होते.. मनाला बजावणी... पद्मपत्रासारखे राहिले पाहिजे, ही ती मनाला बजावणी.. तिथून भटारखान्यात... आचारी श्री. दीपक नाटेकरांचे दर्शन घेण्यासाठी.... हो .... आज त्यांचे महत्त्व सर्वात महत्त्वाचे होते... पाणी आहे की नाही, लाकडे पुरेशी आहेत की जास्तची लागतील.. सर्व सामान आलेले आहे ना... चहाचे दूध आले की नाही, ही सर्व विचारणी.... आश्वस्त आवाजात 'डाक्टर, काही काळजी नको, तुम्ही इकडे लक्ष सुद्धा देवू नका... फक्त मध्ये एकदा येऊन जा'... खरेतर मला तेवढेच अपेक्षित होते... कारण श्रीमान दिपक नाटेकरांशिवाय आम्ही अन्य कुणाही आचारी माणसाला आजपर्यंत बोलाविलेला नाही... तिथून पुन्हा संडास, मुतारीच्या भागातून फिरून साफसफाई झाली की नाही याची पहाणी... तिथून येऊन पाण्याच्या टाक्या भरल्या की नाही भरल्या याची खातरजमा... बाहेरील देणगी ऑफीस मधली जोडणी.... सहकारी श्री. विलास चेऊलकर, श्री. विजय गवाणकर यांचेशी थोडे नियोजनाचे बोलणे... मंदिराचे फोटो, पिंडीचे फोटो, २०/२५ नारळ, वाटपाचे बुंदी लाडू, पावती पुस्तके, कार्बन पेपर, आदी साहित्य तिथे पोहोचते करून तिथून भक्त निवासीच्या यात्रेकरू भाविक भक्तांची विचारपुस... काही हवे नकोचे विचारणे... तिथून पुन्हा मंदिराच्या मुकशाळेत... तो पर्यंत अगदी ठीक वेळेत श्री. नित्यानंद जयंत भोगलेदेसाई यांचे येणे झाले होते... अगदी वेळेवर पोहोचले म्हणूनचे समाधान... त्यांचेसाठीची निवासी सोय धर्मशाळेच्या खोलीमध्ये केली होती ... पुन्हा मंदिराच्या मूकशाळेत बलीपूजनाच्या तयारी वर नजर फिरवली... ती व्यवस्था श्री. संदीप लिंगायत करत असल्यामुळे फार लक्ष देण्याची गरज वाटली नाही.. माईक स्पीकरची जोडणी .... दोन दोऱ्या बांधून मूकशाळेचा अर्धाभाग रहदारीसाठी बंद करणे... तो पर्यंत सकाळचे १० वाजलेच होते... यावेळचे बलीपूजनाचे यजमान श्री. नित्यानंद भोगलेदेसाई सोवळे व खांद्यावरचे उपवस्त्र घेऊन तयार राहिले होते... या सोबत श्री. गजानन त्रिंबक देसाई सपत्नीक, त्यांच्या भगीनी सौ. चारुशीला धर या सपती मुलासह उपस्थित होत्या... सौ. अनघा ओक, सौ. शर्वरी गोडसे या भोगलेदेसाई वंशातील माहेरवाशीणी उपस्थित होत्या... नितीन देसाई, पंकज देसाई, सौ. पद्मजा पंकज देसाई, चि. प्रणव पंकज देसाई, अरविंद लक्ष्मण देसाई यांचेसह भोसलेदेसाई मंडळी अगदी हुरूपाने उपस्थित होते.. नाशिकहून योगेश्वर देसाई पहिले दोन दिवस उपस्थित होते, नोकरी व्यवसायामुळे शेवटापर्यंत उपस्थित राहू शकले नाहीत... भुसकुटे गुरूजींनी यजमानांकडून आमचमनाचे मंत्र म्हणून बलीपूजनाला सुरुवात केली.... सोबत परांजपे उपाध्येगुरुजी (विक्रम परांजपे) व 'देवाचे जोशी' श्री. मधुकर शंकर जोशी होते... बलीपूजन साडे अकराला आटोपले... बली घेऊन गांवकर श्री. महेश कांबळी मंदिराबाहेर पडले... सोबत रामदास रायकरांचे एका ढोलाचे 'ढमढम ढमढम. '.. देवाच्या नैवेद्याची तयारी प्रकाश परांजपे, अरूण जोशी, तुळशीदास लिंगायत या तिघांनी केली होती... सतरा नैवेद्याची पाने अधिक एक पिराचे शिध्याचे पान... गाभाऱ्यात सर्व देवांना श्री. जयंतरावांनी नैवेद्य दाखवला... तिथून महाप्रसादाच्या वाटपाचे ठिकाणी उदक सोडले.... बाहेर भाविक महाप्रसादाला अगदी दर्शन आटोपून निवांतपणे उभे होते... छोटासा सत्काराचा कार्यक्रम झाला... रू. एक लाखाची देणगी महाप्रसादाला देणाऱ्या श्री. संदिप रामदास मांजरेकर व सौ. राजेश्री रामदास मांजरेकर या दोहोंचा सत्कार होता... त्यांना यायला उशीर झाल्यामुळे त्यांचे चुलत बंधू श्री. अरूणभाई मांजरेकर यांचेकडे त्यांचा सत्कार दिला... सोबत त्यांचा मित्रपरिवार आला होता.. ज्ञानेश्वर मांड्रेकर, बँक ऑफ इंडिया चे रिटायर्ड ऑफिसर,सीए

श्री. प्रसाद देसाई, सत्य साई एक्सपोर्ट कंपनीचे मालक श्री. विलास मांजरेकर, श्री. सुनील नार्वेकर, केईएम ला ॲम्बूलंस सेवा देणारे प्रशांत वेंगुर्लेकर. आदी मंडळी आली होती... त्यांनाही श्री. नरेश कांबळी, बाळूशेठ पाटणकर, रमेश काजवे, विश्वनाथ कांबळी आदींच्या हस्ते शाल श्रीफळ दिले.... लगेच महाप्रसाद वाटपाला सुरुवात झाली... पहिला महाप्रसाद श्री. दिलीप वालकरच्या हाती दिला आणि महाप्रसाद वाटपाला सुरुवात झाली.... हॉल मध्ये रांगेत जायचे... तिथल्या तांडवनृत्यातल्या महादेवाला बेलपान वहायचे, हात जोडायचे, सिल्व्हर फॉईल मधला महाप्रसाद, जिलेबीचे पाकीट घ्यायचे अन् 'हरहर महादेव' म्हणत बाहेर पडायचे.... जसे ठरवले होते तसे घडत होते, तो आनंद मोठा होता... कु. सुशील विजय परबच्या कुंचल्यातून साकारलेल्या तांडवनृत्यातल्या महादेवाला बेलपान अर्पण केले जात होते... सन २००४ सालामध्ये ग्रामपंचायत मध्ये सदस्यपदी असताना बांधलेल्या हॉलची रंगरंगोटी, थोडीफार दुरुस्ती, थोड्याफार सुधारणा (ऐकोसाऊंड कमी करण्यासाठी व एअर सर्क्यूलेशनसाठी), भिंतीवरील बारा कँडेलीयरचे लाईटींग, स्टेजवर प्लास्टिक कार्पेट, सर्व पंख्यांचे पुनश्च लाईट फिटिंग.., सर्व ठिकाणी व्हाईट सिमेंटचा वापर करून सज्ञा, पोर्चच्या भेगा तडे बुजविण्यात आले होते... लोखंडी सीबार सपोर्ट लावून मजबुती करण्यात आली होती.. हॉलच्या समोर कंपाउंड वॉल.... , त्यावर एलईडी ची प्रकाश योजना करण्यात आली होती.. दर्शनी भागात श्री. सुशील विजय परब याचेकडून साकारून घेतलेले महादेव शंकराचे तांडवनृत्यातले १२ फूट उंची चे पोर्ट्रेट आदी कामे अगदी आठ दिवसांच्या कमी कालावधीत देवस्थान खर्चातून व स्थानिक मजुरांना घेऊन झाली होती... श्री. नरेश कांबळी, सय्यद हसोळकरांनी या कामासाठी खूप मेहनत घेतली... आणि त्याचा तो आनंद आम्हा सर्वांना होता... सांस्कृतिक कला केंद्राची इमारत नव्या नवरी सारखी नटली होती म्हणूनचा आनंद थोडा अधिकचा.... ती इमारत समाराधनेच्या महाप्रसादाच्या वाटपासाठी कारणी लागत होती म्हणून अत्यानंद होता... कारण ती इमारत शासकीय निधीतून तेव्हा बांधली होती ती समाराधनेच्या महाप्रसादासाठीच बांधलेली होती.. प्राधान्याचा हेतू समाराधनेला सोयीचे व्हावे असाच होता... गावासाठी उपयोग, ग्रामसभेसाठी उपयोग, लग्नकार्यांना उपयोग, पंचक्रोशीसाठी हे ओघाने होतेच... पण इमारत बांधण्याचा मूळ हेतू 'समाराधनेसाठी जागा' उपलब्ध करून देणे असा होता. सुमारे तीन साडेतीन हजारांचे फॉईल (महाप्रसाद) वाटप झाले.... सर्व ठीक अडीचच्या ठोक्याला पूर्ण झाले... श्री. नित्यानंद भोगलेदेसाई यांना औरंगाबाद पर्यंत पोहोचायचे होते म्हणून ते निघाले होते... दुपारी चार वाजता माजी खासदार श्री. निलेश राणेंनी मंदिराला भेट दिली.... सोबत कार्यकर्त्यांचा लवाजमा होता... त्यांचा शाल श्रीफळाने सत्कार केला.... सहजच्या दोन शब्दात सहजसहज धर्मशाळेच्या विस्तारीकरणासाठी ७०/८० लाखांची मागणी केली.... व त्यांची सहजपणे मान्यताही त्यांनी दिली........ त्यासाठी विविध पर्याय सुचवले... तेही मान्य केले... 'महाशिवरात्रीला भूमीपूजन करुया, ' अशी सहजपणे विनंती केली.... जत्रेत फेरफटका झाला.... , सरपंच श्री. बलवंत सुतार यांना यावर्षीची जत्राकर आकारणी माफ करायची विनंती केली होती... जनरेटर लाईट देवस्थान कडून पुरवलेला होता... सर्व व्यापारी लोक आभार मानत होते... मी म्हटले, 'माझे आभार नको... पंचायतीचे माना'.... कारण जत्रा कर माफी करून पंचायतीचे आठदहा हजारांचे नुकसान झाले आहे... आभार त्यासाठी त्यांचे मानले पाहिजेत, याची जाणीव करून दिली... सर्व खुष होते.... प्रथेप्रमाणे रात्री आठ वाजता त्रिपुर पाजळणी झाली.... रात्री १२ च्या ठोक्याला पुन्हा धुपारत इशारत... सदानंदाने घंटा धूप घातला... दरबार झाडणाऱ्या माता भगिनी तयारीत होत्या... लोटांगणाचे भक्त प्रदक्षिणा मार्गावर होते... धुपारत थांबली... इशारतीचे ढोल थांबले.... जपाचा कार्यक्रम झाला... माझे उत्सवातील 'दोन शब्द' सुरु झाले.... फक्त १० मिनिटातील 'दोन शब्द.'... वर्षभराचा आढावा... आभार... विशेष उपक्रम...

मिठगवाणे ग्रामपंचायतीचे आभार.... देवाच्या जमीन जागेवरील सुमारे ४०/५० लाखांच्या, शासकीय निधीतून यापूर्वी बांधलेल्या इमारती देवस्थानकडे हस्तांतरीत करण्याबद्दल आभार मानले होते. सांस्कृतिक कला केंद्र इमारती पासून महिला शौचालय इमारती पर्यंत... भक्त निवासापासून पार्किंग शेड पर्यंत..... जत्राकर रद्द केला, ग्रामपंचायतीने नुकसान सहन केले म्हणून आभार... यात्रा व्यवस्था सुलभतेने बसावी म्हणून ग्रामपंचायतीने रस्ता रूंदीकरण केले होते म्हणून ग्रामपंचायतीचे आभार मानले... १० लाखांचा यात्रास्थळ विकासाचा निधी उपलब्ध झाला म्हणून 'आभार मानले.'.. महसूल विभागाचे आभार मानले..... एकूण ३२७ सर्व्हेनंबर देवाच्या जमीनींना 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' असे नाव भोगवाटदार सदरात लागले... गांव तलाठी श्री. युवराज कुंडलिक पोवार ते तत्कालीन प्रान्ताधिकारी श्री. प्रविण खाडे साहेब यांचेसह सर्व महसूल विभागाचे आभार मानले......

महाप्रसादाला रू. १ लाखांची देणगी देणारे श्री. संदीप रामदास मांजरेकर यांचे आभार मानले..... तसेच महाप्रसादाला रू. २५ हजार देणगी देणाऱ्या ॲडव्होकेट श्री. शशिकांत सुतार यांचे आभार मानले.. श्रीमती शीतल महादेव उन्हाळेकर यांनी सभामंडपाला लोकरीचे तोरण दिले म्हणून त्यांचा उल्लेख करून आभार मानले..... मंदिरावर व मंदिर परिसरामध्ये नेत्रदीपक रोषणाई केली म्हणून श्री. अक्षय तिवरामकरांना धन्यवाद दिले.... ध्वनी प्रकाशाची व्यवस्था व तटबंदी वरील रोषणाई केली म्हणून गिरीश धनावडे याचे आभार मानले.... मंडपासाठी श्री. सय्यद हसोळकर आणि भगवान पावसकरांना धन्यवाद दिले.... श्री. विलास चेऊलकर आणि श्री. विजय गवाणकर या दोघांनी देणगीचे टेबल सांभाळले म्हणून आभार मानले.... आचारी श्री. दीपक नाटेकरांचे आभार मानले... श्री. नरेश कांबळी, बाळूशेठ पाटणकर, रमेश काजवे, बाळू मेस्त्री, विलास मेस्त्री, रमाकांत मेस्त्री, सन्तू लिंगायत, विजू लिंगायत, राजा लिंगायत, सुधाकर लिंगायत, सौ. स्मिता लिंगायत, मन्सूर खान, महेश पटवर्धन, गजानन भोगले, समस्त काजवे–कांबळी– लिंगायत–खोत–सेवेकरी–मानकरी आदींच्या सहकार्याचा उल्लेख.. मंदार परांजपे व सचिन मेस्त्री यांचा उल्लेख फेसबुक लाईव्ह केले म्हणून उल्लेख केला... व्हिडीओ चित्रिकरणासाठी प्रशांत भडेकरांचा उल्लेख केला. श्री. दत्ता रानडे, सीए श्री. निलेश पाटणकर यांच्या सहकार्याचा उल्लेख केला...

निंदकांचे विशेष आभार.... निंदकामुळे सुधारणा होतात... बिनचूक करण्यासाठी निंदकामुळे चालना मिळते म्हणून त्यांचे आभार....

हे दोन शब्द झाल्यावर आरती, पालखी प्रदक्षिणा आदी सर्व झाले. नंतर पालखी मंदिरात आल्यावर गाऱ्हाणी आदी कार्यक्रम पार पडला.. त्यानंतर देवाला सभेत बसवणे... पालखीतून बाहेर चांदीच्या चौरंगावर बसवणे...... समारोपाचे श्री. पोखरणकर बुवांचे कीर्तन... 'लळीताचे कीर्तन'... श्री. नितीन विश्वनाथ भोगलेदेसाई, पुणे यांनी देसाई म्हणून तीर्थचरणीचे शीतल स्वीकारणे झाले... मूळचे मिठगवाणेचे भोगलेदेसाई... येथून विस्थापित होऊन १००/१२५ वर्षापूर्वी रोहा रायगड मधील नागोठणे येथे स्थिरावले... त्यांचेपैकी 'श्री. नितीन विश्वनाथ तथा नंदू देसाई.'... सध्या पुण्यामध्ये वास्तव्य... बेलाची माळ अन् श्रीफळ स्वीकारणे.... देसाई यजमानाचा तो 'सन्मान'... सर्वांना तीर्थ व बेलपानाचे वाटप झाले... शेवटी 'हेचि दान देगा देवा' ने कीर्तनाची समाप्ती... गुलालाची उधळण... पहाट झाल्याची ती आठवण.... समाप्तीचे लिंगायत गाऱ्हाणे.. 'चुकभूल माफ कर... झालेली सेवा मान्य करून घे' हे ते सांगणे.. उपस्थित सर्वांना बुंदी लाडू प्रसाद वाटप झाले... मानकरी सेवेकऱ्यांना मानाचे श्रीफळ वाटप झाले.. इथे उत्सवाची सांगता झाली.. मित्रांनो... लिहून ठेवले की शब्दबद्ध रहाते... लिखाण साक्ष म्हणून अजरामर रहाते.. कधी काळी तो एक 'पुराव्याचा दस्त' बनून रहातो... असे लिहून ठेवले की ते एक 'उत्सवाचे इतिवृत्त','प्रोसीडिंग' बनून तयार होते...सारे सारे 'उजेडी' ठेवायचे असेल तर असे लिहून ठेवावे लागते...

जिथे जिथे व्हिडीओ चित्रीकरण पोहोचू शकत नाही तिथे तिथे हे तोकड्या मोडक्या शब्दातले 'शब्दीकरण' पोहोचते... ही 'शब्दफुले' कधीच फुकट जाणारी नाहीत... कधी कोमेजून जाणार नाहीत... शब्दफुलांची गुंफण करताना काही 'शब्दफुले' माळेत ओवायची रहातात.... ओवली गेली नाही तर ती निदान परडीत रहातात... भाग्य फळफळले तर देवाच्या मस्तकी जाऊन ऐटीत बसतात..... 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने', असे मी तर कधीच म्हणणार नाही... कारण इतके रत्नमोलाचे शब्द माझ्यापाशी आहेत कुठे. ??....

'सांगशील तैसा वर्तेन अनंता । जाणतसे सत्ता एक तुझी ।।'

'जैसे सुचवले, तैसे लिहीले', इतकेच.... जास्त से काहीच नाही.... अगदीच कुणी वाचले नाही तर ते 'निर्माल्य' म्हणून तरी राहील, अशी एक भावना... मित्रहो... कै. सदाशिव लक्ष्मण तथा बाबुराव देसाई यांच्या वंशात जन्म झाला म्हणून हे काम करण्याचे भाग्य लाभले... भाग्य म्हणण्यापेक्षा 'संधी' मिळाली... त्यात 'योगदान' कसले आमचे ???? मला तर वाटते आपले असे काही नाही.. योगदान फार दूर राहिले... ' धडपड' शब्द ठीक आह... धड जमिनीवर पडेपर्यंत 'धडपड' करायची ... परमेश्वर जो पर्यंत हाकलून लावत नाही तोपर्यंत धडपडायचे... एवढाच काय तो मनीचा निश्चय....

स्वामींच्याच शब्दांत सांगायचे झाले तर –

' स्वामी म्हणे मज तुझें कृपा बळ । म्हणोनिया हा खेळ खेळतसें ।।'

- **श्रीदेवाची निशाणकाठी**

मंगळवार दि. १५. ०२. २०२२ 'माघ पौर्णिमा'समुद्राच्या पूर्ण भरतीचा दिवस'. 'पूर्ण चंद्राचा दिवस'... 'पुष्य नक्षत्र' शोधून सुद्धा सापडणार नाही असा 'मुहूर्त' आणि 'योगायोग'.. विश्वस्त असूनही मी अनुपस्थित. जबाबदार असूनही माझी हजेरी नाही. (रत्नागिरीला गेलो होतो म्हणून अनुपस्थित) असे असताना निशाणकाठीचे सागवानी लाकूड तोडण्याचा जो कार्यक्रम झाला तो अगदी 'देखणा' झाला. अनुपस्थित राहिलो याची टोचणी मजला कायम राहील.. सुमारे ४१/४२ फुटांची उंची, मुळापाशी ४८ इंच गोलाईचे अगदी सुतात सरळ' सागवानी झाड तोडकाम करुन सहीसलामत मिरगुलेवाडी ते मिठगवाणे ट्रकाने प्रवास करुन येथपर्यंत आले हे ते 'विशेष'... अनेक दिवस आम्ही सर्वजण सागवानी लाकडाच्या शोधात होतो. मंदिराच्या जवळची निशाणकाठी जवळपास ७६/७७ वर्षांची झाली आहे. इतक्या वर्षांचा ऊन पाऊस खाऊन अगदी निश्चलपणे उभी आहे. निशाणकाठीचे लाकूड तडावले गेले आहे. मुळापाशी कुजले आहे. त्यामुळे निशाणकाठी बदलणे अपरिहार्य झाले आहे. सध्याच्या निशाणकाठीवर तांब्याची प्लेट ठोकून अगदी पूर्ण तपशील लिहिलेला आहे.. 'स्थापना मिती फाल्गुन शुद्ध १० शके १८६६..' तांब्याच्या प्लेट मध्ये कोरुन ठेवलेली अक्षरे आहेत. थोडक्यात होळी पौर्णिमेच्या पूर्वी पाच दिवस हे 'निशाणकाठी स्थापने'चे कार्य झालेले आहे सध्या शके १९४३ सुरु आहे.. व सन २०२२ आहे. शकसाल लक्षात घेतले तर थोडक्यात या सध्याच्या उभ्या निशाणकाठीला ७७ वर्ष या फाल्गुन शुद्ध १० ला पूर्ण होतील. थोडक्यात ७७ वर्षामधील उन्हाळे पावसाळे, वादळवारे सहन करून ही निशाणकाठी उभी आहे. तेव्हाची म्हणजे 'शके १८६६ म्हणजे सन १९४५ ची साक्षीदार' म्हणून. तसा निशाणकाठीसाठीचा सागवान श्री. दत्ताराम जगन्नाथ उर्फ बाळू पाटणकर यांनी गेल्या वर्षी दिलेला आहे. कोणतीही रक्कम न घेता दिलेला आहे. वर्षापूर्वीच तोडकाम होऊन झाले आहे. मात्र लाकडाला थोडा बाग(बेंड) आला प्रयत्न करूनसुद्धा तो बाग निघाला नाही म्हणून पुन्हा नवीन लाकडाची शोधाशोध सुरु झाली. सध्याच्या निशाणकाठीची जमिनीवरची उंची २७ फूट आहे. जमिनी खाली ३-४ फूट आहे.. २३ इंच गोलाई आहे. त्यामुळे त्यापेक्षा कमीची निशाणकाठी नको, असा एकूण सर्वांचाच सूर असल्याने

जास्त शोधाशोध करावी लागली. सरते शेवटी श्री. रमेश काजवेंच्या शोधण्यात मिरगुलेवाडीमध्ये सागवानाचे झाड सापडले. श्री. शांताराम सहदेव राऊत यांच्या कुटुंबातील जमिनीमध्ये सागवानाचे झाड असल्याची खबर मिळाली. श्री. रमेश काजवेंनी सागवानाचे झाड ठरविलेही. सर्वांशी संपर्क साधला. निश्चिती करुन घेतली. नरेश कांबळी, श्री. दत्ताराम जगन्नाथ पाटणकर, श्री. समीर मेस्त्री, संतोष लिंगायत हे चौघे सागवानाचे झाड बघून आले. लांबी, घेर सारे सारे बघून झाले पुन्हा निश्चिती झाली. श्री. शांताराम राऊत यांचे कुटुंबाने सागवानाचे झाड देण्याचे नक्की केले. त्यांच्या सोयीनुसार सागवान तोडण्याचा दिवस निश्चित झाला. 'मंगळवार दि. १५ फेब्रुवारी २०२२ हा दिवस ठरला'. सोमवारी संध्याकाळी आरतीच्या नंतर, सागवान तोडायला जाणार असल्याचे एक गऱ्हाणे सुधाकर लिंगायत याने घातलेले होतेच. कोल्हापूरचे श्री. प्रकाश परशुरामपंत गोखले व विद्याधर गोखले यांच्या उपस्थितीत हे सांगणे श्रीदेवाला झालेले होतेच. सर्व सर्व काही पूर्व नियोजित असल्यासारखे झाले होते. श्री. रमेश काजवे, नरेश कांबळी, दत्ताराम ज. पाटणकर, अंकुश कांबळी, गोकुळ काजवे, देविदास रायकर, रामदास रायकर या गावकरांसह कांचनवाडीचे झिलगे, नंदू मेस्त्री, समीर मेस्त्री आदी सुतार मंडळी..जवळपास ५०/६० आसामी. मिरगुलेवाडी, चव्हाणवाडीतील मंडळी आदींच्या उपस्थितीत निशाणकाठीसाठीचे झाड तुटले... तेथील माताभगिनींनी आरतीओवाळणी केली. तासेवाजंत्रीच्या गजरात निशाणकाठी चे झाड तुटले. अन् ट्रकात चढवले गेले... ४५/४६ फूट लांबीचे सागवानी लाकूड ट्रकात मावले नाही ट्रक सावकाश सावकाश आणावा लागला. काजवेघाटीने ट्रक आणून ट्रक थेट जोगळेकर तलावापाशी न्यावा लागला. त्यानंतर ट्रकाने शिवाजी चौक मार्गे नरेश कांबळी यांच्या परसवात हे निशाणकाठीचे लाकूड सावलीमध्ये उतरवण्यात आले व हे सगळे तासेवाजंत्रीच्या ठेक्यावर पार पडले. संध्याकाळी साडेचारच्या ठोक्याला हा असा कार्यक्रम पूर्ण झाला. दुपारच्या भुकेला सर्वांना फक्त वडापाव पाठवलेला होता. मिरगुलेवाडीमध्ये राऊत कुटुंबीयांनी चहापाणी देऊन सर्वांना खुष केले होते. परंतु दुपारचे भोजन कुणाचेच झाले नाही तरी सुद्धा कुठेही कुणाच्या चेहऱ्यावर दमछाक दिसलेली नाही. या उत्स्फूर्ततेला आम्ही उपस्थित राहू शकलो नाही, त्यातला आनंद घेता आला नाही म्हणून जरा चुकल्यासारखे वाटले. मित्रांनो, विश्वस्तपणात जबाबदारी दडलेली असते. जबाबदारीमध्ये पुढारपण लपलेले असते. कालचे निशाणकाठीचे तोडकाम, आणि वहातूक करुन आणणे हे तसे जोखीमीचे काम होते, जबाबदारीचे होते. परंतु रमेश काजवे, नरेश कांबळी, दत्ताराम ज. पाटणकर, अंकुश कांबळी, गोकुळ काजवे, संतोष लिंगायत, विकास मेस्त्री, नंदू मेस्त्री, समीर मेस्त्री, रामा धनावडे, विजय राणे आदींनी हे जोखीमीचे काम अगदी जबाबदारीने पार पाडले. अवजड झाड तोडणे आणि अगदी अलगदपणे जमिनीवर पाडणे वाटते तितके सोपे नाही. हे पुस्तकी ज्ञान नक्कीच नाही. तोडताना खूप कसब वापरावे लागते... हे तोडताना वाजंत्री वाजवणे हे अगदी उत्स्फूर्तपणे झाले... हे नियोजनात सुद्धा नव्हते. . परंतु ते या मंडळींनी अगदी सहजपणे व समयसूचकतेने केले म्हणून हे कौतुक केले पाहिजे. झाडाचे तोडकाम होत असताना फोटो काढून ठेवणे, व्हिडीओ शुटिंग करून ठेवणे हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे.. तेही काल या सर्व मंडळींनी केले. झाडाबद्दलचा रु. २५ हजारांचा धनादेश व तो दिल्याबद्दल व्हावचरवर सही आदी सोपस्कार नरेश कांबळी यांनी पूर्ण केले. सर्व सर्व जबाबदारी ने पार पडले.

- **महाशिवरात्री उत्सवापूर्वीची जनरल सभा**

सोमवार दि. २१ फेब्रुवारी २०२२ रोजी श्री देव अंजनेश्वर देवस्थान ची जनरल सभा पार पडली. सभेला 'एकूण ४९ मंडळीं'ची नावे व सभेला उपस्थित असल्याबाबतच्या स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.. सभेसाठी देवस्थानचे लेखनिक काम करणारे श्री. दत्तात्रय श्रीकृष्ण तथा दत्ताभाऊ रानडे, राजापूर यांना सुद्धा अगदी वेळेवर उपस्थित रहाण्यासाठी सांगितले होते व ते सुद्धा या सभेमध्ये अगदी सभेच्या सुरवातीपासून उपस्थित होते. दिवंगत झालेल्या कै. जयंतराव जोशी, कै. राजाराम मसुरकर, कै. प्रशांत भडेकर, कै. भीमाताई मोहिते, करेल चे खोत कै. शशिकांत जोशी, कै. दिनकर देसाई आदींचा उल्लेख करून श्रद्धासुमने अर्पण करण्यात आली. जनरल सभेची नोटीस एकूण ४६ जणांना श्री. नरेश

प्रिंदावणकर याने बजावली होती. तसेच खोतमंडळींना सभेची नोटीस लिंगायत गुरवांकडून पोहोचवलेली होती. सर्व तमाम भाविकभक्तांना जनरल सभेबाबत समजावे म्हणून नोटीशीला अंजनेश्वर फेसबुक पेजला व व्हाट्सएपच्या माध्यमातून प्रसिद्धी दिलेली होती. जनरल सभेची सुरुवात आरती संपल्यानंतर संध्याकाळी ७.१५ वाजता झाली व जनरल सभा ठीक ८.१५ वाजता समाप्त झाल्याची घोषणा झाली. फक्त एक तास ही जनरल सभा चालवली गेली. उपस्थित प्रत्येकाला एक बुंदी लाडू आणि मस्त गरमागरम चहा देण्यात आला. सभेचे व्हिडीओ शुटिंग झाले, प्रोसीडींग लिहिले गेले, ... फोटो काढले गेले.. . जनरल सभा माईक स्पीकर घेऊन, पोडीयम ठेवून आणि बैठकीसाठी खुर्च्यांची आसनव्यवस्था करुन झाली.. श्री. समुशूद्दीन तथा समसूदादा मिर हसोळकर हे सुद्धा या सभेसाठी अगदी वेळेपूर्वी येऊन उपस्थित होते... ही जनरल सभा झाली कशी ?? त्यात काय काय सांगितले गेले ?? हे सभेमध्ये उपस्थित रहाणाऱ्या सर्व मंडळींकडून सर्वदूर समजेल.. महाशिवरात्री उत्सवाचे संपूर्ण नियोजन सांगण्यात आले. धर्मादाय आयुक्त, कलेक्टर यांना उत्सवाला भेट देण्यासाठी बोलावले आहे, ही बाब विस्ताराने सांगितली. उत्सवामधील चहापान व्यवस्था, पाणी व्यवस्था, भक्त निवास व्यवस्था, कीर्तनकार व्यवस्था, बैठक व्यवस्था, वाजंत्री व्यवस्था आदी सारे सारे बारीक सारीक सर्व सर्व बाबतचे नियोजन सांगितले. 'होळी उत्सवाचे नियोजन' दोन्ही दिवसांचे एकूण नियोजन सांगण्यात आले. बारागावांची होळी 'करेल गावी'... 'करेलकर खोतांकडे' असल्याचे सांगितले. कै. शशिकांत जोशी हे अलिकडेच अचानक स्वर्गस्थ झाले असले तरी पुढच्या पिढीने सर्व नियोजन केले आहे हे उपस्थितांना सांगून झाले. ठीक रात्री १० ला निघून रात्री १२ पर्यंत खोताच्या घरी पोहोचायचे हे सांगितले... रात्री १ वाजता माघारी परतायचे हे सर्व सांगितले. गावातील होळी कुळंबौशीमधील 'राणे कुटुंबाकडे' आहे. ह्या बाबतची कल्पना सर्वांना दिली. भुसकुटे ठिकाणात वर्षानुवर्षे राणे कुटुंबीय रहातात म्हणून सहजपणे आमचे मित्र श्री. रमेश राणेंना अगदी स्वाभाविकपणे विचारले होते. अगदी काही मिनिटात त्यांचेकडून होकार आला.. श्री. रमेश राणे, पंढरी राणे हे दोघेही सभेला उपस्थित होते. हे सर्व सर्व उपस्थितांच्या कानावर घातले. चांदीच्या पालखीचा, सिंहासनाचा, चांदीची प्रभावळीचा विषय तपशीलवार सांगीतला.. त्यासाठी जमा झालेली चांदी व बँकेमध्ये जमा झालेली रक्कम याची माहिती दिली.. निशाणकाठी बद्दलचे नियोजन व माहिती हे सारे सारे तपशीलवार सांगीतले. सागवानी लाकूड मिळाले.., ते तोडून आणून ठेवलेले आहे... तो सर्व तपशील सांगितला... देवस्थानचे लेखनिक कामकाज पहाणारे श्री. दत्ताभाऊ रानडे यांनी ५/१० मिनिटे आपले मनोगत मांडले. ते जे बोलले ते उपस्थित मंडळीनी ऐकलेले आहे. माझेसाठी ते त्याचे मनोगत खूप उपकारक आहे. चहापान होऊन सभा सव्वा आठ वाजता संपली... सभा संपल्याचे जाहीर झाले. श्रीदेवाच्या ट्रस्ट मध्ये मूळ नोंदणी अर्जामध्ये 'मोड ऑफ सक्सेशन' हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. 'आमच्या पाठीमागे आमच्या कुटुंबातील कुणीही कर्ता इसम असेल त्याने ही व्यवस्था पहाणेची आहे' हा मजकूर मोड ऑफ सक्सेशन मध्ये नोंदला गेला आहे. सन १९५२ साली ट्रस्टची स्थापना करणाऱ्या कै. सदाशिव लक्ष्मण उर्फ बाबुराव देसाई व कै. गणेश बाळकृष्ण उर्फ आबा देसाई यांनी नोंदलेली 'इच्छा' महत्त्वाची आहे. ह्या इच्छेला धर्मादाय खात्याने मान्यता (Approved) दिलेली आहे. 'देसाई कुटुंबातील कुणीही कर्ता इसमाने देवस्थान ची व्यवस्था पहाणेची आहे.', ह्या पूर्वजांच्या इच्छेनुसार व्यवस्था पहाण्याचे काम होते आहे की नाही, हे बघणे महत्त्वाचे आहे. माझ्या अंतिम श्वासापर्यंत हे काम मी करत रहाणे हे माझे संविधानिक कर्तव्य(Statutory duties) आहे, असे मला वाटते. मी यापासून पळ काढला तर ते योग्य होणार नाही.. या ट्रस्ट मध्ये 'घटनावली' नाही... Constitution नाही. सभा घेण्यासाठीची स्पेसिफिक तरतूद नाही. सभा घेण्याची तरतूद नसल्यामुळे प्रोसीडींग, ठराव मंजुरी, सुचक, अनुमोदक, ठराव मंजूर, नामंजूर, कोरम, सर्वानुमते मंजूर, राजीनामा देणे, राजीनामा मंजूर करणे अथवा नामंजूर करणे, विश्वस्त पदावर नियुक्ती करणे, विश्वस्त पदावरून काढून टाकणे, अध्यक्ष, सचिव, संयुक्त सहीने कारभार चालवीणे आदी कोणतीच भानगड इथे ठेवलेली नाही. फक्त देसाई कुटुंबातील 'कर्ता इसम' व्यवस्था पहाण्यासाठी असला की

झाले... परमेश्वर आपली योजना नीटपणे करीत असतो. तो त्याला हवी असलेली माणसे बरोबर तयार करतो... ते सर्वस्वी त्याच्याच हाती आहे. अहंकाराचा वारा न लागता निरपेक्षतेने, निस्वार्थीपणे, निनावीपणे, नि:संकोचपणे काम करत रहाणे, ही मला उपासना वाटते... आणि तेच माझ्या हाती आहे..

- **महाशिवरात्री उत्सव २०२२**

यावर्षीचा महाशिवरात्रीचा उत्सव सुद्धा अगदी निर्विघ्नपणे आणि मंगलमय वातावरणात पार पडला. उत्सवाची जनरल सभा सोमवार दि. २१ फेब्रुवारी रोजी झालेली होती. उत्सवाचे नियोजन तिथेच ठरले होते. त्यामुळे उत्सवाचे स्वरूप हे त्याच दिवशी सर्व सेवेकरी, मानकरी खोतमंडळींना अवगत झाले होते. १९ फेब्रुवारी रोजी मंदिराच्या समोरचे पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरु केले होते. आठ दिवसांत ते काम पूर्ण करण्याचे एक आव्हान वाटू लागले होते. काम डिपीडीसीचे अन् ग्रामपंचायतीचे परंतु ते श्रीदेवाचे असल्यामुळे आपण पुढाकार घेऊन केले पाहिजे, असे वाटू लागले.. आणि म्हणून जास्त पुढाकार. कॉन्ट्रक्टर दिप्तेश चव्हाणला पूर्ण सहकार्य. दिवसांत ६/७ वेळा येणे–जाणे व्हायचे. जेसीबीने जमीन सपाटीकरण त्यानंतर क्रिट पसरून वॉटर लेव्हल... साथीने सभोवताली चारही बाजूला 'कठड्याचे बांधकाम' केवळ 'दोन फूट कठडा'. सर्वांना उत्सवाचे वेळी सहजपणे बसता यावे अशा पध्दतीचा 'कठडा' आणि त्या वर 'काळा कडाप्पा'. कठड्यावर दहा दहा फूट उंतरावर गोल प्लॅस्टिक आवरणाचे लँप, त्यासाठीचे वायरींग, पेव्हर ब्लॉक बसवणे. रात्र पाळी करून पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम झाले. यामध्ये 'हायमास्क' ची उभारणी सय्यद हसोळकरच्या वेल्डिंग कारखान्यातून हायमास्कचा खांबा तयार करून घेतला. १००watt चे चार एलईडी मागवून घेतले. हायमास्कची उभारणी झाली. त्याचे वायरींग गिरीश धनावडे याने केले. बाकी कठडा बांधकाम नरेश कांबळी, राजा राणे, रामदास रायकर, बबन गडगेकर, दीपक नाटेकर, आदींनी केले. विमल धनावडे, मंदाबाई राणे, रायकर आदि पैरीमंडळीनी माती भरणीचे काम केले. संतोष वामन लिंगायत, सदानंद तुकाराम लिंगायत, दिनकर लिंगायत, सुधाकर लिंगायत, ही लिंगायत मंडळी अधूनमधून सहकार्य करीत होती. पेव्हर ब्लॉक शासनाच्या अनुदानातून. बाकी सर्व सर्व झाले ते देवस्थानच्या खर्चाने झाले. वाहनतळच्या पत्राशेडचे नवीनीकरण व सामान्यपणे १०० फूट लांबीची वाढ शासन अनुदानातून झाली. दि. २७ फेब्रुवारी २०२२ उजाडला. श्रीदेवाचे दास्तान लिंगायतांच्या ताब्यात काढून दिले. पालखी सजली. पाटणकरांनी श्रीदेवाच्या मुखवट्याची आखणी रेखणी करुन देव पालखीत विराजमान झाले. २८ फेब्रुवारीचा दिवस उजाडला. 'शिवरात्री उत्सवाचा पहिला दिवस'. कीर्तनकार बुवा नागपूर वरुन आले होते. हभप श्री. मोहनराव कुबेर.. गिरीश धनावडेने नेहमी प्रमाणे रोषणाई ध्वनीव्यवस्था केली होती. नरेश कांबळी यांनी मंदिरातील रोषणाई केली होती. सर्व मंदिराचा परिसर शेणसारवण करून झाला होता. मंदिराच्या तीनही बाजूचे मंडप उभारणीचे काम झाले होते. विजू लिंगायतने पोडीयम नटवून सभामंडपी आणून ठेवला होता. त्याने मंदिराच्या परिसरात रांगोळी घातली होती. सॅनिटायझर मशीन तयारीत होती. हँड वॉश मशीन डेटॉल भरून सज्ज होती. सर्व घडाळ्यांचे काटे बरोबर एका सुरात आणले होते. २८ फेब्रुवारीला रात्रीचे ९.०० वाजले. राजा लिंगायतने धुपारतीची घंटा खणखणवली. सर्व मानकरी सेवेकरी सभामंडपी सज्ज. माझे ते दोन शब्दांतले सांगणे झाले. 'अद्वेष्टा सर्व भूतानाम्..' ह्या भगवद्गीतेतला आधार. भक्त कसा असावा, हे ते सांगणे.. दिवंगतांची आठवण केली. सार्वत्रिक चहापानाची माहिती दिली... उत्सवामध्ये सर्व भाविक भक्तांना चहा मिळाला पाहिजे, हा तो एक प्रयत्न होता... श्री. अभय भुसकुटे यांच्या पाच हजारांच्या देणगीतून चहापान होणार होते.. श्री. मधुकर शंकर जोशी तिवरांबी यांनी साखर व चहापावडर वस्तुरूप देणगी म्हणून दिली होती.

उपस्थित सर्वांना चहा मिळाला पाहिजे, हा तो हट्ट होता. भुस्कुटे यांच्या कडून देणगी मिळविली म्हणून श्री. उमर नाईक यांच्या नावाचा विशेष उल्लेख केला पाहिजे.... कारण श्री. अभय भुसकुटे यांची देणगी रक्कम श्री. उमर नाईकांनी आणली होती. ज्याचे पुण्य त्याचे पाशी. म्हणून तो त्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. अंजनेश्वर उत्सवामध्ये चहापान खर्च मिळविण्यासाठी श्री. उमर नाईक यांनी प्रयत्न केले हे सर्वांसमोर यावे म्हणून उल्लेख. नेहमी प्रमाणे सर्व काही सांगितले. महाशिवरात्रीचे दिवशी मे. चॅरिटी कमीशनर येणार असल्याची खबर सर्वांना दिली. सर्वांना उपस्थित रहाण्याचे आवाहन केले. जप, आरती, पालखी प्रदक्षिणा झाली. फीत कापून चहापान झाले. श्री. उमर नाईक च्या हस्ते फीत कापण्याचा कार्यक्रम झाला.. श्री. विलास चेऊलकरांनी या चहापानाच्या कार्यक्रमाची अनाऊंसमेंट केली. श्री. अभय भुसकुटे यांचेवतीने श्री. उमर नाईकांकडून फीत कापून चहा वाटपाचा कार्यक्रम सुरू झाला... सुमारे ३००/३५० भाविक भक्तांनी चहाकॉफीचा आनंद घेतला. १० ते १२.३० पर्यंत ह. भ. प. श्री. मोहनबुवा कुबेर यांचे कीर्तन झाले. त्याला ऑर्गन साथ श्री. उदय गोखले सरांची आणि तबलासाथ श्री. आनंद ओळकर यांची होती. पहिल्या दिवशीचे कीर्तन झाल्यावर उत्सव सुरू झाल्याबाबतचे गुरवाचे गऱ्हाणे झाले.. पहिल्या दिवशीचा कार्यक्रम इथे समाप्त झाला. दुसरा दिवस 'महाशिवरात्रीचा'. सकाळी श्री. हफिज मिर याने स्वखर्चाने रस्त्यावर पाण्याची फवारणी केली होती. अंजनेश्वर ते शिवाजी पुतळा या रस्त्यावर स्वतःच्या खर्चाने पाणी मारुन झाले. म्हणून तो हफिज मिर यांचा उल्लेख.. मे. धर्मादाय आयुक्त येणार म्हणून सर्व तयारी झाली होती. श्री. उमर नाईक व राजा काजवे नाट्यामधील तबरेज चौकात त्यांना रिसीव्ह करण्यासाठी थांबले होते. मंदिरात सौरभ लिंगायत, भोगले यानी भजनाचा कार्यक्रम चालू केला होता. मे. धर्मादाय आयुक्तसाहेब अगदी १०.३० वाजता हजर झाले. त्यांचे स्वागत तासे टिमकीच्या मंगलवाद्याने झाले. त्यांचे औक्षण झाले. मंदिराचा परिसर दाखवणे झाले. मंदिर प्रवेश झाला.. अगदी गाभाऱ्यातील देवापासून पालखीच्या देवापर्यंत. दाखवणे झाले. पीरदर्गा.. कालभैरव मंदिर दाखवून झाले. सांस्कृतिक कला केंद्र, भटारखाना, सोलर सिस्टीम, शौचालय व्यवस्था, स्नानगृह, आदी बाबत सांगणे झाले. सोन्याचा कळस दाखवून झाला. त्याच्या संरक्षणासाठीची उपाययोजना सांगीतली. मागील धर्मशाळा दाखवणे झाले. त्यामधील दास्तान खोली दाखवली.. तेथील रेकॉर्ड रूम दाखवून झाली. रेकॉर्ड रूम मधील कपाटबंद केलेले सर्व रेकॉर्ड दाखवून झाले. सन २००८ ते २५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत चे सर्व रेकॉर्ड तिथे ठेवण्यात आले होते. रोजकीर्द, खतावणी २५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण होत्या.. टिडीएस भरणा, आयकर रिटर्न फाईल सारे सारे दाखवून झाले. सन २००८ पासूनच्या कीर्द, खतावण्या, ऑडीट रिपोर्ट, आयकर रिटर्न, पासबुक्स, देणगी रजिस्टर, स्थावर/जंगम मालमत्ता रजिस्टर, जडवस्तू आदी सारे सारे दाखविण्यात आले.. कपाटावरील यादी दाखवली. कपाटात कोणकोणते रेकॉर्ड आहे त्याची ती यादी होती. साहेबांनी एकदोन रजिस्टर पडताळणी करून पाहिली. नीटनेटके असल्यामुळे दाखवण्यात कोणतीही अडचण वाटली नाही. नंतर भक्तनिवास दाखवले. कलामंचासमोर छोटीशी सभा झाली. एकूण वाटचालीचा परिचय करून दिला. श्री. विजय गवाणकर यांचे हस्ते साहेबांचा शाल श्रीफळ देवून मंदिर भेट दिल्या बद्दल सत्कार करण्यात आला. आयुक्त साहेबांनी मंदिर व्यवस्थेबाबत जे प्रशंसोद्गार काढले ते माझ्या लेखी अती महत्त्वाचे होते. एकूण कामकाजाबद्दल सर्वांसमोर त्यांनी जे समाधान व्यक्त केले ते मला ऑडीट अकाऊंटींग झाल्यासारखे वाटले. आणि काही तोंडी मार्गदर्शन केले, त्याने माझा पुढील मार्ग सुकर आणि प्रशस्त झाला असे वाटले. व्हेरीफीकेशन झाल्यासारखे वाटले.. मित्रांनो, हे सर्व व्हेरीफीकेशन होण्यासाठीच मी तसे त्यांना ७ फेब्रुवारी २०२२लाच निमंत्रण दिले होते. तसे निमंत्रण मुख्य धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनाही दिले होते. परंतु त्यांनी आदेश करून रत्नागिरीच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना भेट देण्यासाठी सांगितले. थोडक्यात सदरची भेट मुख्य धर्मादाय आयुक्त यांच्या आदेशानुसार होती, हे महत्त्वाचे. या भेटीमध्ये पीरदर्गा या ठिकाणी जाऊन आयुक्त साहेबांनी पीराला चादर चढवणे ही महत्त्वाची बाब मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत झाली. दूवा मागणी झाली. रत्नागिरी सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. डि. एम. जी.

मालिडवाले साहेब ह्यांनी नि:संकोचपणे हे सर्व सोपस्कार पार पाडले. अंजनेश्वरचे दर्शन ते पीरबाबादर्ग्यावर चादर चढवणे हे सारे सारे माझे साठी कसरतीचे असले तरी ते सर्व निर्विघ्नपणे पार पडले. हा तो आनंद माझ्यासाठी खूप खूप ऊर्जा देवून गेला.. सर्वांनी पुन्हा श्री. मालिडवाले साहेबांना सवाद्य निरोप दिला.. या प्रसंगी श्री. समशुदादा हसोळकर, उमर नाईक, रझाकखान गवाणकर, हसनचाचा हसोळकर यांनी अगदी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमामध्ये विजय गवाणकर, बाळूशेठ पाटणकर, रमेश काजवे, नरेश कांबळी, भागवत राऊत, विलास चेऊलकर, शामसुंदर गवाणकर आदी सर्व मंडळी असल्याने खूप सोयीचे झाले. अंजनेश्वर ट्रस्ट १९५२ मध्ये स्थापन झाला. ट्रस्ट स्थापन झाल्यानंतर तब्बल ७० वर्षांनी अशी धर्मादाय आयुक्त यांची मंदिर भेट होणे हे मला भाग्याचे वाटले. सर्वांना खिचडी प्रसाद आणि कॉफी देण्यात आली. प्रत्येकाच्या मनामध्ये ही आयुक्त भेट नक्कीच स्मरणीय राहील यात शंकाच नाही. रात्रीच्या पालखी सोहळ्याला रत्नागिरी चे ॲडिशनल कलेक्टर श्री. संजय शिंदे साहेब, प्रान्ताधिकारी श्रीम. वैशाली मानेबाई आणि तहसीलदार श्रीम. शितल जाधवबाई यांना निमंत्रित केले होते. महाशिवरात्रीच्या दिवशी हा सर्व योग जुळवून आणायचाच असा चंग बांधून हे सर्व केलेले होते.. ही सर्व महसूल खात्यातील उच्चपदस्थ मंडळी अगदी रात्री ९.०० च्या ठोक्याला हजर झाली. त्यांचे सवाद्य स्वागत झाले. त्यांनी मंदिराच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भविष्यात सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे वचन दिले. मला यापेक्षा दुसरे काहीच नको होते. ॲडिशनल कलेक्टर यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार श्री. उमेश काजवे यांनी केला तर प्रान्ताधिकारी श्रीम. मानेबाई व तहसीलदार श्रीम. जाधव बाई यांचा साडीचोळी देवून सत्कार डॉ. सौ. मंजिरी देसाई यांनी केला. श्री. संजय शिंदे साहेबांनी देवस्थान जमीनीमध्ये रोहयो अंतर्गत फळबाग लागवड करणे बाबत सूतोवाच केले, ते मोलाचे आहे. अंजनेश्वर जमीन देवाच्या मालकीची असल्याने या ठिकाणी सोयीसुविधांसाठी आम्ही प्रयत्नशील राहू, हे वचन तर अगदी लाखमोलाचे वाटते. यावेळी श्री. संदिप रामदास मांजरेकर, माडबन यांनी अडीच किलो चांदी देवस्थानकडे सुपूर्त केली. सुमारे १ लाख ६६ हजार ६०४ रूपयांचा चांदी ऐवज मे. ॲडिशनल कलेक्टर यांच्या उपस्थितीत देवस्थानकडे सुपूर्त झाला हा एक योगायोग म्हटला पाहिजे. मित्रांनो जुळवून सुद्धा असे सगळे जुळणार नाही.. श्री. नरेश कांबळी यांनी ह्या चांदीच्या विटा पालखी मध्ये ठेवल्या. पुन्हा दुसऱ्या दिवशीची आरती, पालखीप्रदक्षिणा झाली. या अधिकारी वर्गाला खिचडी प्रसाद चहा दिला. हे सारे चहापान भक्त निवासामध्ये झाले. बाकी मंडळी पालखी प्रदक्षिणेमध्ये होती. आदरातिथ्य हे सुद्धा एक सेवेतील महत्त्वाचे अंग आहे. म्हणून माझी उपस्थिती ह्या अधिकारी वर्गासोबत होती. हे सर्व महसूल अधिकारी रात्रीचे वेळी येणे, वेळेवर ठिक ९.०० वाजता येणे आणि उत्सवाबद्दल प्रशंसोद्गार काढून, वाखाणणी करून जाणे हे माझ्यासाठी महत्त्वाचे होते. ते सर्व यथासांग घडले. मित्रांनो ही कसरत दिसते इतकी सोपी नक्कीच नाही. देवस्थानच्या समग्र इतिहासात अशी अधिकारी मंडळी नियोजित वेळी येणे, आणि व्यवस्थेबाबत खूष होणे, जाहीरपणे प्रशंसा करणे हे इतके सोपे नाही. अनेक वर्षांची मेहनत कामी आली असे वाटते. श्री. मोहनबुवा कुबेर यांचे महाशिवरात्रीचे दिवशीचे कीर्तन अगदी नियोजित वेळी सुरु झाले आणि नियोजित वेळी संपले. रात्री १२.३० वाजता महाशिवरात्रीचा दिवस अशा तऱ्हेने साजरा झाला. साजरा झाला म्हणण्यापेक्षा कामी लागला हे जरा जास्त बरोबर वाटते. मित्रांनो, महाशिवरात्रीच्या उत्सवातला शेवटचा दिवस बुधवारी उजाडला. सकाळची नित्य पूजा आदी नेहमी प्रमाणे. दुपारी १२.३० वाजता देवाला महाप्रसाद दाखवणे झाले. या उत्सवामध्ये समाराधना कार्यक्रम नसल्यामुळे देसाई लोकांनी महाप्रसाद दाखवायचा ही ती पूर्वापार पद्धत. आमच्या तीर्थस्वरूप नानांनी महाप्रसाद दाखवला. आमच्या सौभाग्यवती डॉ. मंजिरी यांनी अगदी भक्तिभावाने महाप्रसाद बनविला होता. म्हणून तिचाही उल्लेख. श्रीखंड, पुरण आदी 'मिष्टान्नाचा महाप्रसाद'... रात्री ९.०० वाजता नेहमी प्रमाणे धुपारती, आरती.. नरेश कांबळी, बाळू पाटणकर, रमेश काजवे, अंकुश कांबळी यांनी आजपर्यंत मिळालेली चांदी सभामंडपी चांदीच्या चौरंगावर आणून ठेवली, हे सुद्धा सवाद्य झाले.. त्यानंतर माझे आभाराचे दोन शब्द झाले. पुन्हा कै. जयंत जोशी,

कै. राजाराम मसूरकर, कै. प्रशांत भडेकर आदींचे स्मरण झाले. विस्मरणात जात नाही म्हणून ते स्मरण केले. चांदीच्या पालखी, सिंहासन, प्रभावळीचे एकूण नियोजन, निशाणकाठी बाबतचा गोषवारा, अधिकारी वर्गाच्या भेटीबाबतचे संदर्भ सारे सारे या वेळी सांगितले.. श्री. नरेश कांबळींपासून बाळू पाटणकरांपर्यंत, ग्रामपंचायतीच्या मित्रपरिवारापासून गिरीश धनावडे यांचे पर्यंत सर्वांचे आभार मानून झाले. आभाराचे दोन शब्द इथे संपले. पुन्हा नेहमी प्रमाणे आरती पालखी प्रदक्षिणा झाली. चहापान कार्यक्रम झाला. ३५०–४०० भाविकांना चहा मिळाला. काहीनी कॉफीचा आस्वाद घेतला.. चहापान कार्यक्रम भलताच हायलाईट झाला. श्री. तुळशीदास लिंगायत यांनी अप्रतिम चहा व्यवस्था सांभाळली. दोन तीन स्टिल थर्मास आणले होते. चहा देणारी माणसे नेमलेली होती. कचरा कुंडी नजीकच ठेवल्यामुळे चहा पिऊन झाल्यावर सर्व कागदी ग्लास कचराकुंडीत गेले. कुठेही कोणीही चहाचा कागदी कप बाहेर इतरत्र टाकला गेला नाही. देव सभेत काढणे झाले.. ह. भ. प. श्री. मोहनबुवा कुबेरांच्या लळीताच्या कीर्तनाला सुरुवात झाली. रामरायाला सिंहासनावर बसविणे झाले. बुवांचा सन्मान करणे हे परंपरेने झाले. सोबत 'देसाई सन्मान' झाला. 'तीर्थ चरणीचे शीतल' झाले.. भुसकुटे अन् जोशींनी तीर्थ बेलाचे पानाचा प्रसाद सर्वांना दिला. 'हेचि दान देगा देवा' झाले. खऱ्या अर्थाने उत्सवाची समाप्ती झाली. समाप्तीचे गुरव गऱ्हाणे झाले. 'हर हर महादेव' झाले. मानपानाचे श्रीफळ पहिले गवाणकर खोतांचे हाती आणि मग क्रमवारीने सर्व सेवेकरी मानकरी मंडळींना दिले. समारोपाचा प्रसाद देण्यात आला. बुंदीलाडू सर्वांच्या हाती पडला. बंगल्या बाहेर 'बोबरे बोबरे होळदेव' ही महेश कांबळीची होळीची पहिली फाक झाली. महाशिवरात्रीचा उत्सव समाप्त झाला अन् होळीचा उत्सव सुरु झाला हे सांगणारी ती 'बोबरे बोबरे होळदेव' अशी ती फाक.

- **होळी उत्सव २०२२**

अगदी सुखेनैव आणि सुखरुप पद्धतीने श्री देव अंजनेश्वर आणि श्री देवी मुहूर्ताचा होळी उत्सव संपन्न झाला. निर्विघ्नपणे पार पडला. कोरोना नियमावलीच्या शंकाशक्यता असतानाही अगदी प्रतिवर्षीच्या धाटणीत हा उत्सव साजरा झाला.. पायी चालत चालत करेलच्या खोतांच्या घरी पोहोचणे झाले. गुरुवारी दि. १७ मार्च रोजी घड्याळाच्या १२ च्या ठोक्याला पोहोचणे झाले. रात्रीचे नेहमी प्रमाणे अंजनेश्वर मंदिरात सर्व खेळगडी जमले होते. ढोलताशांचे चढवणे झाले. 'एक बाजा' अंजनेश्वर ला अर्पण झाला. ठीक १० वाजता मुहूर्ताकडे प्रस्थान झाले. साडेदहाला श्री देवी मुहूर्ताईला गाऱ्हाणे झाले. श्री महेश कांबळीचे ते खर्जातले गाऱ्हाणे. 'खेळगड्यांच्या हातापायाखाली सांभाळ कर... बरें कर' असे ते सांगणे होते. या वर्षी मुहूर्तादेवीच्या मंदिरात सर्व खेळगड्यांच्या हातावर बटाटा वडा पडला. बटाटवड्याचा स्पॉन्सर कोण ते श्री देवी मुहूर्ताई जाणे. गरमागरम आणि चुरचुरीत बटाटवडा सर्वांच्या हातावर मिळाला, वडामेकर श्री. मनोज परमार. अप्रतिम बटाटवडा. तिथून पुन्हा ढोल ताशांनी ठेका धरला. सर्व चालत चालत पुन्हा अंजनेश्वर नगारखान्यापाशी आले. होळी उत्सवात मदिरेचा अंमल रहातो म्हणून ते बाहेर नगारखान्यापाशी थांबणे झाले. तो एक अलिखित नियम झाला आहे आणि ती एक प्रथा झाली. होळीचे दिवशी सर्व नगारखान्यापाशीच... गऱ्हाणे सुद्धा नगारखान्यातून करायचे. पूर्वापारची प्रथा. इथे लिंगायत गुरवाचे आणि गावडेगावकराचे जॉईंट गऱ्हाणे असते. तिथे पुन्हा तेच. 'खेळगड्यांच्या हातापायाखाली सांभाळ कर आणि बरें कर.' दोनपाच 'बोबरे बोबरे होळदेव' च्या फाका जास्त नाही.. गुरुवार असल्याने मदिरादेवीचा संचार यावर्षी कमी होता. पुन्हा ढोल ताशांचा ठेका. अंजनेश्वर घाटीमार्गाने प्रस्थान झाले. कांचनवाडीचे वाजंत्री पथक होते. देविदास रायकरचा ताशाचा ठेका अन् बाकीच्यांचे ढोल बडवणे त्यापाठोपाठ दोन निशाणे. निशाण धरण्याचा मान मोहीते प्रिंदावणकर यांचेकडे. श्री. वसंत मोहिते अगदी टायमावर हजर होते. देवगडवरून गाडी प्रवास करुन श्री. वसंतराव मोहीत्यांची उपस्थिती महत्त्वाची. स्वतः चार लॉण्ड्री व्यवसाय दोन दिवस पूर्णपणे बंद ठेवून येणे असते म्हणून जास्त उल्लेख करून सांगितले पाहिजे. सोबत निशाण धरायला नरेश प्रिंदावणकर. सोबत ३००/४०० होळीचे खेळगडी.

चालणे शक्य नसलेले दुचाकी चारचाकी मधून आले. बाकी सर्व माझेसह सर्व चालत चालत आले. सुमारे ६/७ किलोमीटर अंतर.. करेल गावी जाणे ते चिरेखणी मार्गे.. पूर्वी शॉर्टकट रस्ता होता. अणुऊर्जेची भिंत उभी राहीली आणि तो शॉर्टकट संपला... वळसा मारून जावे लागते. करेलच्या खोताचे घरी ठीक रात्री १२ वाजता पोहोचलो. अगदी सांगितल्या प्रमाणे पोहोचणे झाले. करेलकर खोतांची तयारी जय्यत होती. लायटीचे फोकस लावून रस्त्यावर लख्ख प्रकाश केला होता.. अगदी दिवसासारखा उजेड होता. खोतांच्या घरी अंगणाला दगडी फरस बसवलेली असल्याने सर्व अंगण अगदी बैठकीस योग्य आणि अनुकूल होते. कै. शशिकांत केशव जोशी यांच्या स्मृती प्रीत्यर्थ एक बोर्ड लावलेला होताच. आमचे ते 'काका'..'करेलकर खोत'. 'डॉक्टर, तुझे ते करेलकरखोत हे मला आवडते. शरीरावर मूठभर मांस चढल्यासारखे वाटते' हे कै. शशिकांत जोशी (काका) यांचे शब्द अगदी त्यांची आठवण देतात. याच वर्षी त्यांचे स्वर्गस्थ जाणे झाल्यामुळे त्यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. पण पुढच्या पिढीने स्वागतामध्ये कोणतीही कमी ठेवली नाही, कसूर ठेवली नाही. पुरेसा गुळ आणि पुरेसे पाणी. पुरेसा अल्पोपहार आणि पुरेसा चहा होता. ढोलकरी लोकांना खेळेपण मिळाले.., निशाण धरणाऱ्या मोहीते प्रिंदावणकरांना खेळेपण मिळाले. होळीचा शेंडा बांधणाऱ्या विजय गवाणकरांना खेळेपण मिळाले. खोतांनी सर्वांचे मानपान केले. करेलकरखोतांनी कोणतीच उणीव ठेवली नाही. सारेसारे खुष झाले. 'नव्वदीतले करेलकर खोत' सुद्धा या होळी उत्सवाला हजर. 'राजाराम जोशी'. कै. शशिकांत जोशी यांचे वडील बंधू. वैभव जोशी आमचे सध्याचे खोत कै. शशिकांत जोशी यांचे चिरंजीव. श्री. वैभव यांचे आत्ते भाऊ दिलीप ठोसर, त्याची पत्नी संगीता ठोसर, आत्ते बहीण जयश्री पटवर्धन तिचे यजमान राजन पटवर्धन हे सुद्धा आवर्जून बाहेरून म्हणजे पुणे मुंबई हून केवळ गावची होळी पहाण्यासाठी आले होते. श्री. वैभवच्या मातोश्री श्रीम. सुनीता जोशी उपस्थित होत्या. त्यांची उपस्थिती सुद्धा महत्त्वाची होती.. वैभव जोशींची पत्नी सौ. अनुजा जोशी व मुलगा अथर्व जोशी हे सर्व उपस्थित होते. करेलचे खोत म्हणून श्री. वैभव यांनी निशाणाचे पूजन केले. घरातील सर्वांनी निशाणाला फुले वाहिली. पाहुणचार आटोपून होळीची पोफळ तोडून झाली. करेलकर सुवासिनींनी आरती ओवाळणी केली. अगदी रांगेत उभे राहून 'केवढी श्रद्धा केवढा विश्वास'... बारा वर्षांनी येणारा हा क्षण. अपूर्वाई मोठी. सर्व करेलवाडी एकजुटीने होळी खेळवण्यात सहभागी झाले होते. होळी करेलच्या सीमेपर्यंत आणून त्यांनीच दिली. अख्खा डोंगर चढून वर होळी आणून देणे हे जरा उपकारी काम करेलकर वाडी वासीयांनी पार पाडले. करेल तिठा ते मिठगवाणे अंजनेश्वर मंदिर हा प्रवास अगदी स्पीडमध्ये पायी चालत चालत झाला. दुचाकी चारचाकी वाले भुरकन गेले. पायी चालणारे आम्ही सर्व चालत राहिलो अन् रात्री अडीचच्या सुमारास कुळंबौशीमधील राणे कुटुंबाच्या घरी पोहोचलो. तेथील आगतस्वागत सुद्धा तितकेच मनस्वी झाले होते. गुळाची रेलचेल.. गुळखोबरे पसापसा खेळगड्यांचे हातावर. अल्पोपहाराचे बंद पाकीट, कडकडीत चहा आणि विशेष म्हणजे प्लास्टिक पिशवीत बंदिस्त केलेली पुरणपोळी सर्व खेळगड्यांचे हाती पडली. मित्रांनो.. हे पुरणपोळी चे वाटप 'इनोव्हेटीव्ह' वाटले. तासेकरी, निशाणवाल्याना खेळेपण मिळाले. कसलीच कमतरता नव्हती. आगतस्वागत अप्रतिम झाले. संपूर्ण परिसरात रोषणाई. 'कुठेही काळोख नाही.' होळीची पोफळ तुटली. संतोष लिंगायतने तोडली. हे तोडणे तसे सोपे नाही. ते शिक्षण कुठल्या शाळेत मिळत नाही. उपजतचे शिक्षण. होळी तुटली.. वाजतगाजत मंदिराच्या नगारखान्यापाशी आली. दोन्ही होळीच्या पोफळा नगारखान्यापाशी. नगारखान्याच्या पायरीपाशी गुरवाची पूजा झाली. शेंडा बांधकाम करणारे गवाणकर यांचा सन्मान झाला. श्रीफळ देवून सन्मान झाला. मानाचे श्रीफळ श्री. विजय गवाणकर यांनी स्वीकारले. होळीचा खड्डा काढणारे गडगेकर व त्यांच्या कुटुंबातील प्रतिनिधी म्हणून श्री. बबन गडगेकरचा श्रीफळ देवून सन्मान झाला. काम साधेक्षुल्लक असले तरी कधीही कोणतीही अपेक्षा न ठेवता केले जाते म्हणून तो सन्मान. एक होळी खेळवली गेली. मंदिराच्या जवळ होमविधी झाला.

. 'वंदितासि सुरेंद्रेण'

आम्हीच प्रार्थनेचे मंत्र म्हणून दोन फुले गंध अक्षतांसह होमामध्ये अर्पण केली. इथे स्वर्गीय काका परांजपे तथा मनूकाका आठवल्याशिवाय रहात नाही. ते 'वंदितासि सुरेंद्रेण ' हे त्यांच्या वाणीतले काहीसे वेगळेच वाटायचे. ते वाणीतले गुरुत्व आमचेपाशी कसे असणार?? आम्ही तो सोपस्कार पूर्ण केला इतकेच. 'बोबरे बोबरे होळदेव' म्हणत सकाळी ५.०० वा. हा होमविधी झाला. दुसरा दिवस म्हणजे दि. १८ मार्च रोजीचा दिवस. 'धुळवडीचा दिवस' 'शेंडा बांधणे हा मोठा सोपस्कार.' गवाणकर परिवारातील सदस्यांकडून हा शेंडा बांधण्याचा कार्यक्रम अगदी वर्षानुवर्षे.. होळीच्या शेंड्याला ट्रॅक्शन बांधणे कै. सख्यानाना गवाणकर, कै. आप्पा पावसकर हे शेंडा बांधायचे काम अविरत करायचे.. आत्ता त्यांची पुढची पिढी अगदी तेवढ्याच उत्साहाने करते. त्यानंतर ११ ते १ पर्यंत होळी खेळविणे आणि ठीक १ वाजता नेमात घालणे, खड्ड्यात घालणे. नैवेद्य दाखविणे आदी सर्व अगदी विधी पूर्वक. संध्याकाळी ठीक सात वाजता गाऱ्हाणे साठी सर्वांनी जमणे झाले. सुमारे १००/१५० ची उपस्थिती होती. हा गऱ्हाणी कार्यक्रम देवीच्या मांडावर झाला. त्यानंतर पुन्हा श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरात. तिथे पुन्हा गुळखोबरेचा नैवेद्य आणि बचका बचका खिरापतीचा प्रसाद सर्वांना मिळाला. आणि दोन दोन घोट नारळाचे पाणी. मित्रांनो, यातील मौज काही औरच असते.. आणि हातावर एक एक नारळाची वाटी पडली की ते काही पोटभरीचे वाटते हे सर्व वर्षभर पुरते. हे सर्व प्रतिवर्षीचे. पुन्हा ढोलताशांचे गजरात निशाणासह खेळगडी अंजनेश्वर च्या 'चरणापाशी'... इथे होळी उत्सवाची 'सां–ग–ता'

- **नाट्य प्रयोग– संगीत विठ्ठल विठ्ठल.**

श्री. गंगाराम गवाणकर लिखित 'संगीत विठ्ठल विठ्ठल' नाट्य प्रयोग ३१ डिसेंबर २०२१ रोजी अंजनेश्वर कलामंचावर सादर झाला.... नवीनवर्षाच्या पूर्वरात्रीला हा नाट्य प्रयोग सादर झाला करण्यात आला... देवस्थानचे वतीने या नाट्यप्रयोगाला एक हजार रूपयांचे बक्षीस देण्यात आले.

- **आयकर खात्याकडील नोंदणी**

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट दि. ०४ एप्रिल २०२२ रोजी युनीक रजिस्ट्रेशन नंबर – AARTS7339FE20214 ने आयकर खात्याकडे नोंदणीकृत झाला आहे. ट्रस्ट आयकर खात्याकडे रजिस्ट्रेशन झाल्याबाबतचे आदेश मे. प्रिन्सीपल कमीशनर ऑफ इन्कम टॅक्स यांनी पारित केले आहेत. श्री देव अंजनेश्वर ट्रस्टच्या इतिहासात याची नोंद निश्चितच होणार आहे. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट दि. १७.०५.१९५२ रोजी कोल्हापूर धर्मादाय कार्यालयामध्ये नोंदला गेला. नोंदणीमध्ये दोन देसाई लोकांनी पुढाकार घेतला म्हणून त्यावेळच्या ट्रस्ट ॲप्लिकेशनमध्ये त्या दोघांची नावे नोंदली आहेत. कै. सदाशिव लक्ष्मण तथा बाबुराव देसाई व कै. गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई. हे ते दोन देसाई आसामी की ज्यांच्या नशिबी 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' हा ट्रस्ट नोंदण्याचे पुण्य जाते. अंजनेश्वर ट्रस्ट धर्मादायकडे नोंदणीकृत करुन या येत्या १७ मे २०२२ ला ७० वर्षे पूर्ण होणार आहेत. जसा ट्रस्ट धर्मादाय खात्याकडे नोंदला गेला तसाच हा ट्रस्ट आयकर खात्याकडे (Income Tax Office) नोंदला जाणे आवश्यक व बंधनकारक वाटत होते. आयकर खात्याकडे धार्मिक ट्रस्ट नोंदणे अशासाठी आवश्यक होते की असा ट्रस्ट आयकर खात्याकडे नोंदला गेला की धार्मिक स्वरूपाचा ट्रस्ट म्हणून आयकरातून १००% माफी मिळते. वार्षिक टिडीएस बँकेकडून कापून जो आयकर खात्याकडे जातो तो सर्व च्या सर्व रिफंड मागता येतो. दोन लाखांच्या आत कुणा भाविक भक्तांने डोनेशन दिले तर त्यावर ट्रस्टला कोणताही कर भरावा लागणार नाही.. १००% करमाफी मिळते.. थोडक्यात भाविकाने दिलेल्या देणगीतला एकही रुपया आयकराच्या रूपाने देवस्थानला भरावा लागणार नाही.. माझ्या

एकट्याच्या सही शिक्क्याने हे आयकर खात्याकडील रजिस्ट्रेशन झाले... लॉगईन, पासवर्ड, ओटीपी आदी ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पार पडली. सीए श्री. निलेश नंदकुमार पाटणकर व सीए सौ. नम्रता निलेश पाटणकर यांच्या मनस्वी प्रयत्नामुळे ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुलभतेने झाली.. त्यांच्या कडील स्टाफने मेहनत घेतली. नोंदणी फॉर्म फाईल झाला. दि. २५ मार्च २०२२ रोजी फॉर्म भरला गेला... ह्या फॉर्म ला नोंदणी अर्ज क्रमांक 421150800250322 असा देण्यात आला. आयकर खात्याकडे श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या धार्मिक पब्लिक ट्रस्ट ची नोंदणी झाली.. युनीक रजिस्ट्रेशन नंबर म्हणून AARTS7339FE20214 हा नंबर मिळाला. एखादे काम आपल्या प्रयत्नांमुळे मार्गी लागले की खूप आनंद होतो, समाधान मिळते. मलाही तोच अनुभव आला. त्यातील आनंद कमी कमी होवून कधी काळी तो स्मृतीपटलावरून विरून जावू नये म्हणून असे भलेभक्कम लिहून ठेवायचे. असे लिहून ठेवले की सर्व संदर्भ बरकरार रहातात.. आयकर खात्याकडील श्री देव अंजनेश्वर ट्रस्ट ची नोंदणी माझ्या आधार कार्ड/PAN कार्डने आणि माझ्या मोबाईल नंबरने झाली, हे कायमस्वरूपी माझ्या लक्षात राहील. श्रीदेवाचे भक्कम पाठबळ मिळते म्हणून हे सर्व काही शक्य होते.

- **मिटिंग वात्सल्य ट्रस्ट सोबतची.**

गुरूवार दि. २३ जून रोजी संध्याकाळी ४.०० वाजता वात्सल्य ट्रस्ट, मुंबई याचे सेक्रेटरी श्री. रा. रा. श्रीकांत जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंजनेश्वर मंदिराला सदिच्छा भेट दिली.. आमचे मित्र श्री. उमर हसन नाईक यांनी हा योगायोग जुळवून आणला. या भेटीच्या वेळी देवस्थानचे मानकरी, सेवेकरी, खोत आणि देवस्थान हितसंबंधी उपस्थित होते. श्री. जोशी यांनी वात्सल्य ट्रस्ट चे सेवाकार्य विषद केले.. वात्सल्य ट्रस्ट ला या पंचक्रोशीमध्ये सेवाकार्य सुरु करण्याचा मनोदय बोलून दाखवला. त्यांनी भक्तनिवास, मंदिराशेजारील सभागृह याची पहाणी केली. वात्सल्य ट्रस्ट च्या सेवाकार्यामध्ये सहयोग देण्याचे सांगण्यात आले... श्रीदेवाच्या कार्तिकोत्सवामध्ये उपस्थित रहाण्यासाठी चे आमंत्रण देण्यात आले.... एकूण कालचा 'मंदिर भेटी'चा कार्यक्रम उत्साह वर्धक आहे.... या वेळी सर्वश्री श्री. दत्ताराम जगन्नाथ पाटणकर, श्री. नरेश विठ्ठल कांबळी, श्री. शामसुंदर गवाणकर, श्री. उमर हसन नाईक, श्री. गंगाराम तात्या गवाणकर, श्री. भागवत राऊत, श्री. विलास चेऊलकर, डॉ. श्री. प्रदीप मयेकर, श्री. दिवाकर आडविलकर, श्री. मनोहर धुरी, श्री. संतोष वामन लिंगायत, सदानंद तुकाराम लिंगायत, दिनकर लिंगायत श्री. सुधाकर लिंगायत आदी मंडळी उपस्थित होते. वात्सल्य ट्रस्ट च्या पुढाकाराने 'शिलाई कोर्स' सुरू करण्यासाठी सर्व तयारी झाली आहे..

- **श्रावण दिंडी**

कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे प्रतिवर्षी ची श्रावण दिंडी निघाली नव्हती.. या वर्षी माडबनच्या श्री देव बांदेश्वरला श्रावण दिंडी गेली होती. सोमवार दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी महामेरी वाडीमार्गे श्रीदेवी भगवतीचे दर्शन घेऊन श्रावण दिंडी श्रीबांदेश्वर मंदिरात पोहोचली... सुमारे १०००/१२०० भाविकभक्तांचा सहभाग होता. सुतारवाडी, वारीकगडगेकर वाडी, महामेरीवाडी या ठिकाणी श्रावण दिंडीचे स्वागत झाले. श्रीदेव बांदेश्वर मंदिरामध्ये माडबनकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. नामजप, भजने आदी कार्यक्रम होवून श्रावण दिंडी ठीक पाच वाजता अंजनेश्वर मंदिरात पोहोचली..

- **स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रम**

बुधवार दि. २९ डिसेंबर २०२१ रोजी शासनाच्या वतीने हा कार्यक्रम श्री देव अंजनेश्वर मंदिराच्या आवारात पार पडला. महसूल, वन, खारलँड, आरोग्य आदी शासनाच्या १०/१२ विभागाचे अधिकारी कर्मचारी लोकांची रखडलेली कामे समजून घेणे, मार्गी लावणे आदींसाठी आले होते. जिल्हाधिकारी रत्नागिरी, अपर जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी आदी सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होता. अनेक दाखल्यांचे, सातबारा उताऱ्यांचे वाटप या दिवशी झाले. अनेकांचे प्रश्न थेटपणे मार्गी लागले.

- **लग्न समारंभ.**

श्री. विक्रांत गडकर यांचा लग्न समारंभ मंगळवार दि. २८ डिसेंबर २०२१ रोजी अंजनेश्वर मंदिराच्या कला मंचावर मोठ्या थाटामाटात पार पडला. देवस्थानची मंडपव्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्था, जनरेटर सिस्टिम, रहिवास व्यवस्था, भोजन व्यवस्थेचे साहित्य आदी उपयोगात आले. गडकर कुटुंबीयांनी लग्नसमारंभाप्रीत्यर्थ देवस्थान ला देणगी दिली.

- **दोन दानपेट्यांची स्थापना.**

नंदिदेवतेच्या दोन्ही बाजूला दोन दानपेट्या अक्षय्यतृतीया मंगळवार दि. ०३ मे २०२२ रोजी बसविण्यात आल्या. धर्मादाय कायद्याच्या तरतुदीनुसार या दानपेट्या देवतेच्या समोर बसविण्यात आल्या. दानपेट्या घडावट श्री. सय्यद सुलेमान हसोळकर यांनी केली.

- **सांस्कृतिक कला केंद्र हॉलची व्यवस्था.**

सांस्कृतिक कला केंद्र हॉल ग्रामपंचायत सभांना अथवा अन्य कोणत्याही सभा संमेलनाला सदैव तत्पर असावा या उद्देशाने तेथे कायमस्वरूपी दोनशे खुर्च्या, पोडीयम, रबर मॅटींग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सोय करण्यात आली आहे. ह्या हॉलची झाडलोट, साफसफाई आदी सर्व देखभाल व्यवस्था श्री. सुधाकर कृष्णा लिंगायत यांचेकडे असल्याने हा हॉल कार्यक्रमांसाठी सदैव सज्ज रहात आहे. सांस्कृतिक कला केंद्र इमारती जवळ कंपाऊंड वॉल व वॉल माऊंट बल्ब बसविल्यामुळे उत्सवामध्ये मंदिराच्या बाहेरील परिसर लख्ख प्रकाशात आला आहे..

- **नवीन विहिरीसभोवताली फुलझाड लागवड.**

मंदिराच्या बाहेरील विहिरीच्या सभोवताली, सांस्कृतिक कला केंद्रासमोर फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे.

- **सुपारी रोपांची लागवड. केळी लागवड, नारळ लागवड.**

उत्सवामध्ये देवाच्या धार्मिक कार्याला सुपारी, नारळ, केळीची पाने उपलब्ध व्हावीत म्हणून सुपारी, नारळ व केळी रोपांची लागवड केली आहे.

- **देवस्थान जमीन लागवडीखाली...**

देवस्थानच्या पडीक जमिनी लागवडीखाली आणण्याचे काम हाती घेतले आहे. दि. २८.०४.२०२२ रोजी मे. तहसीलदार राजापूर यांच्या दालनात त्याबाबतची पहिली मिटिंग झाली आहे.. रोजगार हमी योजना, एकात्मिक फळबाग योजना, आदी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन सर्व पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अर्थात हे काम फार मोठे आहे. लागवडीबाबतचा विचार समजून घेणे, शासनाच्या योजनांचा उपयोग करून घेण्यासाठी सर्वांचा पुढाकार व एकजिनसी सहकार्य अपेक्षित आहे. सर्वांनी मनापासून सहकार्य केले व याकामी आपला सहभाग नोंदवला तर सुमारे ४५ हेक्टर पडीक जमीन लागवडीखाली येईल.

- **देवस्थान जमिनीवरील बँक बोजे उतरवण्यासाठी प्रयत्न.**

देवस्थान जमिनीवर बँक बोजे होते. या जमिनी तारण ठेवून बँकानी, सहकारी सोसायट्यांनी काहींना कर्ज दिलेले होते. कर्ज भरून झाल्यावर कर्जबोजा उतरवून न घेतल्याने पूर्वीच्या कर्जांचे बोजे देवस्थान जमीनीवर नोंदलेले राहिले होते. संबंधीत बँकांशी, सहकारी सोसायट्यांशी आणि तलाठी कार्यालयाशी पत्रव्यवहार करून हे देवस्थान जमिनीवर कर्जबोजे कमी करण्यात आले आहेत. यापुढे असे कर्जबोजे देवस्थान जमिनीवर होणार नाहीत.

- **नगारखान्याबाहेरील सुशोभीकरण...**

शासनाच्या यात्रा स्थळ विकास अनुदानातून नगारखान्यासमोर पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले. मात्र देवस्थान स्वनिधीतून त्याठिकाणी कठडा बांधकाम, पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी चेंबर आणि पाण्यासाठीचा बांधीव मार्ग, २/३ लोखंडी सरकते गेट, बसायला चार सिमेंटच्या बसण्या, फुलझाडांच्या वीस कुंड्या, हायमास्क, संपूर्ण कठड्यावर

बल्बची रोषणाई, वेलवर्गीय फुलझाडांसाठी प्लास्टिक गार्डन जाळी बसविणे, भाविक भक्तांना चढण्याउतरण्यासाठी सुलभ पायऱ्यांचे बांधकाम, वाहनांसाठी रॅम आदी सर्व सर्व कामे अगदी पुढाकाराने देवस्थान निधीतून करून या कामाची पूर्तता करण्यात आली आहे..

- **सामानखोलीचे बांधकाम.**

विशेषतः मंडपांचे सर्व सामान रहावे व देवस्थानचे सामान, भंगार सामान सुरक्षित ठेवता यावे म्हणून सामानखोलीच्या भिंती पूर्णपणे बांधून नवीन दरवाजा नवीन खिडक्या बसविण्यात आल्या आहेत... ६० फूट लांब आणि १५ फूट रुंदीची सामानखोली झाल्यामुळे सर्व सामान, भंगार सामान ठेवण्यासाठी पुरेशी व्यवस्था झाली आहे..

- **श्रीमुहूर्ताई मंदिरासाठी लोखंडी कपाट.**

नवरात्र उत्सवामध्ये देवीचे मौल्यवान वस्तू सामान ठेवता यावे म्हणून एक लोखंडी कपाट घेण्यात आले आहे.. तेथील पुजारी गावकराला नेहमीसाठी सुद्धा त्या कपाटाचा उपयोग होईल या उद्देशाने ते कपाट घेण्यात आले आहे. साडेपाच हजारांचे कपाट घेतल्यामुळे सर्व सामान कपाटबंद करून ठेवता येते.

- **विहिरीला कठडा अन् जाळी...**

श्री देवी मुहूर्ताई मंदिरातील विहीरीला कठडा बांधकाम व विहिरीवर अल्यूमिनियम जाळी बसवण्यात आली. यामुळे विहीरीला बंदिस्तपणा आला.

- **लोखंडी गेट...**

श्री देवी मुहूर्ताई मंदिराचा लोखंडी गेट नवीन करण्यात आला. पूर्वी बसवलेला लोखंडी गेट पावसाळी पाण्यामुळे गंजून गेल्यामुळे नादुरुस्त झाला होता.

- **तांब्याचे टिमकी वाद्य...**

श्री देवाच्या वाजंत्री सामानामध्ये टिमकी वाद्य नव्हते. तांब्याची टिमकी घेण्यात आली.. दोन तासे, १० ढोल, झांजा आदी वाजंत्री साहित्य यापूर्वी घेतले होते. यामध्ये टिमकी वाद्याची कमतरता होती. ती कमतरता भरून निघाली आहे.

- **श्रीदेवाची चांदीच्या दोन्ही चौऱ्यांचे आणि मोरचेर पंख्याचे नूतनीकरण...**

नवीन वनगाईचे केस घेऊन चवऱ्यांचे नूतनीकरण व पॉलीश वर्क आणि मोरपीस पंख्याचे नूतनीकरण करण्यात आले. श्री. भिकाजी लिंगायत व श्री. उमेश काजवे यांनी हे चवऱ्या दुरुस्तीचे जोखीमीचे काम मुंबईमध्ये करून घेतले.

- **देवाच्या पालखी वर प्लास्टिकचे छत...**

कार्तिकोत्सवामध्ये बऱ्यापैकी पाऊस असल्याने प्लास्टिक छत करून घेतले. भगवान पावसकर, रफिक हसोळकर यांनी त्याची घडावट केली. हे प्लास्टिक छत काहीसे खर्चिक झाले असले तरी भविष्यात कार्तिकोत्सवात पाऊस झाल्यास ते उपयोगी पडणार आहे.

- **सांस्कृतिक कला केंद्र इमारतीमध्ये काही किरकोळ दुरुस्ती आणि सुधारणा...**

नवीन फिटिंग करण्यात आले. इमारतीमध्ये खेळती हवा रहावी म्हणून छप्पराचा काही भाग तिनचार फुट वाढवण्यात आला. श्री. सय्यद सुलेमान हसोळकर यांनी अत्यंत मेहनतीने हे काम केले. सांस्कृतिक कला केंद्र इमारती मध्ये शंकराच्या तांडव नृत्यामधील पोर्ट्रेट करण्यात आले. श्री. सुशील परब यांनी ते तयार करून बसविले. सांस्कृतिक कला केंद्रात ओव्या, सुविचारांच्या सुमारे १०/१२ पाट्या लावल्या आहेत..

- **पेस्ट कंट्रोल...**

प्रतीवर्षी प्रमाणे अंजनेश्वर मंदिर, कालभैरव मंदिर, धर्मशाळा मुहूर्ताई मंदिर आणि भराडीण मंदिर यांचे पेस्ट कंट्रोल करून घेतले आहे. श्री. जगदीश चेऊलकर हे पेस्ट कंट्रोल चे काम निःशुल्क करीत आहेत..

- **गोदरेज कुलपे...**

नवतालची सेव्हन लिव्हर पितळी ब्रॅण्डेड कुलपे नग ८ घेतली.. मंदिर सुरक्षेचा एक भाग ही गोदरेज कुलपे घेऊन त्या कुलुपांच्या नोंदी (कुलुपावरील सिरियल नंबर) 'कि कंट्रोल रजिस्टर' मध्ये केल्या आहेत.

- **बागकामासाठी हत्यारे...**

फुलबागेसाठी नियमितपणे फुलझाडांचे कटींग-शेपींग करता यावे म्हणून कटर, मोठ्या कात्र्या आदी सामान आणले आहे.

- **रबर मॅटींग...**

उत्सव कालावधीमध्ये उपयोग व्हावा म्हणून १०० मीटरचे रबर मॅटींग घेतले आहे. उत्सवामध्ये पाऊस पडल्यामुळे या रबर मॅटींगची गरज भासली. सांस्कृतिक कला केंद्रामध्ये या रबरमॅटींगचा उपयोग 'पायघडी' म्हणून नेहमीसाठी होत आहे.

- **पितळी समई नग २ ...**

श्री. संदीप मांजरेकर माडबन यांनी सुमारे पस्तीस हजार किमतीच्या दोन पितळी समया गाभाऱ्यात लावण्यासाठी दिल्या आहेत. या दोन समयांमुळे गाभाऱ्यात लख्ख प्रकाशाची सोय झाली आहे.

- **मुहूर्तामंदिरामध्ये नवीन इन्व्हर्टर...**

श्री. श्रीपाद भुस्कुटे, गोवा यांच्या वस्तूरूप देणगीतून नवीन इन्व्हर्टर बसविण्यात आला आहे. पूर्वीही या मंदिराला त्यांनीच इन्व्हर्टर ची देणगी दिली होती.

- **नवीन बॅटऱ्या...**

अंजनेश्वर मंदिरातील इन्व्हर्टरच्या बॅटऱ्या बदलल्या. सुमारे पंचवीस हजार खर्च करून मंदिरामधील इन्व्हर्टर बॅटऱ्या बदलण्यात आल्या आहेत. जुन्या बॅटऱ्यांची विक्री करून त्याची रक्कम जमा झाली आहे.

- **कालभैरव दरवाजा...**

श्री कालभैरव दरवाजा जुना झालेला असल्याने सागवानी नक्षिकामाचा नवीन दरवाजा करून घेण्यात आला.

- **'कि' कंट्रोल रजिस्टर...**

लिंगायत गुरवखी रजिस्टर सोबत 'कि कंट्रोल रजिस्टर' तयार करून ते अंमलात आले आहे. गुरवखी एका पुजाऱ्या कडून दुसऱ्या पुजाऱ्याकडे सुपूर्त करताना सर्व सामानाची जबाबदारी रहाते. बँकामध्ये जशा कुलुपांच्या किल्ल्या हँड ओव्हर करणे ही प्रक्रिया असते तशा पद्धतीने हे कि कंट्रोलचे कामकाज सुरू झाले आहे. या कि कंट्रोल रजिस्टरची माहिती पोलीस स्टेशन व धर्मादाय खाते यांना पत्रव्यवहार करून देण्यात आली आहे.

- **'लिंगायत सेवा मानधन भत्त्याबाबत...'**

श्री देव अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या खात्यातून आर्थिक वर्ष सन २०१३/१४ मध्ये रू. ७२०००/- सन २०१९/२० मध्ये रु. १,२०,०००/-, सन २०२०/२१ रू. १,३५,०००/- आणि सन २०२१/२२ मध्ये १,३२,०००/- 'लिंगायत नित्य सेवा मानधन' म्हणून खर्ची पडलेली आहे... सदरचे मानधन संबंधित लिंगायत गुरवांच्या बँक खात्यात थेटपणे ट्रान्स्फर झाले आहे व या बाबत चे ऑडीट अकाऊंटींग झालेले आहे.... सन २०२२/२३ या वर्षी संबंधित चार लिंगायत पुजाऱ्यांना प्रतिमहा रू. ३५००/- सेवामानधन देण्यात येत आहे. या मानधनाचे बदल्यात मंदिर परिसराची झाडलोट, देखभाल, फुलझाडांसाठी पाणी देणे आदी किरकोळ कामे अपेक्षित धरलेली आहेत... तसेच या मानधन रक्कमेतून **अटल पेन्शन योजना, दोन लाखांचा अपघात विमा, दोन लाखांचा आयुष्य विमा व पीडीएफ ह्याचे संरक्षण देण्यात आले आहे**. या सेवा मानधनाचा लाभ १) सदानंद तुकाराम लिंगायत,

२) संतोष वामन लिंगायत ३) दिनकर दत्तात्रय लिंगायत ४) सुधाकर कृष्णा लिंगायत हे चार लिंगायत पुजारी घेत आहेत. सेवा मानधन देण्यासाठीची पुरेशी आर्थिक तरतूद श्री देव अंजनेश्वरच्या 'मुदत ठेवीच्या संचित व्याजातून' केलेली आहे. पब्लिक ट्रस्ट मध्ये सर्व काही पब्लिक असावे, प्रायव्हेट असे काही राहू नये. सेवा मानधन स्वीकारण्यासाठी उत्सुक असलेल्या लिंगायत पुजारी माणसाने रू. १००/– च्या बॉंड पेपर वर आपले विहीत नमुन्यातील 'स्वयंघोषणापत्र' भरून देणे बंधनकारक केले आहे.. मानधन स्विकारणे अथवा नाकारणे ही बाब ऐच्छिक असल्यामुळे ज्या लिंगायत पुजाऱ्यांना गरज नाही अथवा तोंडी/लेखी नकार दिला आहे त्यांना मानधन स्वीकारण्याचे बंधन घातलेले नाही. पुजारी वर्गाला ट्रस्टच्या वतीने मानधन देण्याचा विचार आजूबाजूच्या जिल्ह्यातील अन्य कोणत्याही मंदिरामध्ये अशा पद्धतीने झालेला नाही, हे इथे नमूद केले पाहिजे आणि ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे..

- **देवस्थान दप्तर...**

सन २००७ ते २०२२ पर्यंतचे ऑडीटरिपोर्ट, कीर्दखतावण्या, बँक पासबुके, सोने चांदी वस्तू सामान रजिस्टर, जड वस्तू सामान रजिस्टर, स्थावर मालमत्ता रजिस्टर, मुदतठेव रजिस्टर, दानपेटी रजिस्टर, देणगीदार रजिस्टर, व्हावचर फाइल्स, देणगी पावत्या, मुदत ठेव पावत्या, जनरल सभांची प्रोसिडिंग बुक्स, सातबारा/फेरफार उतारा फाईल, आवकजावक, सर्व अहवाल आदी सर्व दप्तर देवस्थानच्या धर्मशाळेच्या खोलीत कपाटबंद ठेवून सुरक्षित ठेवलेले आहे. कधीही दप्तर तपासणी झाल्यास कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सदरचे दप्तर क्रमवारीने लावून त्याचे एक रजिस्टर तयार करण्यात आले आहे. देणगीदार तथा देवस्थान हितसंबंधी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला दप्तराची पडताळणी कधीही करता येईल. अर्थात त्यासाठी देवस्थानला अल्प देणगी फी द्यावी लागेल. सन २००७/०८ ते सन २०२१/२२ पर्यंतचे सर्वच्या सर्व ऑडीट रिपोर्ट एकत्रितपणे फाईलींग करून सर्व ऑडिट रिपोर्ट फेसबुक पेजला पोस्ट लिहून लिंक केले आहेत.

- **ऑडीट अकाऊंटींग...**

देवस्थानचे ऑडीट अकाऊंटटिंगचे काम मा. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर सी. ए. राजापूर यांच्याकडून केले जात आहे. सन २०२१/२२ या आर्थिक वर्षाचे अकौंटींग व ऑडीटींग करून तयार झालेला ऑडीट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटला पाठविण्यात आलेला आहे. तसेच देवस्थानचे टॅक्स–ऑडिट करून ते आयकर विभागाकडे पाठवण्यात आले आहे. देवस्थानच्या हिशोब–लिखाणाचे काम लेखनिक श्री. दत्तात्रय श्रीकृष्ण रानडे, राजापूर यांनी केले आहे.. ऑडिटच्या कामकाजामध्ये सी. ए. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर यांचे योगदान मोलाचे आहे.

- **राजापूर अर्बन बँकेचा धर्मादाय निधी...**

अर्बन बँक राजापूर यांचेकडून यावर्षीही धर्मादाय निधी रु. १५०००/– देवस्थानला प्राप्त झालेला आहे. यापूर्वी प्रती वर्षी रू. १००००/– बँक देत आहे.. देवस्थानकडून बँकेचे आभार मानण्यात आले आहेत. प्रतिवर्षीच्या कार्तिकोत्सवाला बँकेकडून धर्मादाय निधी दिला जात आहे.

- **सुसज्ज निवास व्यवस्था...**

भक्त निवासामध्ये लाकडी पार्टिशन करून सहा नवीन खोल्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या खोल्यांचे रंगकाम करून घेण्यात आले. प्रत्येक खोलीला पंखा, कॉट, कपडे वाळत घालण्यासाठीच्या दोऱ्या, बेसीन, आदी सोई करण्यात आलेल्या आहेत. एकूण ८/९ स्नानगृहे, ८/९ शौचालय, कमोडची सुविधा, युरीनल्स, गरम पाण्यासाठी स्टील बंबाची

व्यवस्था, इलेक्ट्रिक गिझर, जनरेटरची सोय, सतरंज्या, बेडशीट, उश्या, भोजनासाठी डायनिंग टेबल, प्रत्येक खोलीत डस्टबिन, मुबलक पाणीपुरवठा आदी सोयींनी सज्ज अशी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक भक्तांनी लेखी अभिप्राय नोंदवून समाधान व्यक्त केले आहे.. उत्सव कालावधीत दोन्ही वेळचे भोजन, चहापान, अल्पोपहार आदी नि:शुल्क पुरविण्यात येते.. ही सर्व व्यवस्था श्री. सदानंद तुकाराम लिंगायत व त्यांच्या पत्नी सौ. स्मिता सदानंद लिंगायत अत्यंत परिश्रम पूर्वक पार पाडतात.

- **पणत्यांची रोषणाई... दीपोत्सव...**

कार्तिक उत्सवामध्ये पणत्यांची आरास मंदिर परिसरात करण्यात आली होती. त्यासाठी लागणारे शेंगदाणा तेल अनेक भाविकांनी स्वयंस्फूर्तीने आणलेले होते. ३/४ दिवस मंदिरातील परिसर, त्रिपुर या पणत्यांच्या प्रकाशात उजळून दिसत होते. विजेच्या दिव्यांच्या लखलखत्या प्रकाशात पणत्यांचा प्रकाश आपले अस्तित्व जाणीव करून देत होता. या उपक्रमात अनेक लहानमोठ्यांचा विशेष सहभाग असतो.

- **सूचनावही–**

भाविक भक्तांच्या सूचना, तक्रारी किंवा अन्य बाबी आमच्या पर्यंत पोहोचाव्यात म्हणून मंदिरामध्ये सूचनावही ठेवण्यात आली आहे. कुणीही भाविक अथवा देवस्थान हितसंबंधी व्यक्ती त्यामध्ये आपल्या सूचना, तक्रारी, अभिप्राय लिहू शकतात. सुचविलेल्या सुचनांचा आदर केला जातो. अनेक भाविक भक्तांनी आपले फोन नंबर, सूचना, अभिप्राय या सूचनावहीत नोंदविले आहेत.



- **ब्राह्मण व्यवस्था...**

श्री. प्रकाश परांजपे, पठार तिवरांबी यांनी प्रति सोमवारी उपस्थित राहून भाविक भक्तांचे अभिषेक, एकादशणी करण्याचे मान्य केल्या मुळे सन २१/२२ पासून त्यांना मासिक रू. १२००/– ब्राह्मण पूजा मानधन देण्यात येत आहे.. त्यामुळे प्रती सोमवारी ब्राह्मणपूजा, अभिषेक सुरू झाला आहे.. सर्व भाविक भक्तांना सुद्धा ब्राह्मण उपलब्ध झाल्याने त्यांचे धार्मिक कामकाज होत आहे..

- **इमारत मालमत्ता ...**

शासकीय निधीतून बांधलेल्या शौचालयांच्या इमारती, भक्तनिवास इमारत, सांस्कृतिक कला केन्द्राची इमारत, मंदिरासमोरील पत्राशेड या सर्व इमारत मालमत्ता श्रीदेवाच्या मालकीच्या जमीन जागेवर उभ्या असल्याने या सर्व इमारत मालमत्ता देवस्थानकडे हस्तांतरित करण्यासाठी मिठगवाणे ग्रामपंचायतीने परिपूर्ण प्रस्ताव केला असून त्याला मान्यता मिळण्याची प्रक्रिया चालू आहे.. या करिता खूप पाठपुरावा करावा लागत आहे..

- **व्हिडिओ शुटिंग...**

कै. श्री. प्रशांत भडेकर, जैतापूर यांनी गेली तीन चार वर्ष व्हिडिओ शुटिंग करून सर्व उत्सवातील कामकाज पेन ड्राईव्ह मध्ये भरून दिले आहे.. सन २०२१ मधील दसरा उत्सव, काकडारती, दोन्ही जनरल मिटिंग, कार्तिकी उत्सव या सर्व कार्यक्रमाचे व्हिडीओ चित्रीकरण त्यांनी केले आहे.. हे सर्व व्हिडीओ चित्रीकरण पेन ड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात श्री. सिद्धेश सदानंद लिंगायत, श्री. साईराज संतोष लिंगायत यांनी मोबाईल फोन द्वारे महाशिवरात्री

उत्सवाचे, होळी उत्सवाचे व्हिडिओ शुटिंग करून उणीव भरून काढली आहे. उत्सवामध्ये व्हिडिओ शुटिंग होत असल्याने व ते सर्व पेन ड्राईव्ह मध्ये संकलीत होत असल्यामुळे भविष्यासाठी ते संदर्भ म्हणून उपयोगाचे होणार आहे.

- **देणगीदार रजिस्टरचे नूतनीकरण/व्हाट्स्अप नंबरचे संकलन...**

देवस्थानच्या देणगीदारांच्या पत्त्यात बदल होतात. व झालेले बदल देणगीदाराकडून कळविले जात नाहीत. परिणामी पाठविलेली निमंत्रणे पोहोचत नाहीत. गेल्या ५/६ वर्षातील देणगी पावत्यांचा मागोवा घेऊन नवीन देणगीदार रजिस्टर तयार झाले आहे. सर्व देणगीदारांचे व्हाट्स्अप नंबरचे संकलन करून त्यांना संपर्क क्र. ९८२३२७७३२६ ह्या whatsapp नंबरशी जोडले आहे. यामुळे उत्सवाबाबतच्या सूचना, निमंत्रण, अहवाल, देणगी पावती बनवल्यानंतर त्याचा फोटो आदी बाबी या व्हाट्स्अप द्वारे देणगीदार व्यक्ती पर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे.. यामुळे टपाल खर्चात बचत होत आहे.

- **संपूर्ण खर्च क्रॉसचेकद्वारे...**

देवस्थानचा सर्व खर्चव्यवहार क्रॉसचेकद्वारे करण्यात येतो. काही किरकोळ धार्मिक खर्चाचे अपवाद वगळता कोणताही खर्च रोख रक्कमेने केला जात नाही. यामुळे आर्थिक व्यवहारात शंका घेण्यास कुठेही जागा शिल्लक ठेवलेली नाही. माझ्या एका सहीशिक्क्याने सर्व आर्थिक व्यवहार होत असल्यामुळे क्रॉसचेकने अदाई करण्याचे बंधन अगदी पहिल्या पासून घालून घेतलेले आहे.

- **देवस्थानची आर्थिक स्थिती...**

रु. १ कोटी ६१ लाख ३९ हजार ९२७ इतक्या रक्कमेच्या मुदतठेवी राजापूर अर्बन बँक, जानशी पठार शाखा यामध्ये मासिकप्राप्तीठेव योजनेमध्ये ठेवून त्याचे मासिक व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला जमा होत आहे. काही भाविकभक्तांनी आपल्या स्वतःच्या नावाने मुदतठेवी ठेवून त्याचे मासिक व्याज, त्रैमासिक व्याज अंजनेश्वर बचत खात्याला ट्रान्स्फर केले आहे.. दानपेट्यांमधून जमा होणारी रक्कम राजापूर अर्बन बँकेच्या मुदतठेव योजनेमध्ये गुंतवणूक करून त्यामधून संचित होणारे मासिकव्याज श्री देवाच्या बचतखात्यात जमा होत आहे.. देवस्थानच्या बचत खात्यात रु. २,५५,२४४/- इतकी रक्कम दि. १४.९.२२ रोजी बचतखाते शिल्लक निधी म्हणून जमा आहे. पालखी/ सिंहासनासाठी चांदी जमा होत असल्याने देवस्थानच्या मालमत्तेमध्ये मोठी भर पडली आहे.. एकूणच श्री देव अंजनेश्वर देवस्थानची आर्थिक स्थिती अतिशय भक्कम झाली आहे.

(सन एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ व त्यानंतरच्या कालावधीत झालेल्या कामांचा/घडामोडींचा आढावा अगदी विस्ताराने घेतलेला आहे.)

# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
## सन २०२१ – २०२२ चा जमाखर्च तेरीज पत्रक

| | जमा | | | खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक | रु. | ५,०२,०२९.०० | उत्सव खर्च |
| रु. | १०,५७८.०० | हाती रोख | रु. | ९००.०० | प्रवास खर्च |
| रु. | १,०४,६१५.७४ | बँक ऑफ इंडिया खाते | रु. | ४३९.४४ | बँक कमिशन |
| रु. | ४,१५,१५७.०० | देणगी | रु. | ४,०००.०० | पोस्टेज |
| रु. | २,१८,४९१.०० | उत्सव देणगी | रु. | २३,५७९.०० | किरकोळ खर्च |
| रु. | ५४,३२७.०० | दानपेटी जमा | रु. | १,८२,७९०.०० | देखभाल दुरुस्ती खर्च |
| रु. | ८,३१४.०० | बँक व्याज | रु. | २६,३७०.०० | छपाई खर्च |
| रु. | १४,५२,८३०.०० | स्थिर निधी व्याज | रु. | ३१,६६०.०० | नामफलक खर्च |
| रु. | ४,२५०.०० | भक्त निवास भाडे | रु. | ४,३००.०० | लोखंडी गेट |
| रु. | ३२५.०० | खुर्च्या भाडे | रु. | १,६२,८३६.०० | मंदिर रंगकाम खर्च |
| रु. | ५००.०० | इतर भाडे | रु. | ३१,३५०.०० | बाग खर्च |
| रु. | १,८२१.०० | इतर जमा(साहित्य विक्री) | रु. | १,३२,०००.०० | नित्यसेवा मानधन |
| रु. | ९७५.०० | किरकोळ जमा | रु. | ४,८००.०० | ब्राह्मणपुजारी मानधन |
| रु. | ६,२७०.०० | इतर जमा | रु. | १०,०००.०० | लेखनिक मानधन |
| रु. | १,५२५.०० | प्रसाद साहित्य देणगी | रु. | ९,०००.०० | विद्युत बिले |
| रु. | २६,८००.०० | उत्सव साहित्य देणगी | रु. | २१,६०२.०० | विद्युत साहित्य |
| रु. | ११,०००.०० | ग्रंथ देणगी | रु. | १०,०००.०० | औषधोपचार मदत |
| रु. | ७,०००.०० | भांडी सामान देणगी | रु. | १,२५०.०० | सुरक्षा खर्च |
| रु. | १०,३८०.०० | चांदी दागिने देणगी | रु. | १२,०६५.०० | सफाई स्वच्छता खर्च |
| रु. | ३,४९१.०० | अलंकार व पूजा साहित्य देणगी | रु. | २,५०,०००.०० | इनकम टॅक्स |
| रु. | २०,०००.०० | इनव्हर्टर देणगी | रु. | ११,०००.०० | ग्रंथ |
| रु. | ३९,१७५.०० | कायम सामान देणगी | रु. | ७१,९२५.०० | कायम सामान |
| रु. | ७१,७१४.०० | चांदीची पालखी निधी | रु. | ३७,२८०.०० | मंदिर बांधकाम |
| रु. | २,०९,००९.०० | चांदी पालखी चांदी देणगी | रु. | ३,४९१.०० | सोने दागिने |
| | | | रु. | १०,३८०.०० | चांदी दागिने |
| | | | रु. | ४,४८०.०० | अलंकार व पूजा साहित्य |
| | | | रु. | २५,०००.०० | निशाणकाठी खर्च |
| | | | रु. | २४,०००.०० | इनव्हर्टर |
| | | | रु. | २,५९,००९.०० | पालखी सिंहासन चांदी |
| | | | रु. | २५,०००.०० | सजावट साहित्य |
| | | | रु. | १,४४,४३०.०० | TDSस्थिरनिधी व्याजावरील |
| | | | रु. | ५,५४,३२७.०० | स्थिरनिधी |
| | | | रु. | ४०,०००.०० | विद्युत डिपॉझिट |
| | | | | | अखेर शिल्लक |
| | | | रु. | ३०,८११.०० | हाती रोख |
| | | | रु. | १६,४४४.३० | बँक ऑफ इंडिया खाते |
| रु. | २६,७८,५४७.७४ | एकूण | रु. | २६,७८,५४७.७४ | एकूण |

**विश्वस्त,**
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

# उत्सव देणगीदार यादी सन २०२१-२२

(रु.५००/-च्या वरील देणगीदारांची नावे या यादीत समाविष्ट आहेत.त्याखालील देणगीदारांची नावे छापणे शक्य झाले नाही.)

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०६० | श्री. चंद्रकांत देवरुखकर (सर) | ५२१/- |
| ०६१ | श्री. चिन्मय अनंत पावसकर | ५०१/- |
| ०६२ | श्री. भगवान रामचंद्र मेडेकर | ५०१/- |
| ०६४ | श्री. ज्ञानेश्वर दत्ताराम गवाणकर | १००१/- |
| ०६९ | श्री. शांताराम सदाशिव जळगावकर | ५०१/- |
| ०७७ | श्री. निलेश देविदास नागावकर | १००१/- |
| ०९० | श्री. अशोक गजानन शेळके | ५५१/- |
| ०९२ | श्री. विजय वसंत लिंगायत | ५०१/- |
| ०९४ | श्री. जगदीश मोहन चेऊलकर | १०००/- |
| ०९५ | सौ. सुवर्णा जगदीश काळे | १५००/- |
| १०१ | श्री. विद्यावती विद्याधर मांजरेकर | ५०१/- |
| १०८ | श्री. चंद्रमोहन काशीराम चेऊलकर | ११०५/- |
| १०९ | श्री. साहिल ट्रेडर्स (रमेश लांजेकर) | २१००/- |
| ११० | श्री. नंदकुमार मनोहर चितळे | ५०१/- |
| ११७ | सौ. अश्विनी अरुण जुवेकर | ५०१/- |
| ११८ | श्री. वैभव वासुदेव कुवेस्कर | ५००/- |
| १२३ | श्री. गुरुदत्त कुळकर्णी | १०००/- |
| १२७ | श्री. देविदास मि. कुडाळकर | १००१/- |
| १२८ | श्री. प्रकाश गणू भोगले | ५०१/- |
| १३३ | श्री. संदिप सूर्यकांत आडिवरेकर | १००१/- |
| १४१ | श्री. नितीन सदाशिव धुरी | ५०१/- |
| १४२ | श्री. शामसुंदर यशवंत महांकाळ | ५००/- |
| १६४ | श्री. प्रकाश गंगाराम कांबळी | १००१/- |
| १६६ | श्री. नारायण पांडुरंग गवाणकर | ५००/- |
| १७० | सौ. माधवी महादेव उन्हाळेकर | ५५१/- |
| १७१ | श्री. सहदेव बाळू नेवरेकर | ५००१/- |
| १७६ | श्री. शरद रघुनाथ कांबळी | ५००/- |
| १७८ | श्री. किशोर कल्याण गिरकर | ३३३३/- |
| १८० | श्री. गौरव वाघधरे | ५०१/- |
| १८१ | अलिशा | ५०१/- |
| १८२ | कै. सुशिला नकुल साखरकर स्मरणार्थ श्री. विराज विश्वास साखरकर | १०००/- |
| २०३ | श्री. प्रकाश रघुनाथ परब | ५०१/- |
| २१४ | श्री. आकाश नंदकुमार राऊत | ५०१/- |
| २१७ | कै. सौ. वैशाली वसंत लेले स्मरणार्थ श्री. वसंत दिनकर लेले | ५०१/- |
| २१८ | श्रीमती सुमेधा प्रभाकर फडके | ५०१/- |
| २१९ | श्री. आनंद महादेव जोशी | ५०१/- |
| २२१ | श्री. संतोष सुरेश कांबळी | १५००/- |
| २२२ | श्री. उमेश दशरथ शिरवडकर | ५०१/- |
| २२३ | सौ. तारामती गणपत सुतार | १०००/- |
| २२६ | श्रीमती शालिनी शशिकांत पाटणकर | १००१/- |
| २२७ | श्री. माधव रामचंद्र मिर्लेकर | ५००/- |
| २२८ | श्री. हरेश ज्ञानेश्वर कांबळी | ५००/- |
| २३० | श्री. प्रसन्न काळे श्री. लक्ष्मण काळे | ५००/- |
| २३३ | श्री. अनंत शिवराम पावसकर | ५००/- |
| २३४ | श्री. प्रथमेश आशिप प्रकाश उपळकर | ५०१/- |
| २४४ | श्री. गायत्री अमर आडिवरेकर | ५०१/- |
| २६४ | श्री. पियुश किसन जायभाये | १००१/- |
| २६५ | श्री. राजेश दशरथ शिरवडकर | ५०१/- |
| २७३ | श्री. महादेव यशवंत उन्हाळेकर | ५०१/- |
| २७६ | सौ. अंकिता अंकुश सरबंळकर | ५०१/- |
| २८० | श्री. प्रसाद तुकाराम पवार | ५०१/- |
| २८६ | श्री. विनायक गुरव | ५५१/- |
| २८७ | श्री. अमित दिवाकर पाटणकर | ५००/- |
| २८९ | फोटो विक्री | ७८१/- |
| २९० | श्री. अभय भुस्कुटे | ५०००/- |
| २९१ | | १००१/- |
| २९३ | श्री. नंदकुमार परांजपे | १२०१/- |
| २९४ | | ५०१/- |
| ७५१ | श्री. अभिषेक हरी राऊत | १५५१/- |
| ७५२ | श्री. ओंकार हरी राऊत | ५५१/- |
| ७५३ | श्री. अशोक मुरारी मुटाटकर | १०५१/- |
| ७५४ | श्री. राजेंद्र सदाशिव मयेकर | ५०१/- |
| ७५५ | श्री. श्रीधर बाबू पावसकर | ५०१/- |
| ७५६ | श्री. किशोर लवू पावसकर | ५०१/- |
| ७५९ | श्री. रविंद्र अनंत भुस्कुटे | ११११/- |
| ७६१ | श्री. अरुण बाळकृष्ण गुरव | ५०१/- |
| ७६२ | श्री. शामसुंदर दामोदर गवाणकर | ५०१/- |
| ७६३ | श्री. समीर शंकर गवाणकर | ५०५/- |
| ७६५ | श्री. वसंत भास्कर मोहिते | ५०१/- |
| ७७५ | श्री. नामदेव बर्गे | ५०१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ७७६ | श्री. दिपक मोहन गवाणकर | ५०१/- |
| ७७८ | श्री. विठ्ठल जैतापकर | ५०१/- |
| ७८६ | श्री. शरद शांताराम पाळेकर | ५०१/- |
| ७९२ | श्री. संभाजी सिताराम शिंदे | १००१/- |
| ७९४ | श्री. मदन शंकर राणे | १००१/- |
| ७९५ | श्री. प्रकाश हरिश्चंद्र राणे | ५०१/- |
| ७९८ | श्री. कृष्णा सिताराम शिंदे | ५०१/- |
| ८०० | श्री. कुंदन वामन राऊत | ५०१/- |
| ८०३ | श्री. दिपेश दशरथ बिर्जे | ५०१/- |
| ८०४ | श्री. विघ्नेश जितेंद्र साखरकर | ५०१/- |
| ८०५ | श्री. प्रमोद कमलाकर मांजरेकर | ११११/- |
| ८०८ | रिदवी महेश मयेकर | ५०१/- |
| ८१४ | श्री. अशोक सिताराम प्रिंदावणकर | ५०१/- |
| ८१७ | श्री. यशवंत वासुदेव बावकर | ५५५/- |
| ८१८ | श्री. नारायण केशव बावकर | ५२१/- |
| ८१९ | श्री. दिपक पुतक | ५०१/- |
| ८२१ | श्री. विजय शरद सरमळकर | ५००/- |
| ८२६ | श्री. मधुकर पांडुरंग चव्हाण (खोत) | ५०१/- |
| ८३७ | कविता नायर | ५०१/- |
| ८३८ | श्री. सुधीर दामोदर राऊत | ५०१/- |
| ८३९ | श्री. तुषार सुधीर राऊत | ५०१/- |
| ८४७ | श्री. नरेश अनंत शिंदे | ५०१/- |
| ८४९ | सौ. शुभांगी सुभाष करंगुटकर | ५०१/- |
| ८५१ | ओम निळकंठ साखरकर | ५०१/- |
| ८५२ | श्री. प्रमोद दत्तात्रय ओक | ५०१/- |
| ८५३ | रसिका राजेश्वर वैद्य | १००१/- |
| ८५७ | श्री. यशवंत निळकंठ लिंगायत | ३१५१/- |
| ८५८ | श्री. सुरेश केशव लिंगायत | १००१/- |
| ८६२ | श्री. पांडुरंग भिकाजी तांबे | ५०१/- |
| ८६७ | श्री. प्रकाश खाडिलकर | ५००/- |
| ८६८ | श्री. रविंद्र बापू बावकर | ११११/- |
| ८६९ | श्री. एकनाथ दत्ताराम बावकर | ५०१/- |
| ८७६ | मिनल आंबेरकर | ५०१/- |
| ८७७ | स्वरा गणेश शेणॉय | ५००/- |
| ८८४ | श्री. विश्वनाथ बाळकृष्ण काजवे | ५०१/- |
| ८८५ | श्री. पद्मप्पा जीवनप्पा देसाई | ५०१/- |
| ८८८ | श्री. विलास यशवंत काजवे | ५११/- |
| ८९४ | श्री. संजय मधुकर जांभले | ५०१/- |
| ८९८ | अनुसया जगन्नाथ चेऊलकर | ५०१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ८९९ | श्री. सम्राट प्रविण गवाणकर | ५०१/- |
| ९०४ | श्री. सिद्धेश सुधिर काजवे | ५०१/- |
| ९१२ | श्री. बाळाराम धोंडू कांबळे | ५०१/- |
| ९१३ | श्री. श्रीपाद भुस्कुटे | ११००/- |
| ९१४ | श्री. वासुदेव रामचंद्र भुस्कुटे | ५००/- |
| ९१५ | श्री. रोहिदास हरिश्चंद्र चेऊलकर | ५०१/- |
| ९१६ | नलिनी शंतनू शिरसेकर | ५०१/- |
| ९१८ | श्री. निखिल संतोष राऊत | ५०१/- |
| ९२४ | श्री. सेजल सुनिल नार्वेकर | १०००/- |
| ९२५ | श्री. प्रशांत अशोक वेंगुर्लेकर | ५०१/- |
| ९२७ | श्री. सौरभ नंदकुमार गुरव | ५०१/- |
| ९२८ | श्रीमती लक्ष्मी शांताराम लिंगायत | १०५१/- |
| ९३० | श्री. जय संदिप मांजरेकर | २५०१/- |
| ९३१ | श्री. राहुल संदिप मांजरेकर | २५००/- |
| ९४० | कै. प्रणित प्रदिप उन्हाळेकर- स्मरणरर्थ | |
| | श्री. दिलीप बाळकृष्ण उन्हाळेकर | ११११/- |
| ९४२ | श्री. अरविंद पांडुरंग जाधव | ५०१/- |
| ९४३ | श्री. राजेश भास्कर मेळेकर | ५०१/- |
| ९४४ | श्री. प्राशांत कैलास कांबळी | ५०१/- |
| ९४७ | श्री. कल्पेश वाघधरे | ५०१/- |
| ९५३ | श्री. विलास कृष्णा राजापकर | ५५१/- |
| ९५४ | श्री. निलेश श्रीधर चेऊलकर | १००१/- |
| ९५५ | श्री. सागर अशोक चेऊलकर | १००१/- |
| ९६१ | श्री. जोशी बंधू | ११११/- |
| ९६२ | श्री. पंकज प्रकाश मणचेकर | ५०१/- |
| ९६७ | कु.नेहा,प्राची,सौ.अर्चना अरुण मांजरेकर | १००१/- |
| ९६९ | श्री. गंगाधर नारायण गोरे | ५०१/- |
| ९७३ | श्री. भिकाजी भिवाजी सुर्वे | ५००/- |
| ९७४ | सौ. संगिता गणेश शेट्ये | ५००/- |
| ९७६ | वृजवी प्रथमेश घाडी | ५०१/- |
| ९७७ | श्री. संतोष दत्ताराम मांजरेकर | ५००/- |
| ९७९ | श्री. अशोक अनंत खेडेकर | ५००/- |
| ९८० | श्री. अनिल कृष्णा तांबे | ५००/- |
| ९८४ | पृथा लालचंद शिवणेकर | १०००/- |
| १८५ | श्री. गणेश दत्तात्रय चेऊलकर | ५००/- |
| ९९० | श्री. सदाशिव सहदेव नेवरेकर | २५००/- |
| ९९१ | सौ. श्रद्धा सदाशिव नेवरेकर | २५००/- |
| ९९३ | श्री. अपर्णा अनिल गवाणकर | १००१/- |
| ९९५ | श्री. हिमांशू प्रकाश भोमकर | ५००/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ९९६ | श्री. विश्वनाथ यशवंत गवाणकर | १०००/- |
| ११०२ | श्री. पार्थ अभिषेक परेश पवार | ५०१/- |
| ११०४ | सुनयना सुधीर जावकर | ५०१/- |
| ११०८ | श्री. यज्ञेश राजेश जोईल | १००१/- |
| १११८ | श्री. वामन नारायण मोहिते | ११०१/- |
| १११९ | श्री. हर्षित, मोनिक, अंतरा | ५०१/- |
| ११२१ | किर्ती,सौरभ, विनोद बोटले | १००१/- |
| ११२३ | श्री. कमलाकर पुनाजी मुटाटकर | ५०१/- |
| ११३३ | उषा विलास लायरकर | ५००/- |
| ११५३ | श्री. वैभव प्रकाश तिवरांमकर | ११११/- |
| ११५४ | सृष्टी विनोद मेळेकर | १००१/- |
| ११५५ | रंजना अजल हळदणकर(काजवे) हळदणकर | ५००/- |
| ११५६ | कै. विलास लक्ष्मण हळदणकर यांचे स्मरणार्थ पूनम विलास हळदणकर | ५००/- |
| ११५८ | श्री. आदित्य शिंदे | ५००/- |
| ११६२ | श्री. धोंडू विष्णू बोटले | ५०१/- |
| ११६३ | श्री. सुहास हरिश्चंद्र चेऊलकर | ५०१/- |
| ११६४ | रिमा राजेंद्र रुबजी | ५०१/- |
| ११८३ | श्री. राजेश मंगेश पावसकर | ५०१/- |
| १२०० | श्री. दिनेश नंदकुमार तेली | १०००/- |
| १२०५ | श्री. मिलिंद वसंत राजापकर | ५०१/- |
| १२०६ | श्री. रियांश महेश वरवडेकर | ५०१/- |
| १२०९ | श्री. हरिश्चंद्र महादेव आडिवरेकर | ५००/- |
| १२१० | श्री. शशिकांत विष्णु कुळकर्णी | ५०५/- |
| १२२८ | सौ. शैलजा प्रभाकर गोगटे | ५०१/- |
| १२२९ | सौ. मीरा शैलेश बोपर्डीकर | ५०१/- |
| १२३२ | सौ. सुजाता सुरेश जोशी | ५००/- |
| १२३४ | श्री. दिवाकर पांडुरंग मयेकर | ५००/- |
| १२४० | श्री. नितीन भगवान खरे | ५०१/- |
| १२४१ | सुधा सुधाकर भुस्कुटे | १००१/- |
| १२४२ | श्री. वैभव सुधाकर भुस्कुटे | १००१/- |
| १२४५ | श्री. कृष्णा लक्ष्मण गोडबोले | ५०१/- |
| ००१ | श्री. शिवराम के. जैतापकर | ५०१/- |
| ००२ | श्री. राजेंद्र जी. आंबवणे | ५००/- |
| ००६ | श्री. ॲड.शशिकांत गणपत सुतार | २५०००/- |
| ००७ | श्री. प्रशांत चंद्रकांत मोहिते,अर्णवी प्रशांत मोहिते | १५०१/- |
| ००९ | श्री. उदय अनंत देसाई | ५०००/- |
| ०१० | श्री. प्रफुल्ल कल्याण कोंडेकर | ५०१/- |
| ०११ | श्री. सुहास कल्याण कोंडेकर | ५०१/- |
| ०१२ | श्री. संतोष वसंत उपळकर | ५००/- |
| ०१३ | कै. गिरीजाबाई व कै. सीताराम शंकर आचरेकर स्मरणार्थ सौ. विजया विश्वनाथ काजवे | २१२१/- |
| ०१४ | श्री. वसंत चिंतामण गोखले | ५००/- |
| ०१६ | कै. केराजी बाळकृष्ण वाघधरे यांचे स्मरणार्थ नेहा अ. वाघधरे | २१००/- |
| ०१७ | श्री. संजय प्रभाकर भुस्कुटे | २०००/- |
| ०१९ | श्री. गणेश जयराम मोघे | २१००/- |
| ०२० | श्री. विजय पुरुषोत्तम भुस्कुटे | ५०१/- |
| ०२२ | श्री. शामसुंदर पाटणकर | ५००/- |
| ०२३ | श्री. मिहीर अनिल नार्वेकर | ५००/- |
| ०२४ | श्री. प्रमोद घाणेकर | ५००/- |
| ०२५ | प्रांजली मिलिंद जोशी | ५०१/- |
| ०२६ | श्री. सदानंद तुकाराम लिंगायत/भोपळे व तांदूळ विक्री | १२००/- |
| ०२८ | श्री. राहूल परांजपे | १००२/- |
| ०३२ | श्री. अभिजित प्रकाश धावडे | ५०१/- |
| ०३३ | श्री. मिलिंद पर्शुराम पावसकर | ५०१/- |
| ०३४ | कै. नारायण शंकर कबीर यांचे स्मरणार्थ श्री. गुरुप्रसाद ना. कबीर | २०००/- |
| ०४० | श्री. गंगाधर शिवराम कुवेस्कर | ५०२/- |
| ०४८ | श्री. नितीन धुरी | ५०१/- |
| ०४९ | श्री. रविकांत वसंत लिंगायत | ५०००/- |
| ०५० | राजापूर अर्बन कोऑप.बँक राजापूर | १५०००/- |
| ३०२ | श्री. कुणाल सीताराम चेऊलकर | २५००/- |
| ३०४ | श्री. अभय भुस्कुटे | १०००/- |
| ३०५ | श्री. सौरभ भुस्कुटे | ५०१/- |
| ३०६ | सुनिता चंद्रकांत मोहिते | १००१/- |
| ३०७ | श्री. आनंदा भिकाजी भोर | १००१/- |
| ३०९ | श्री. गणपत लक्ष्मण बावकर (शेठ) | १००१/- |
| ३१० | श्री. चैतन्य विलास देसाई | ५००/- |
| ३१२ | श्री. श्रीरंग विनायक पाटणकर | ५०१/- |
| ३१३ | श्री. विलास चेऊलकर | ५०१/- |
| ३१५ | श्री. तेजस प्रवीण पेडणेकर | ५०१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ३१६ | श्री. जगदीश चेऊलकर कै.मीनाक्षी सुधाकर गुजराथी यांचे स्मरणार्थ सौ. पूजा जगदीश चेऊलकर | ५००/- |
| ३१७ | कै. रमाबाई वामन देसाई यांचे स्मरणार्थ सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ५५१/- |
| ३१८ | श्री. विक्रांत विकास गडकर श्री. गणेश विनोद गडकर | ५००१/- |
| ३२० | श्री. अरविंद ढमढेरे | ३००००/- |
| ३२३ | श्री. योगेश्वर देसाई | १०००/- |
| ३२४ | श्री. विशाल अरुण मोहिते | १००१/- |
| ३२७ | कै. संगिता सूर्यकांत पाटील स्मरणार्थ | ५०१/- |
| ३३३ | श्री. अशोक विनायक काळे | १०००/- |
| ३३४ | श्री. अभिजित अशोक भुस्कुटे | १००१/- |
| ३३७ | श्री. श्रीपाद गोविंद भुसकुटे | ११०००/- |
| ३३८ | श्री. रविकांत रामचंद्र पावसकर | ११११/- |
| ३४१ | श्री. प्रकाश पांडुरंग ठुकरुल | ५००/- |
| ३४२ | श्री. अनिल भुसकुटे | ५००/- |
| ३४३ | श्री. योगेश मंगेश कुळकर्णी | १०००/- |
| ३४५ | श्री. अमोल गणपत लिंगायत | २२५०/- |
| ३४६ | सुलोचना पर्शराम गेडांबे | ५००/- |
| ३४७ | श्री. राजेंद्र शंकर आडके | ५००/- |
| ३४९ | श्री. अनिल विनायक काळे | २५०००/- |
| ३५० | श्री. देवदत्त गुरुदास मांजरेकर | १००००/- |
| ५०५ | श्री. प्रकाश परशुराम गोखले | १००१/- |
| ५०७ | स्वामिनी दिपक तिवरेकर | ५००१/- |
| ५०८ | श्री. उल्हास अंकुश मांजरेकर | ५००/- |
| ५०९ | श्री. प्रकाश धोंडू पावसकर | ५०१/- |
| ५१० | श्री. राहुल प्रकाश पावसकर | ५७१/- |
| ५११ | श्री.ओंकार प्रकाश पावसकर | ५२१/- |
| ५१६ | श्री. अशोक रामचंद्र फडके | ५००१/- |
| ५१७ | श्रीमती मंगल माधव देसाई द्वारा हेमंत माधव देसाई कै. रघुनाथ संभाजी देसाई स्मरणार्थ | २००१/- |
| ५१८ | कै. दिगंबर वामन देसाई यांचे स्मरणार्थ सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ११००/- |
| ५२२ | धनलक्ष्मी चेऊलकर | १०००१/- |
| ५२४ | रोहिणी कुळकर्णी | २०००/- |
| ५२८ | श्री. आनंद महादेव जोशी | ५०१/- |
| ५३० | समिधा प्रबोधन देसाई/ द्वारा शशिकांत सोहोनी | १०००/- |
| ५३१ | श्री. निलेश श्रीधर चेऊलकर | २०००/- |
| ५३३ | कै. धनाजी भानू राऊत यांचे स्मरणार्थ श्री. राऊत बंधू | ७०००/- |
| ५३४ | श्री. उदय अनंत देसाई | ५०००/- |
| ५३८ | चि. कु. सान्वी स्वप्निल शेगडेकर C/o मकरंद / मयुर गोखले | ५०१/- |
| ५३९ | श्री. अमेय श्रीकृष्ण गोखले C/o गोखले ब्रदर्स | ५००/- |
| ५४० | श्री. मनिष शिवाजी साखळकर | ५००/- |
| ५४१ | श्री. अतुल भोगले | ५००/- |
| ५४२ | श्री. हेमंत अनंत भुसकुटे | ११००/- |
| ५४६ | कै. विश्वनाथ अनंत जोशी स्मरणार्थ श्री. श्रीकांत विश्वनाथ जोशी | ३००००/- |
| ६५५ | | २२३०/- |
| ६६५ | श्री. योगेश्वर देसाई | १०००/- |
| ६७६ | | ५००१/- |
| ६७८ | | ५०१/- |
| ६७९ | | १००१/- |
| ६८२ | | ५०००/- |
| ६९२ | | १००१/- |
| ६९४ | श्री. आलोक कुळकर्णी | २०००/- |
| ६९८ | | ५७७/- |
| ७०१ | श्री. जयकृष्ण श्रीपाद कुळकर्णी | १००१/- |
| ७०६ | श्री. हर्षद नितीन खडपे | ५०१/- |
| ७०७ | श्री. निल जयप्रकाश सुर्वे | ५००/- |
| ७११ | श्री. राजेश लक्ष्मण साखरकर | ५०१/- |
| ७१२ | श्री. प्रकाश राठोड | ५०००/- |
| ७१६ | श्री. नित्यानंद जयंत भोगले | १००००/- |
| ७१८ | श्री. विवेक वासुदेव जोगळेकर | १००१/- |
| ७१९ | श्री. भालचंद्र सोनू मांजरेकर | १०००/- |
| ७२० | शिला विद्याधर पडळ | १०००/- |
| ७२३ | श्री. आदित्य अमोल फडके | ५०१/- |
| ७२४ | श्रीराम परांजपे | ५०१/- |
| ७२६ | | १०००/- |
| ७२७ | | १०००/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ७२८ | | ६००/- |
| ७२९ | | ५००/- |
| ७३३ | | ५००/- |
| १००२ | श्री. श्रीकृष्ण मुकुंद देसाई | १००१/- |
| १००४ | भाग्यश्री अजित अंगडी | ५११/- |
| १००५ | श्री. सनतकुमार जंभू उपाध्ये | २१००/- |
| १००६ | श्री. पद्माकर लक्ष्मण नेने | ६०१/- |
| १००९ | श्री. श्रीधर डी. गवाणकर | ५००/- |
| १०११ | श्री. पंकज लक्ष्मण देसाई | २५०१/- |
| १०१३ | श्री. अमित विजय कुळकर्णी | ११२१/- |
| १०१६ | श्री. मंगेश भुसकुटे | ५००/- |
| १०१७ | श्री. वासुदेव भुसकुटे | ५००/- |
| १०२० | भाग्यश्री अजित अंगडी | ५०१/- |
| १०२१ | श्री. निहंत्र अमेय कुळकर्णी | |
| | C/o महेश नारायण कुळकर्णी | ५०१/- |
| १०२२ | श्री. रामचंद्र यज्ञेश्वर फडके | ५००१/- |
| १०२४ | साडीविक्री | |
| | हस्ते सदानंद तुकाराम लिंगायत | ७००/- |
| १०२५ | कै. सिताराम बाळकृष्ण देसाई | |
| | सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ५११/- |
| १०२६ | कै. वामन सिताराम देसाई स्मरणार्थ | |
| | सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ५११/- |
| १०२७ | कै. दिगंबर वामन देसाई स्मरणार्थ | |
| | सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ५११/- |
| १०२९ | श्री. विवेक गोपाळ देसाई | २५००/- |
| १०३२ | कै. जगन्नाथ भाऊ जैतापकर | |
| | अनिल, सुनिल व | |
| | भास्कर जगन्नाथ जैतापकर | ७०००/- |
| १०३३ | श्री. अनिल जगन्नाथ जैतापकर | ११११/- |
| १०३४ | श्री. मनोहर ज. गोरे | ५०१/- |
| १०३६ | चि. निहंत्र अमेय कुळकर्णी | ५०१/- |
| १०३८ | श्री. प्रथमेश प्रफुल्ल कोंडेकर | ५०१/- |
| १०३९ | श्री. महेश पद्माकर नेने | ५०१/- |
| १०४१ | श्री. अशोक वि. काळे | ११००/- |
| १०४२ | श्री. उल्हास मांजरेकर | ५०१/- |
| १०४३ | श्री. अमित विनायक काळे | १०००/- |
| १०४४ | श्री. प्रमोद प्रकाश हिंदळेकर | १००१/- |
| १०४५ | मुग्धा स्वप्नील गोखले | १००१/- |
| १०४६ | श्री. शरद मुकुंदराव देसाई | १०००/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १०४७ | श्री. गजानन त्रिंबक देसाई | १५०००/- |
| १०४८ | श्री. अतुल अरुण गुरव | ११५१/- |
| १०५० | श्री. विवेक दत्तात्रय परांजपे | ५००/- |
| १०५४ | श्री. केतन काळे | ५०००/- |
| १०५५ | बुद्धवासी अविनाश धमोनंद गिरकर | |
| | यांचे स्मरणार्थ | |
| | श्री. अशोक आनंद गिरकर | १०००/- |
| १०५६ | कै.सौ.राजेश्री रामदास व कै.रामदास | |
| | नारायण मांजरेकर यांचे स्मरणार्थ | |
| | श्री. संदिप रामदास मांजरेकर | १०००००/- |
| १०५७ | श्री. आबाजी दामोदर गवाणकर | ५०१/- |
| १०५९ | श्री. रविंद्र शंकर कुळकर्णी | ७५१/- |
| १०६१ | श्री. गजानन राजाराम भुसकुटे | ५०१/- |
| १०६२ | श्री. कुणाल चारुदत्त ढमढेरे | १००१/- |
| १०६५ | श्री. डॉ. पारकर | ५००/- |
| १०६६ | श्री. प्रशांत वैद्य | १००१/- |
| १०६७ | श्री. नंदकुमार विद्याधर मांजरेकर | २१००/- |
| १०६८ | श्री. विनायक सखाराम गवाणकर | ५५५/- |
| १०६९ | श्री. दिवाकर गोविंदराव भोगले | ५०१/- |
| १०७० | श्री. राजेंद्र रविकांत गवाणकर | ५०१/- |
| १०७१ | श्री. मधुकर मेहेंदळे | ५०१/- |
| १०७२ | सौ. प्रिती नार्वेकर | ११००/- |
| १०७४ | श्री. सुरेश पर्शराम गोखले | १०००/- |
| १०७५ | श्री. अशोक पर्शराम गोखले | १०००/- |
| १०७६ | श्री. अभिजित आनंद ढमढेरे | ५०००/- |
| १०७७ | अनघा अनिल ढमढेरे | १०००/- |
| १०७८ | श्री. कल्पेश महादेव चव्हाण | |
| | C/o महादेव गोपाळ चव्हाण | ५११/- |
| १०८० | श्री. श्याम बलवंत गोगटे | ५०१/- |
| १०८२ | अलका अच्युत खाडीलकर | ५०१/- |
| १०८४ | श्री. प्रमोद सहदेव घाणेकर | ५०००/- |
| १०८५ | श्री. विजयानंद के. भुसकुटे | ५०००/- |
| १०८७ | श्री. श्रीधर डी. गवाणकर | ५००/- |
| १०८९ | श्री. जयंत गोपाळ देवधर | १००१/- |
| १०९० | श्री. प्रदिप गोपाळ देवधर | १००१/- |
| १०९१ | श्री. अमित वि. कुळकर्णी | ५००/- |
| १०९३ | श्री. भरत बी. कणेरी | २५००/- |
| १०९४ | श्री.इझाकखान यासीनखान गवाणकर | ५५५/- |
| १०९५ | सीमा प्रभाकर चेऊलकर | १००००/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १०९६ | श्री. अन्सी निनाद पाटणकर | १०००/- |
| १०९८ | कै. शुभदा व कै. दिगंबर वामन देसाई स्मरणार्थ सौ. भाग्यश्री अजित अंगडी | २१००/- |
| १०९९ | श्री. जगदीश दयाळ नार्वेकर | ५००/- |

## मुदत ठेव व्याज देणगी

- कै. गौरी हरि देसाई यांच्या स्मरणार्थ श्री. नारायण हरि देसाई यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीचे व्याज जमा रु. १६८१.००
- कै. गोपाळ विष्णू देवधर यांच्या स्मरणार्थ श्री. गौरव प्रदीप देवधर यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीचे व्याज जमा रु. १३४०.००
- श्री. अतुल सदाशिव भोगले यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीचे व्याज जमा रु. ४९१.००
- श्री. यशवंत वासुदेव बावकर, मिठगवाणे वाघबीळवाडी यांनी ठेवलेल्या मुदत ठेवीचे व्याज जमा रु. ६८७.००
- कै. गो. बा. देसाई यांच्या ठिकाणामधील सागवान विक्रीतून मिळालेली दोन लाख रक्कम श्री. नंदकुमार मधुसूदन परांजपे यांनी मुदतठेव ठेवली व त्याचे व्याज जमा रु. ९१२७.००

# वस्तुरूप देणगी

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ३३५ | कै. राजश्री रामदास व कै. रामदास नारायण मांजरेकर स्मरणार्थ - स्नेहल प्र. वेंगुर्लेकर/ श्री. संदिप रा. मांजरेकर, स्नेहा सुनिल नार्वेकर यांजकडून दोन पितळी समई | ३२६७४/- |
| ३३९ | कै. शोभा अंकुश बहिरे स्मरणार्थ सौ. निता नरेश बहिरे सोन्याचा झुमका | ३४९१/- |
| ५०१ | कै. रुक्मिणी वासुदेव व कै. वासुदेव दत्तात्रय जोगळेकर यांचे स्मरणार्थ श्री. विवेक वासुदेव जोगळेकर यांचेकडून चांदीची वीट | २४००५/- |
| ५१२ | श्री. राहूल संदिप मांजरेकर १ किलो चांदी | ६६६४२/- |
| ५१३ | कु. जय संदिप मांजरेकर १ किलो चांदी | ६६६४२/- |
| ५१४ | कु. सेजल सुनिल नार्वेकर ५०० ग्रॅम चांदी | ३३३२०/- |
| ५१५ | कै. दामोदर अनाजी राऊत यांचे स्मरणार्थ श्रीमती कविता नायर यांचेकडून २५० ग्रॅम चांदी | १७५००/- |
| ५३२ | श्री. अनिल विनायक काळे स्टेनलेस स्टील भांडी | ५०००/- |
| ५३७ | कै. सखाराम व कै. द्रौपदी सखाराम गवाणकर यांचे स्मरणार्थ - दोन चौरंग ज्ञानेश्वरी, दासबोध | ११०००/- |
| १०२८ | श्री.श्रीपाद भुसकुटे, इनव्हर्टर बॅटरी | २००००/- |
| १०३० | श्री. जयंत शंकर जोशी व बंधू ५ किलो खडीसाखर | ५००/- |
| १०३१ | श्री. अरुण दत्ताराम वाळके, घड्याळ | ९७५/- |
| १०७३ | श्री. अरुण जोशी व बंधू खडीसाखर देणगी | ७००/- |
| १६७ | उषा गुणवंत आंबेरकर- तांब्याची कळशी | २०००/- |
| १८३ | कै. अनिल पांडुरंग गवाणकर यांचे स्मरणार्थ श्रीमती अपर्णा अनिल गवाणकर दानपेटी देणगी | १५००/- |
| २८२ | सौ. शितल महादेव उन्हाळेकर सजावट साहित्य लोकरी तोरण अंदाजे किंमत | २५०००/- |
| ११२३ | सौ. रुबजी, अब्दागिर छत्री व चंदन खोड अंदाजे किंमत | १००००/- |

● **वासांसि जीर्णानि... दिवंगत व्यक्तींबद्दल सहवेदना**

कै. जयंत शंकर जोशी, कै. राजाराम महादेव मसूरकर, कै. प्रशांत भास्कर भडेकर, जैतापुर, कै. नंदकुमार यशवंत पाटणकर, राजापूर, कै. काशिनाथ हुंबार्डेकर, मिठगवाणे, कै. सखाराम पूनाजी मसूरकर, कै. दिनकर वासुदेव देसाई, मुंबई, कै. शशिकांत केशव जोशी (करेलकर खोत), मुंबई, कै. सुनील गोपाळ देवधर, नाशिक, कै. शशिकांत शंकर राव कुळकर्णी, अहमदनगर, कै. भीमाताई परिट, कै.यशवंत निळकंठ लिंगायत आदी देवस्थान हितसंबंधी, देणगीदार यांचे निधन झाले आहे. यामधील स्वर्गीय जयंत शंकर जोशी यांनी उत्सवामधील तुळशीविवाह, दसऱ्याच्या दिवशीचे सोनेपूजन, उत्सवामधील खडीसाखर प्रसादाची सोय, जनरल मिटिंगमध्ये उपस्थिती, वार्षिक पंचांग पुरविणे आदी अनेक देवस्थानच्या धार्मिक व अन्य कामाकाजात 'श्री देवाचे जोशी' म्हणून आपली सेवा वर्षानुवर्षे कोणतीही अपेक्षा न ठेवता व आपुलकीने केलेली आहे. स्वर्गीय राजाराम महादेव मसूरकर व स्वर्गीय सखाराम पूनाजी मसूरकर यांनी 'श्रीदेवाचे महालकरी' म्हणून चांदीची काठी धरण्याची सेवा वर्षानुवर्षे केलेली आहे.. कै. प्रशांत भास्कर भडेकर यांनी गेल्या पाचसहा वर्षांमध्ये उत्सवामधील बोर्ड पेंन्टिग, फोटोग्राफी व व्हिडिओ शुटिंग या कामासाठी आपले योगदान दिले आहे. स्वर्गीय शशिकांत शंकरराव कुलकर्णी यांच्या पाच लाख देणगीमुळे सुवर्णकलशाच्या देणगी संकलनाला दमदार सुरुवात झाली. सामान्यपणे बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखा सन १९८२ मध्ये सुरू झाल्यापासून श्रीदेवाच्या दोन्ही उत्सवाला अविरतपणे आणि कोणत्याही परिस्थितीत उपस्थित रहाणारा 'निस्सीम भक्त' म्हणून सर्वांच्या मनमंदिरात स्थान मिळणारे म्हणून स्वर्गीय कुळकर्णी भाऊ यांचा विषेश उल्लेख करावा लागेल.. वरील उल्लेख केलेल्या स्वर्गीयांनी श्रीदेवाच्या उत्सवाला सातत्याने देणगी पाठवून आपापले योगदान दिले आहे. परमेश्वर सर्व मृतांच्या आत्म्याला शांती देवो आणि सद्‌गती देवो..

● **आभार ....**

देवस्थान कामकाजामध्ये भाग घेणाऱ्या सर्व सेवेकरी मानकरी खोत मंडळींचे आभार मानले पाहिजेत. देवस्थानला सढळ हस्ते देणगी देणाऱ्या देणगीदारांचे आभार मानले पाहिजेत. देवस्थानच्या वार्षिक कामकाजात, बांधकामात भाग घेणारे सर्वश्री श्री. दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर, श्री. नरेश कांबळी, श्री. रमेश काजवे, श्री. विलास मेस्त्री, श्री. नंदकुमार मेस्त्री, श्री. बापू मेस्त्री, श्री. बाळू मेस्त्री, श्री. सुनील काजवे, श्री. सय्यद हसोळकर, श्री. प्रशांत भडेकर, श्री. गिरिश धनावडे, श्रीम. विमल धनावडे, श्री. सुधाकर लिंगायत श्री. दिनकर दत्तात्रय लिंगायत यांचा उल्लेख करावाच लागेल... श्री. भिकाजी यशवंत लिंगायत आणि श्री. उमेश लक्ष्मण काजवे यांनी चांदीच्या चवऱ्या दुरुस्तीची कामे मुंबई मध्ये अत्यंत जबाबदारीने करवून घेतली. वर्षभरात रंग साहित्य, इलेक्ट्रीकल साहित्य आदी पुरवणारे श्री. वैभव कुवेसकर, श्री. सचिन मेस्त्री, श्री. राजन कुवेसकर, श्री. रमेशशेठ लांजेकर, नाटे यांचे आभार मानलेच पाहिजेत. उत्सवात ध्वनी प्रकाश व्यवस्था करणारे गिरिश धनावडे, श्री. अक्षय तिवरांबकर, (सविता इव्हेंट मॅनेजमेंट), देवस्थान इमारतींचे पेस्ट कंट्रोल करणारे श्री. जगदीश चेऊलकर, यांचे सुद्धा आभार मानले पाहिजेत. श्री. दिपक नाटेकर व त्यांचे सर्व साथीदार यांचे आभार आहेत.. निरपेक्ष भावनेने आरतीला पेटीच्या साथीची सेवा बजावणारे श्री. भागवत राऊत यांचे आभार. राजापूर अर्बन बँकेचे आभार... तसेच बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेचे आभार... सर्व किराणा सामान पुरवणारे श्री. महेश पटवर्धन व श्री. मन्सूरखान गवाणकर यांचे आभार... विद्युत पुरवठा करणाऱ्या वीज मंडळाचे आभार. भक्त निवास व्यवस्था पहाणारे सौ. स्मिता सदानंद लिंगायत व कीर्तनकारांची निवासभोजन व्यवस्था करणारे श्री. सदूभाऊ ताम्हनकर यांचे आभार.. श्री. संतोष लिंगायत, श्री. विजय लिंगायत या बंधूंचे आभार मानलेच पाहिजेत. श्री. विजय गवाणकर, श्री. विलास चेऊलकर यांनी कॅश काऊंटर नियोजन/नियंत्रण केले त्याबद्दल आभार.. सीए श्री. निलेश पाटणकर व त्यांच्या ऑफिसमधील सर्व स्टाफ, श्री. दत्ताभाऊ रानडे ही सर्व मंडळी आभार मानण्यास पात्र आहेत.. अनेक लहान लहान मुले छोटछोट्या हातांनी नकळतपणे अनेक कामे करत असतात. ग्रामपंचायत मिठगवाणे मार्फत उत्सवामध्ये सहकार्य मिळते म्हणून त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. सर्वांचे आभार मानत असताना नजरचुकीने एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे नाव राहून जाते, परंतू अशांचेही आभार तूर्तास मानतो.. ●●●●



महाशिवरात्री उत्सवापूर्वीची जनरल सभा व त्यामधील उपस्थिती ....



महाशिवरात्रीचे उत्सवाला उपस्थित राहिलेले मे. अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी श्री. सचिन शिंदे साहेब यांचा सत्कार करताना ....




महाशिवरात्रीचे उत्सवाला उपस्थित राहिलेल्या राजापूरच्या तहसीलदार सौ. शितल जाधव यांचा देवस्थानच्या वतीने सत्कार करताना ....




महाशिवरात्रीचे उत्सवाला उपस्थित राहिलेल्या प्रांताधिकारी श्रीम. वैशाली माने यांचा देवस्थानच्या वतीने सत्कार करताना ....



जागृत, स्वयंभू • श्रीदेवअंजनेश्वर • मु. मिठगवाणे

## बुक पोस्ट

प्रति,

श्री./ श्रीम. ____________________

____________________

____________________

If undelivered please return to-

प्रेषक : विश्वस्त, श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे,
मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी-४१६७०२
9823277326 (WhatsApp) 7038785001